# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## अभ्यासपत्रिका क्र. ५

# भारतीय साहित्यविचार

## विषय कोड - 97032

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
कला व मानव्य शाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. बालाजी कांबळे**
साहाय्यक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **प्रा. ज्ञानेश्वर गोविंद मुंढे**
मराठी विभाग, शेठ. जे. एन. पालिवाला कॉलेज,
पाली, सुधागड जि. रायगड ४१०२०५.

: **डॉ. समीर चंद्रकांत जाधव**
विभाग प्रमुख, साठे कॉलेज, विलेपार्ले, मुंबई.

: **डॉ. वनश्री फाळके - सोने**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
एस. पी. एल. श्रॉफ, आर्ट आणि कॉमर्स कॉलेज,
चिंचणी ता. ढहाणू जि. पालघर पिन-४०१५०३.

: **प्रा. रूपाली अशोक कांबळे**
मराठी विभाग, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज, ठाणे.

**मे २०२२, प्रथम मुद्रण, ISBN: 978-93-91735-65-4**

**प्रकाशक**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई.

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | पाठाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| **घटक I** | | |
| १. | भारतीय साहित्यशास्त्र : संकल्पना व सिद्धांत | १ |
| **घटक II** | | |
| २. | भारतीय साहित्यशास्त्र : साहित्याचा आस्वाद | १४ |
| **घटक III** | | |
| ३. | साहित्य भाषेचे स्वरूप आणि कार्य, शब्दशक्ती - अभिधा, लक्षणा, व्यंजना | २८ |
| **घटक IV** | | |
| ४.१ | साहित्य निर्मितीमागील कारणे : प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास | ४१ |
| ४.२ | साहित्याची प्रयोजने : भरतमुनी ते अभिनवगुप्त | ५३ |


*****

# तृतीय वर्ष कला

## अभ्यासपत्रिका - ५

## भारतीय साहित्यविचार

**सत्र - ५ वे (श्रेयांकने-४) व्याख्याने-६०**

**उद्दिष्टे (Objectives):**

१) भारतीय साहित्याचे स्वरूप आणि सिद्धांत समजावून देणे.

१) साहित्य भाषेचे स्वरूप व कार्य समजावून घेणे.

३) साहित्याची निर्मिती प्रक्रिया व प्रयोजन समजावून घेणे.

**घटक - १ भारतीय साहित्यशास्त्र: संकल्पना व सिद्धांत-(१)**

१. अलंकारविचार,वक्रोक्तीविचार

२. रितीसिद्धांत, ध्वनिसिद्धांत

३. औचित्य विचार

**घटक - २ भारतीय साहित्यशास्त्र : साहित्याचा आस्वाद.**

**१. भरताचा रससिद्धांत**

**रससिद्धांताचे भाष्यकार:**

१. भट्टलोल्लट

२. श्रीशंकुक

३. भट्टनायक

४. अभिनवगुप्त

**घटक - ३ भारतीय साहित्यशास्त्र : साहित्य भाषेचे स्वरूप व कार्य**

१. शब्दशक्ती : अभिधा, लक्षणा व व्यंजना

२. वृत्त, छंद, मुक्तछंद

**घटक - ४ भारतीय साहित्यशास्त्र : निर्मिती प्रकिया व प्रयोजन विचार**

१. साहित्य निर्मिती मागील कारणे: प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास

२. साहित्याची प्रयोजने : भरत ते अभिनवगुप्त

**सत्रान्त परीक्षा-गुण १००**

| | |
|---|---|
| प्रश्न १. घटक १ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) | गुण २० |
| प्रश्न २. घटक २ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) | गुण २० |
| प्रश्न ३. घटक ३ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) | गुण २० |
| प्रश्न ४. घटक ४ वर आधारित प्रश्न (पर्यायासह ) | गुण २० |
| प्रश्न ५. सर्व घटकांवर आधारित दोन टीपा (पर्यायासह) | गुण २० |

**साध्ये (outcome)**

१) भारतीय साहित्य विचाराचा परिचय होईल.

२) भारतीय साहित्य आस्वाडची प्रक्रिया समजेल.

३) भारतीय साहित्याची निर्मिती प्रक्रिया व प्रयोजनाचा परिचय होईल.

**संदर्भ ग्रंथ:**


१. कंगले, र.प.,(संपा.) काव्यशास्त्र, मौज प्रकाशन, मुंबई १९७४.

२. कंगले, र.प.,(संपा.) रस-भाव-विचार, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९७२.

४. कुलकर्णी वा.ल.,साहित्य स्वरूप आणि समीक्षा, पॉप्युलर, मुंबई १९७५.

५. गाडगीळ. स.रा., काव्यशास्त्रप्रदीप, व्हीनस, पुणे (सहावी आवृत्ती), २००२३.

६. देशपांडे, ग. त्र्यं., भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर, मुंबई (ति.आ.) १९८०.

७. नेमाडे भालचंद्र, साहित्याची भाषा, साकेत, औरंगाबाद, १९८७.

८. पाटणकर, रा. भा.., सौंदर्यमीमांसा, मौज, मुंबई (ति.आ.) २००४.

९. पाटणकर, वसंत, साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या पद्मगंधा, पुणे, २००६.

१०. पाटील, गंगाधर, समीक्षेची नवी रूपे, मॅजेस्टीक, मुंबई १९८१.

११. मालशे, मिलिंद, आधुनिक, भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन. लोकवाङ्‌मयगृह, मुंबई. १९९५.

१२. रसाळ, सुधीर, कविता आणि प्रतिमा, मौज, मुंबई १९८२.

१३. गणोरकर, प्रभा, डहाके वसंत आबाजी व इतर, (संपा.) बाडू मयीन संज्ञा संकल्पना कोश, ग.रा. भटकळ फाऊंडेशन, मुंबई, २००१.

१४. राजाध्यक्ष, विजया व इतर, (संपा.) मराठी वांड्.मयकोश, खंड ४, (समीक्षा संज्ञा), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

१५. साहित्यशास्त्र उदभव आणि विकास : पांडुरंग वामन काणे.

१६. प्राचीन चीन काव्यशास्त्र : र.रा. कंगले.

१७. प्राचीन काव्यशास्त्र : डॉ. स.रा. गाडगीळ.

१८. साहित्य स्वरूप आणि समीक्षा : वा.ल कुलकर्णी.

१९. भारतीय साहित्यविचार : प्रा. ब.लु. सोनार.

२०. भारतीय साहित्यविचार : ग.त्र्य. देशपांडे.

२१. अभिनव काव्यप्रकाश : रा.श्री. जोग.

*****

## घटक I

# १

# भारतीय साहित्यशास्त्र : संकल्पना व सिध्दांत

**घटक रचना**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ काव्यव्याख्या

१.३ अलंकार विचार

१.४ वक्रोक्ती विचार

  १.४.१ वक्रोक्तीचे प्रकार

१.५ रीतिविचार

  १.५.१ वामनापूर्वीचा रीतिविचार

  १.५.२ वामनाचा रीतिविचार

  १.५.३ रीतिप्रकार

१.६ औचित्य विचार

  १.६.१ आनंदवर्धनाचा औचित्य विचार

  १.६.२ क्षेमेंद्राचा औचित्य विचार

१.७ ध्वनी विचार

१.८ समारोप

१.९ प्रश्न

१.१० संदर्भग्रंथसूची


## १.० उद्दिष्टे

१) भारतीय काव्यशास्त्रातील काव्य लक्षणांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

२) संस्कृत काव्यशास्त्रातील काव्यलक्षणांमागील विचार संप्रदायांचा मागोवा घेणे.

३) काव्याच्या स्वरूप-विशेषणांची सांगोपांग चर्चा घडवून आणणे.

## १.१ प्रास्ताविक

साहित्याच्या स्वरूपाचा भारतीय परिप्रेक्षातून विचार करत असताना साहित्याचे स्वरूप, लक्षण, व्याख्या व वेगवेगळ्या दृष्टिकोनातून साहित्याच्या स्वरूपाचा विचार प्रस्तुत घटकात करण्यात येणार आहे. भारतीय साहित्यशास्त्रात भरतमुनीं पासून अभिनवगुप्त, आनंदवर्धना

पर्यंत वेगवेगळ्या दृष्टिकोनातून हा विचार मांडलेला दिसून येतो. तत्कालात साहित्य मीमांसकांच्या समोर जे साहित्य लेखन उपलब्ध होते त्या त्या काळात त्या त्या साहित्य लेखनाला समोर ठेवून साहित्यविचाराचे विवेचन करण्यात आलेले आहे. भारतीय साहित्य परंपरा पाहता येथे सुरुवातीला नाटक आणि काव्य या दोन वाङमय प्रकारातून वाङमय निर्मिती होत होती. भरतमुनींनी त्यांच्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथातून नाटकाच्या स्वरूपविशेषाचा सविस्तर अभ्यास मांडला. भरतमुनींनी मांडलेला हाच विचार पुढील काळात 'साहित्य' या व्यापक संकल्पनेच्या संदर्भानेही लागू होतो. संस्कृतमध्ये साहित्य विचारांची चर्चा ही काव्यशास्त्र, काव्यविचार, काव्यविमर्श या नावानेही ओळखल्या जाते. संस्कृत मीमांसकांनी साहित्याच्या लक्षणांचा विचारही विविध दृष्टीने केला आहे. त्यात अलंकार विचार, वक्रोक्तीविचार, रीतिविचार, औचित्यविचार आणि ध्वनिविचार अशा मुख्य लक्षांचा अंतर्भाव होतो. संस्कृत साहित्य मीमांसकांची काव्यचर्चा पुढीलप्रमाणे आपण समजून घेणार आहोत.

साहित्य हा शब्द सर्वसाधारणपणे वेगवेगळ्या संदर्भाने नि अर्थाने वापरल्या जातो. दैनंदिन जीवनात साहित्य या संकल्पनेचा व्यापक पातळीवर अर्थ सामग्री असा घेतला जातो. गृहिणींचे स्वयंपाक घरातील साहित्य, कृषीवलांचे शेतीचे साहित्य, कारागिरांचे साहित्य अशा अर्थाने लौकिक व्यवहारात साहित्य हा शब्द वापरला जातो. येथे साहित्य या शब्दाचा सामग्री अथवा साधन असा अर्थ अभिप्रेत असतो. वाङमय वा साहित्य या संज्ञा अनेकदा व्यापक अर्थाने वापरल्या जातात. वाङमय म्हणजे सर्व प्रकारचा वाक् व्यवहार. त्यामध्ये दैनंदिन जीवनातील संभाषण, सभा, चर्चासत्रे, व्याख्याने इत्यादींचा समावेश होतो. साहित्य या संज्ञेत जे जे लिहिले किंवा छापले जाते ते ते असा अर्थ घेतला तर पत्रे, वृत्तपत्रे, जाहिराती, वृत्तांत, अहवाल, शास्त्रीय लेखन, ऐतिहासिक लेखन इत्यादींचा त्यात अंतर्भाव होऊ शकतो. मात्र आपणास साहित्य या संज्ञेचा वरील प्रमाणे अर्थ अभिप्रेत नाही. लेखनाच्या संदर्भात हा शब्द एवढ्या सैलपणे अथवा ढोबळ अर्थाने वापरला जात नाही. येथे विशिष्ट स्वरूपाच्या लेखनासाठी हा शब्दप्रयोग होतो. साहित्याला ललित साहित्य, काव्य, वाङमय इत्यादी समानार्थी शब्द वापरला जातात. संस्कृत साहित्यशास्त्रात यासाठी 'काव्य' हा शब्द योजिलेला दिसतो.

प्रा. वा. ल. कुलकर्णी या ख्यातनाम समीक्षकाने साहित्याची प्रकृती स्पष्ट करताना ललित आणि ललितेतर साहित्याचे वेगळे विशेष नेमकेपणाने टिपलेले आहेत. त्यांच्यामते 'ललित साहित्य हे मूलतः व्यक्तिनिष्ठ, भावप्रेरित, कल्पना प्रतिभानिर्मित, सौंदर्यसिद्धीच्या नियमांचे अनुसरण करणारे, वैशिष्ट्यपूर्ण संघटन असणारे आणि ज्यांच्या आशयाची नेमकी अटकळ बांधता येत नाही असे आहे. तर ललितेतर साहित्य हे मूलतः वस्तुनिष्ठ, बुद्धीप्रेरित, तर्क - अनुमानादींवर भर देणारे म्हणून तर्काधिष्ठित सुसंघटन असणारे, अविष्काराबाबत एक ठराविक साचा असणारे आणि ज्यांच्या आशयाची अटकळ बांधता येईल अशी आशयरूपी सिद्धांताची अवस्थांतरे असणारे असे आहे.

राजशेखर या प्राचीन संस्कृत समीक्षकाने साहित्याचे वर्गीकरण करताना 'वस्तूनिबंधन' आणि 'प्रतिभासनिबंधन' असे साहित्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यांच्या मते 'वस्तूनिबंधन' किंवा 'स्वरूपनिबंधन' म्हणजे असे साहित्य की ज्यात वस्तूचे-विषयाचे यथातथ्य, जसेच्या तसे वर्णन केले जाते. वर्ण्य वस्तू व विषय यावरच हे लेखन सर्वतोपरी

केंद्रित झालेले असते; अशा लेखनात वाच्यार्थाला किंवा निश्चितार्थाला महत्त्व असते. या उलट 'प्रतिभासनिबंधना' त वस्तूचे जसेच्या तसे वर्णन येत नाही. त्यात कवीच्या चमत्कृतिपूर्ण प्रतीतीचे महत्त्व जास्त असते. तेथे जो दिसतो तो कवीच्या प्रतिभेचा विलास असतो. म्हणून तेथे लक्षात येत जातो तो काव्यार्थ.

पाश्चात्य साहित्य मीमांसेनेही Emotive element आणि Thought element म्हणजे भावनात्मक घटक आणि वैचारिक घटक अशा दोहोंच्या आधारे प्रामुख्याने साहित्याचे वर्गीकरण केले आहे. ते करताना, अर्थातच त्याचे वाचकांच्या मनावर होणारे परिणाम प्रामुख्याने ध्यानी घेतलेले आहेत. याबाबतीत जिथे विचार हाच घटक प्रामुख्याने जाणवतो ते ललितेतर, शास्त्रीय साहित्य आणि जिथे भावना-लालित्य हा घटक प्रामुख्याने जाणवतो ते ललित साहित्य असे म्हटले जाते.

**साहित्याचे शब्दरूप:**

साहित्य, संगीत, शिल्प, वास्तू, चित्र इत्यादी सर्वच ललित कलाविष्कार म्हणजे कलावंताने आपल्या अनुभवांची प्रतिभा-कल्पना यांच्या आधारे साधलेली पुनर्निर्मिती होय. सौंदर्य हे या सर्वांमागील सामान सूत्र आहे. मात्र अशी पुनर्निर्मिती साधत असताना कलावंत जे मूलद्रव्य वापरतो त्या मूलद्रव्याच्या स्वरूपामुळे या कलांच्या पुनर्निर्मितीच्या स्वरूपात फरक दिसून येतो. चित्रकार 'रंग' या मूलद्रव्याच्या आधारे आपली कला सादर करतो; तर शिल्पकार प्रस्तराच्या माध्यमातून आपली कल्पना प्रत्यक्षात आणतो. याठिकाणी मूलद्रव्य म्हणजे कलावंत वापरत असलेल्या इंद्रियगोचर वस्तू व प्राथमिक सामग्री होय. शब्द हे साहित्याचे मूलद्रव्य आहे कवी किंवा लेखक आपल्या अनुभवांची पुनर्निर्मिती शब्दांच्या आधारे साधतांना दिसतो. त्यामुळे 'शब्द' या घटकाला साहित्याच्या विश्वात एक अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालेले दिसते. अर्थात केवळ शब्दांना शब्द म्हणून साहित्यात स्थान असत नाही. संपूर्ण अभिप्रायाच्या आविष्कारासाठी त्यांचे विशिष्ट भाषेत रूपांतर व्हावे लागते. असे शब्द किंवा भाषा ही रंग, पाषाण या मूलद्रव्यांप्रमाणे जड, बाह्य वस्तू नसून ती मानवाची स्वयंनिर्मिती आहे. असे वेलेक आणि वॉरेन या समीक्षकांनी जे म्हटले आहे ते फारच लक्षणीय आहे. कारण भिन्न मानव समूह, त्यांचा विशिष्ट संस्कृती वारसा आणि त्यांची अशी खास स्वयंनिर्मित भाषा यातील अतूट संबंध साहित्याच्या बाबतीत मोठा परिणामकारक ठरत असतो.

साहित्याची व्याख्या करणे तसे कठीणच आहे. व्याख्या ही अव्याप्त नसावी तशी ती अतिव्याप्तही नसावी. ती अलंकारिक नसावी तशी भावात्मकही नसावी ही सर्व पथ्ये पाळून काव्याच्या व्याख्या करणे अवघड आहे. कधीकधी काव्याचे स्वरूप, गुणधर्म व वैशिष्ट्ये विस्ताराने सांगणे उचित ठरते. या अर्थाने संस्कृत व पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील कितीतरी व्याख्या अपुऱ्या वाटतात. याचा अर्थ असा नाही की ह्या व्याख्या अर्थपूर्ण नाहीत एकाच व्याख्येत काव्याचे सर्व गुणविशेष एकत्र येणे अवघड असते. त्या दृष्टीने प्रत्येक व्याख्या काव्याचा एखादा विशेष प्रकट करीत असतात. अशाच काही काही व्याख्या पुढीलप्रमाणे

## १.२ काव्यव्याख्या

१. भामह - "शब्दार्थौ सहितौ काव्यम्।।"

शब्द आणि अर्थ यांचे सहितत्व म्हणजे काव्य होय.

२. रुद्रट - "ननु शब्दार्थौ काव्यम्।।"

खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य होय.

३. दण्डी - "शरीरं तावदिष्टार्थव्यवच्छिन्न पदावली।।"

इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्यशरीर.

४. मम्मट - "तत् अदोषौ शब्दार्थौ सगुणौ अनलंकृती पुन: क्वापि।।"

दोषरहित गुणयुक्त क्वचित स्फुट अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य.

५. "रमणीयार्थप्रतिपादक: शब्द: काव्यम्।।"

रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य होय.

## १.३ अलंकार विचार

भामह, दण्डी, उद्भट आणि वामन या सुरुवातीच्या मीमांसकांनी काव्य तत्वाची चर्चा करताना अलंकार विचाराला प्राधान्य दिले आहे. पण अलंकार शब्दाचा आजचा 'उपमादि अलंकार' हा मर्यादित अर्थ या चर्चेमध्ये अभिप्रेत नव्हता. 'काव्यं ग्राह्यं अलंकारात। सौंदर्यम् अलंकार:।।" वामनाने मांडलेल्या या वरील मतांचा विचार करता सौंदर्य हाच अलंकार असा अर्थ या काव्यचर्चेमध्ये अभिप्रेत होता. मात्र वामनाचे हे मत रसवादी मीमांसकांनी पुरेशा सावधानतेने समजून न घेतल्यामुळे अलंकार विचार कव्य चर्चेत बाह्य लक्षण ठरत गेला.

भामहने सौंदर्य किंवा काव्यशोभा या अर्थाने 'अलंकृती' हा शब्द योजिलेला आहे. भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्रा' तही नाट्यसौंदर्य किंवा नाट्यशोभाकर धर्म या अर्थानेच अलंकार हा शब्द योजिला दिसतो. काव्यालंकार, पाठ्यालंकार, नैपथ्यालंकार, वर्णालंकार यांच्या उपस्थितीने प्रयोगालंकार सिद्ध होतो असे तिथे म्हटलेले आहे.

दण्डीने 'काव्यशोभाकरन् धर्मान् अलंकारान् प्रचक्षते' म्हणजे काव्यशोभा निर्माण करणाऱ्या गुणधर्मांना अलंकार म्हणतात असे म्हटले आहे. 'काव्यं ग्राह्यं अलंकारात। सौंदर्य अलंकार:' म्हणजे काव्य हे अलंकारामुळे स्वीकरणीय होते आणि सौंदर्य म्हणजे अलंकार ही वामनाची व्याख्या सर्व प्रसिद्ध आहे. शब्दाचे गुण व अलंकार हे वेगळे आहेत याची वामनाला कल्पना होती म्हणून वामनाने गुण आणले की, काव्यास शोभा येते. त्या शोभेत भर घालणारे अलंकार होत असे म्हणूनच म्हटले आहे. विश्वनाथाच्या मते 'अलंकार हे शब्द आणि अर्थ याना शोभा आणणारे धर्म होता, तथापि ते स्थिर धर्म नव्हेत.' माधुर्य किंवा प्रसाद यासारखे गुणधर्म जसे काही शब्द व अर्थ यांच्या रचनेत कायमचे असतात तसे अलंकार नसतात असे त्यांचे मत आहे. गुण हे स्थिर धर्म आणि अलंकार हे अस्थिर धर्म अशी ही भूमिका होय. 'अस्थिर असल्याने ते काव्यात आवश्यक असले पाहिजेत असेही नाही' असे विश्वनाथाने पुढे म्हटले आहे. रसध्वनीचा पुरस्कर्ता मम्मटही अलंकाराचे महत्त्व मान्य करतो. पण

त्यांच्या मते प्रकट अलंकार काव्यात नसले तरी रसहानी होत नाही. रसयुक्त काव्यात अस्फुट अलंकार असतातच. मम्मट गुणांना अचल धर्म तर अलंकारांना चल धर्म मानतो.

रुय्यक या मीमांसकाने त्यांच्या 'अलंकारसर्वस्व' या ग्रंथात अलंकारासंबंधी नंतरच्या काळात रूढ झालेल्या अर्थाचा पाया ठरावे असे विवेचन केले आहे. तो म्हणतो एखादा वाक्यार्थ सांगण्याचे विविध प्रकार आहेत ते म्हणजे अलंकार होत. आनंदवर्धन या ध्वनि संप्रदाय निर्मात्या मीमांसकाच्या मतेही 'बोलण्याचे म्हणजे मनातील अभिप्रेत अर्थ व्यक्त करण्याचे पर्याय असंख्य असतात त्यांचे प्रकार म्हणजे अलंकार होत.' स्त्रीमुख आणि चंद्र हे दोन शब्द घेतले तर त्यातील संबंध स्पष्ट करताना चंद्रासारखे मुख म्हटल्याने उपमा, मुखचंद्र म्हटल्याने रूपक, मुख की चंद्र म्हटल्याने संदेह, मुख्य नव्हे तर चंद्र असे म्हटल्याने अपन्हुती असे वेगवेगळे अलंकार निर्माण होऊ शकतात. कुंतकाने आपल्या 'वक्रोक्तिजीवित' या ग्रंथात अलंकार व वक्रोक्ती यांचे समीकरण केलेले असून, त म्हणजे 'विदग्धांच्या पद्धतीचे बोलणे' असे म्हटले आहे.

सौंदर्य हे काव्याचे व्यवच्छेदक तत्त्व ठरते आणि त्यात वृद्धी करण्याचे कार्य अलंकार करते. डॉ स. या. गाडगीळ म्हणतात, "तत्त्वज्ञान, इतिहास, शास्त्र आदी विचारप्रधान वाङमयापासून काव्याचे भिन्नत्व केवळ सौंदर्य तत्वामुळेच दाखविता येते. हे अमान्य होऊ नये हे काव्यसौंदर्य कवीच्या वैशिष्ट्यपूर्ण शब्दार्थ योजनेमुळे प्रकट होते. ही वैशिष्ट्यपूर्ण शब्दार्थ योजना म्हणजे अलंकार. 'प्रियेचे मुख्य सुंदर आहे' असे साधे विधान करण्याऐवजी कवी जेव्हा 'कोणता मानू चंद्रमा भूवरीचा की नभीचा' असे म्हणतो तेव्हा मूळच्या साध्या विधानाला रमणीयता प्राप्त झाल्याचे दिसून येते. अलंकार याचा व्यावहारिक अर्थ दागिना असा होतो दागिन्याचे कार्य स्त्री सौंदर्यात भर पाडणे असते. तसेच अलंकार काव्यसौंदर्य वाढवत असते. कवी काव्याचे सौंदर्य खुलविण्यासाठी शब्दार्थाची वैशिष्ट्यपूर्ण रचना करतो. ही वैशिष्ट्यपूर्ण शब्दार्थाची योजना करण्यासाठी तो 'अलंकार' तत्वाचा आधार घेतो. त्यामुळे सौंदर्य निर्मिती होते. अर्थात अलंकार म्हणजे सौंदर्य नव्हे तर सौंदर्य वृद्धी करणारे ते एक माध्यम आहे, तत्व आहे. सौंदर्य हे साध्य तर अलंकार हे साधन आहे. काव्यशरीर म्हणजे शब्दार्थ आणि त्यांचे सौंदर्य वाढवणारे ते अलंकार असे अलंकाराचे स्वरूप ठरून गेले. सौंदर्य हा काव्याचा प्राण आणि अलंकार हे सौंदर्याचे जनक म्हणून काव्याचे प्राणभूत तत्त्व असे मानण्यात आले; परंतु काही साहित्यशास्त्रकार यावर आक्षेप घेतात. त्यांच्या म्हणण्यानुसार अलंकाराशिवाय काव्य निर्माण होऊ शकते. मुळातच स्त्री जर सौंदर्यवती, लावण्यवती असेल तर तिला दागिन्याची गरज नसते. त्याचप्रमाणे श्रेष्ठ दर्जाच्या काव्याला सौंदर्य निर्मितीसाठी अलंकाराची गरज नाही अशा काव्यात ते उपजतच असते. असे असले तरी काव्याचे अर्थात साहित्याचे अलंकार हे महत्त्वाचे लक्षण म्हणून मान्यता पावलेले आहे.

## १.४ वक्रोक्ती विचार

दररोजच्या व्यवहारातील बोलण्याच्या पद्धतीपेक्षा कवी-लेखकाची सांगण्याची पद्धत वेगळी असते. या बोलण्यातील भिन्नत्वाला साधारणतः वक्रोक्ती असे म्हणतात. वक्र किंवा सरळ नसणे असे बोलणे म्हणजे वक्रोक्ती. याचा अर्थ त्यात केवळ वक्रता असते असे नव्हे तर ती

एक बोलण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती असते. वक्रोक्ती तत्व प्रवर्तक म्हणून कुंतकास मान दिला जातो. परंतु कुंतकाच्या पूर्वीही भामह, दण्डी, वामन आदींनी वक्रोक्ती विषयी विचार मांडले आहे.

भामह अलंकार तत्त्व मांडताना वक्रोक्तीचा विचार करतो. तो अतिशयोक्तीला वक्रोक्ती समजतो. 'अलंकाराचे मूळ वक्रोक्तीत आहे' हा सिद्धांत त्याने मांडला आहे.

"सैषा सर्वेव वक्रोक्ति: अनयार्थी विभाष्यते।

यत्मोऽस्यां कविना कार्य: कोऽलंकारोनया विना।।"

अर्थात काव्यात सर्वत्र वक्रोक्ती चे अस्तित्व दिसून येते. वक्रोक्तीने अर्थ शोभून दिसतो व वक्रोक्ती शिवाय अलंकार होत नाही. भामहने अलंकाराचे तत्व म्हणून वक्रोक्ती चा विचार केला आहे. वक्रोक्तीमुळे सामान्य शब्दांचे विभावन होते. त्याचे सौंदर्यपूर्ण कव्यार्थात रूपांतर होते. म्हणजेच काव्यार्थ अविष्कृत होतो . वक्रोक्ती मुळेच सामान्य शब्दार्थना काव्यरूप प्राप्त होते असे भामहला अभिप्रेत आहे.

दण्डी सर्व वाङमयाला एक स्वभावोक्ती व दुसरा वक्रोक्ती अशा दोन विभागात विभाजित करतो. स्वभावोक्तीला सोडून बाकी सर्व अलंकारांना तो वक्रोक्ती समजतो.

वामनाने वक्रोक्तीला एक अर्थालंकार मानले. गुणयुक्त शब्दांच्या विशिष्ट रीतीतून सौंदर्याचा साक्षात्कार होतो. अर्थात गुण हे शब्दांच्या ठाई सौंदर्य निर्माण करतात व ते अलंकार वाढवतात असे वामनाचे मत आहे. रुद्रट वक्रोक्तीला शब्दालंकार म्हणून स्वीकारतो, तर आनंदवर्धन तिचा अर्थालंकार म्हणून स्वीकार करतो. मम्मट अतिशयोक्ती अलंकार इतरांस प्राणभूत मानतो, तर भामहने अतिशयोक्ती आणि वक्रोक्ती एकच मानल्या आहेत. एकंदरीत वरील साहित्यकारांच्या मतावरुन लक्षात येते की वक्रोक्ती हे काव्याचे मुख्य तत्त्व आहे.

### १.४.१ वक्रोक्तीचे प्रकार:

कुतकाने आपल्या 'वक्रोक्तिजीवित' या ग्रंथात वक्रोक्ती चे सहा प्रकार स्पष्ट केलेले आहेत. बारीकसारीक भेदावर आधारलेले हे वर्गीकरण आहे. काव्याचा सर्वात छोटा घटक म्हणजे शब्द आणि त्या शब्दापासून संपूर्ण काव्यकृतीबद्दल जाणाऱ्या वक्रोक्तीचा विचार कुंतकाने येथे केलेला आहे.

**१) वर्णविन्यासवक्रता -** अनुप्रास, यमक इत्यादी शब्दनिष्ठ चमत्कृतीतून निर्माण होणाऱ्या वक्रोक्तीस वर्णविन्यासवक्रता असे म्हणतात.

**२) पदपूर्वार्धवक्रता -** प्रतिपदिकांचा म्हणजे मूळ शब्दांचा चमत्कृतीपूर्ण उपयोग करून येथे वक्रता साधलेली असते. इथे श्लेषाची उदाहरणे घेता येईल. 'औषध न लगे मजला' या प्रकारातच रूढीवैचित्र्य वक्रता, पर्यायवक्रता (अनेक पर्यायातून एका विशिष्ट शब्दाची निवड करून चमत्कृती निर्माण करणे), उपचार वक्रता (गौणी लक्षणेवर आधारित चमत्कृती), विश्लेषण वक्रता असे काही इतर भेद सांगितले आहेत.

**३) प्रत्यय वक्रता -** यात व्याकरणाची संबंधित चमत्कृतीची योजना येते. नाम व धातू यांना लागणाऱ्या प्रत्ययांच्या वैशिष्ट्यामुळे उत्पन्न होणारे चमत्कृतीतून येथे वक्रोक्ती निर्माण होते. या प्रकारातही पुरुषवक्रता, संख्यावक्रता, कारकवक्रता असे भेद येतात.

**४) वाक्य वक्रता -** या प्रकारात रस आणि भाव यांच्या आविष्कारातून जाणवणारी चमत्कृती दिसून येते. कुंतकाच्या मते, वाक्यवक्रता हजारो प्रकारांची असून तिच्यात सर्व अलंकारांचा अंतर्भाव होतो.'

**५) प्रकरण वक्रता -** प्रकरण वक्रता म्हणजे महाकाव्य किंवा नाटक यासारख्या प्रबंध रचनेतील प्रसंग त्यांची चमत्कृतीपूर्ण योजना. विशिष्ट परिणाम साधण्यासाठी कवी जुन्या परिचित कथांतील काही प्रसंगात बदल घडवितो आणि चमत्कृती संभवते या प्रकाराला प्रकरण वक्रता म्हणतात.

**६) प्रबंधवक्रता -** वक्रोक्तीच्या या प्रकारात संपूर्ण कलाकृतीचा विचार केलेला आहे. प्रधान रसाच्या अनुरोधाने समुचित अशा इतर रसांची योजना करून साधली जाणारी चमत्कृती असे याचे स्पष्टीकरण केलेले दिसते. 'यासाठी पहिल्या पाचही प्रकारातील वक्रता विद्यमान असणे आवश्यक आहे' असे कुंतकाचे मत आहे.

## १.५ रीतिविचार

रीती या शब्दाचा अर्थ शैली असा होतो रीतीचा रूढ अर्थ असाही होतो अविष्काराचे तंत्र किंवा पद्धती या अर्थाने ही प्रीती हा शब्द वापरला जातो इंग्रजीत तरी तिला style असे संबोधले जाते. संस्कृतातील रीतिविचार वामनाच्या नावावर मोडतो. याचा अर्थ असा नव्हे की, वामनाच्या आधी या दृष्टीने काव्याचा विचारच झालेला नव्हता तर तसा विचार झालेला होता. वामनाचा उल्लेख होतो कारण त्याने रीतिविचाराला काव्याच्या आत्मपदाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

### १.५.१ वामनापूर्वीचा रीतिविचार:

भरतमुनी- भरतमुनींनी नाट्यशास्त्रात रीती या शब्दाची योजना केली नाही. पण काव्याच्या गुणदोषाचे विवेचन केलेले आहेत. नाटकाच्या संदर्भात त्यांनी केलेला वृत्ती विचार हा काव्याचा रीती विचार होऊ शकेल. अभिप्रेत मनोव्यापार अभिनयातून व्यक्त करण्यासाठीच्या त्यांनी चार नाट्य वृत्ती सांगितले आहे. भारती, सात्वती, आरभटी आणि कौशिकी अशी त्यांची नावे दिली आहेत. तेव्हा अभिनयाद्वारे आविष्काराच्या या पद्धतीचा होत ज्या नाटकात वृत्ती त्या काव्यात रीती. आनंदवर्धन आणि मम्मट यांनी म्हणून ह्या दोन्हींना एकच मानले आहे.

**भामह -** वक्रोक्तीचे विवरण करताना भामहने 'प्रतिभावान कवींची अविष्कार पद्धती' असे म्हटले आहे शब्द गुणांचे त्याला भान आहे. साध्या शब्दांना अर्थ असतो पण त्याला रसयुक्त काव्य म्हणता येणार नाही. 'काव्य होण्यासाठी यावर कविव्यापाराचा संस्कार व्हायला हवा' असे त्याचे म्हणणे आहे. अविष्कार पद्धती आणि शब्दगुण याची जाणीव ही पर्यायाने रीतीच्या पूर्वरुपाची जाणीव म्हणता येईल. त्याने या दृष्टीने काव्यप्रकार म्हणून वैदर्भ व गौड

या शब्दांचा उल्लेख केला आहे. शिवाय प्रसाद, माधुर्य व ओज या गुणांचा व १० दोषांचा शब्दांच्या संदर्भात तो उल्लेख करतो.

**दण्डी -** दण्डी यांनी केलेला मार्ग विचार म्हणजे रीती विचारच होय. अविष्काराची विशिष्ट पद्धत असाच त्याला मार्ग या शब्दाचा अर्थ अभिप्रेत दिसतो. वैदर्भ व गौडीय मार्गाचा त्याने विस्ताराने विचार केला आहे. त्याने ही दहा गुणांचा उल्लेख केला असून ते जसे शब्द गुण तसे अर्थ गुणही आहेत. अशा सर्व गुणांनी युक्त तो त्याच्या मते वैदर्भ मार्ग. दण्डीच्या मते वैदर्भ मार्गाचा भर माधुर्य गुणांवर तर गौडीय मार्गाचा भर ओजो गुणावर असतो. तसेच तो अर्थ गुणांना उक्ती वैशिष्ट्यांचे विलास मानतो.

### १.५.२ वामनाचा रीतिविचार:

नवव्या शतकात होऊन गेलेल्या वामनाने काव्याचे आत्मतत्व म्हणून रीती तत्त्वाचा पुरस्कार केला. काव्यात्मा ही संकल्पना प्रथम त्याने रूढ केली. रीतिरात्मा काव्यस्य" रीती हाच काव्याचा आत्मा होय. असे काव्यामध्ये रीतीने स्थान निश्चित करून त्याने रीती म्हणजे काय हे सांगतांना "विशिष्ट पदरचना रीति" अशी रीतीची व्याख्या केली आहे. येथे विशिष्ट पदरचना म्हणजे शब्दार्थाची सौंदर्यपूर्ण केलेली योजना. ही योजना सिद्ध होण्यासाठी काव्यातील शब्दार्थावर गुणा लंकाराचे संस्कार व्हावयास हवे. अशा संस्कारित शब्दांची गुणविशिष्ट पदरचना करण्यासाठी जे तत्त्व लागते ते तत्व म्हणजे रीती. काव्यात योजिलेले शब्द, त्यांच्या अर्थ आणि उपयोजित शब्दार्थाच्या रचनेत काही विशिष्ट प्रकारचे गुण निदर्शनास येतात. त्यामुळे काव्य आणि इतर गद्यलेखन यातील भिन्नत्व लक्षात येते. शब्दार्थ आणि त्यांच्या रचनेत प्रसाद, माधुर्य, ओज, सुश्लिष्टता, प्रौढी, अर्थव्याप्ती आदी गुण असतात. काव्य या गुणांनी युक्त असले पाहिजे तरच त्याला ककव्यत्व प्राप्त होते, काव्याचा सौंदर्यपूर्ण आविष्कार होतो. अन्यथा त्याच्या ठिकाणी सौंदर्याचा आविष्कार होत नाही. अर्थात शब्दांची विशिष्ट पद्धतीने केलेली रचना येथे अपेक्षित आहे. ते शब्द गुणयुक्त असावेत असे वामनाला अपेक्षित आहे.

या संदर्भात डॉ स. रा. गाडगीळ आपल्या 'काव्यशास्त्र प्रदीप' या ग्रंथात म्हणतात, "रीती हा काव्याचा आत्मा आहे असे म्हणत असताना त्याला केवळ काव्याचे बाह्यांग अगर शब्दसौष्ठव अथवा पदलालित्य अभिप्रेत नाही. म्हणूनच त्याने विवेचन केलेले गुण केवळ बाह्यांगाचे गुण नाहीत. अविष्काराच्या ठिकाणी प्रसाद, माधुर्यादी गुण असले तरच त्यातून रसनिष्पत्ती होऊ शकेल. सौंदर्य हा काव्याचा प्राण आहे हे वामनाने अन्यत्र मान्य केलेलेच आहे. हे सौंदर्यतत्व काव्याच्या ठिकाणी कशामुळे येते हे सांगण्यासाठी त्यांनी रीतिविचाराचा पुरस्कार केला. वामनाचा रितिविचार म्हणजे गुणविचार होय, आणि गुण हे काव्य सौंदर्याचे निर्माते असल्याने गुण विचार म्हणजे काव्यातील सौंदर्य निर्मितीचा विचार होय. इतक्या व्यापक दृष्टिकोनातून पाहिल्यास 'रिती हाच काव्याचा आत्मा' या वामनाच्या विचाराचे रहस्य ध्यानात येऊ शकेल.

असे असले तरी रिती तत्त्वाच्याही काही उणिवा आहेत. वामनाने प्रतिपादिले 'रिती म्हणजे काव्याचे आत्मतत्व' यावर आक्षेप नोंदवताना रा. श्री. जोग आपल्या 'अभिनव काव्यप्रकाश' या ग्रंथात म्हणतात, "काव्याचा आत्मा म्हणून रीतिचे महत्त्व पुढे कोणीही मान्य केले नाही. कारण जो अक्षेप अलंकारावर घ्यावयाचा तोच रीतीवरही घेता येतो. शब्द व त्याचा अर्थ

यांच्या विशिष्ट रचनेवर अवलंबून असणारी रीती ही त्यांच्यापेक्षा अधिक व्यापक व अधिक महत्त्वाची असली तरी अखेर त्याच्यावर म्हणजे काव्याच्या बाह्यांअगावर अवलंबून आहे. रीतीची कल्पना शब्दालंकार किंवा अर्थालंकार यापेक्षा अधिक व्यापक आहे हे कोणालाही मान्य करावे लागेल. व वामनाने या कल्पनेस एक सामान्य उपत्तीचे स्वरूप दिले आहे हेही खरे. तथापि काही झाले तरी ती शब्दार्थच्या गुणांवर अवलंबून आहे आणि शब्दार्थ हे तर काव्याचे केवळ शरीर होते ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे. मानवी प्राण्यांचे रूपक चालून बोलावयाचे झाल्यास गौरवर्ण, रेखीव बांधा किंवा गतीविभ्रम या गुणांनी एखाद्या मानवी आकृतीत कितीही सौंदर्य आले तरी ते काही त्या आकृतीतील आत्माभूत तत्व होऊ शकत नाही. इतकेच काय, गुण अंतरात्म्याचे असले तरी ते गुणच राहणार तो अंतरात्मा कसा होणार. अलीकडील परिभाषेत बोलायचे झाल्यास रीति विचारात 'कसे सांगितले आहे' याची चर्चा येते पण 'काय सांगितले आहे' त्याची चर्चा येत नाही. जे सांगितले ते अर्थातच 'कसे सांगितले आहे' यापेक्षा अधिक मूलभूत आहे. रीतीचा संबंध केवळ कसे सांगितले आहे त्याच्याशी येतो. म्हणजे बाह्य सजावटीशी येतो. ते काव्याचे आत्मतत्व होत नाही."

### १.५.३ रीतिप्रकार:

वामनाच्या पूर्वीही रीती भेद होतेच पण ते प्रांतिक वैशिष्ट्यांचे निदर्शक होते. उदा. विदर्भवासियांची वैदर्भी, बंगालची गौडी इ. वामनाने काव्यरचनेतील गुणभेदानुसार त्यांची मांडणी केली ही बाब उल्लेखनीय आहे. वामनाने केलेली रीती प्रकारची विभागणी पुढीलप्रमाणे आहेत.

**१) वैदर्भी रीती -** सर्वच गुण जिथे उपस्थित आहे ती वैदर्भी रीती होय. मराठीतील बालकवींची कविता वैदर्भी रीती चे उदाहरण म्हणता येईल.

**२) गौडी रीती -** ओज आणि कांती हे गुण जिथे प्रामुख्याने जाणवतात ती गौडी रीती होय. मराठीतील गोविंदाग्रज, विंदा करंदीकर यांची कविता गौडी रीतीचे उदाहरण म्हणता येईल.

**३) पांचाली रीती -** माधुर्य आणि सुकुमारता हे गुण जिथे प्राधान्याने जाणवतात ती पांचाली रीती होय. भा. रा. तांबे यांची कविता पांचाली रीतीचे उदाहरण म्हणता येईल.

## १.६ औचित्य विचार

औचित्य या शब्दाचा व्यावहारिक अर्थ उचित, अनुरूप, योग्य असा होतो. रत्न कोंदणात असणे, कंकण हातात असणे, मुकुट डोक्यावर असणे, बागेत कारंजी असणे, उद्यानात फुलझाडांची झुडपे असणे हे औचित्य आहे; तर याउलट रत्न उकिरड्यावर असणे, कंकण कानात घालने, मुकुट हातात धरणे, माळरानावर कारंजी असणे, उद्यानात दगडधोंडे असणे हे अनौचित्य आहे. औचित्य हे जसे साहित्य-कला इत्यादी क्षेत्रात आहे तसेच ते व्यवहारातही आहे.

अकराव्या शतकात होऊन गेलेल्या क्षेमेंद्राला औचित्य विचाराचे प्रवर्तक मानले जाते. असे असले तरी त्याच्या पूर्वी रुद्रट, उद्भट, आनंदवर्धन, कुंतक, इ. मीमांसकांनी औचित्याविषयी विचार विचार मांडले आहेत. 'काय सांगितले आहे' यापेक्षा 'कसे सांगितले आहे' याला महत्त्व देणारे हे तत्त्व आहे. भरतमुनींनी नाटकातील पात्र, त्यांची वेशभूषा, प्रकृती, भाषा आदींच्या

औचित्याचे विस्तृत विवेचन नाट्यशास्त्र या ग्रंथात केलेले आहे. जसे अभिनय करताना वेशभूषा वयानुरूप असावी, शारीरिक हावभाव संवादानुसार, वेशभूषेनुसार असावेत इत्यादी. 'एखाद्या वस्तूची सुयोग्य मांडणी त्या वस्तूचे सौंदर्य वाढवते' भामहचे हे मत औचित्यतत्वाकडे संकेत करणारे आहे. काव्यात अनुप्रास वृत्तीचा प्रयोग औचित्याचे ध्यान ठेवून करावा असे रुद्रटाला वाटते.

### १.६.१ आनंदवर्धनाचा औचित्य विचार:

आनंदवर्धनाने रसाशी औचित्याचा घनिष्ठ संबंध दर्शवून त्याला सिद्धांताची प्रतिष्ठा मिळवून दिली. आनंदवर्धन रसध्वनीस काव्याचे आत्मतत्त्व मानतो. या रसात औचित्य ही त्याला अत्यावश्यक बाब वाटते. त्याच्या मते, 'वस्तू व अलंकार ही रसाची बाह्य उपकरणे असून ती रसाहून गौण आहेत. रस पुष्ट करण्यासाठी ती काव्यात येतात. आनंदवर्धनाने काव्यात रसभंग होऊ नये असे म्हटले आहे. त्यांच्या मते, "अनौचित्य हे रस भंगाचे कारण आहे. अनौचित्याशिवाय रसभंगाचे अन्य कोणतेही कारण नाही. प्रसिद्ध औचित्याची योजना हे रसाचे परमरहस्य आहे." वस्तू सुंदर असूनही तिची चुकीच्या ठिकाणी योजना केल्यास सौंदर्यहानी होते. हेच अनौचित्य होय. करुण रसामध्ये ओजस्वी शब्दरचना, दीर्घ समास आणि अलंकाराचा सुकाळ या गोष्टी अनौचित्य आहेत. म्हणून तिथे रसभंग घडतो. आनंदवर्धनाने अलंकारौचित्य, गुनौचित्य, संघटनौचित्य, प्रबंधौचित्य, रीतिऔचित्य व रसौचित्य यांचे विस्तृत व उदाहरणासह चर्चा करून औचित्य तत्वाचे स्वरूप विशद केले आहे. काव्यातील अलंकार आणि गुण रसपोषक असावेत. पदाची योग्य व औचित्यपूर्णा योजना केल्याने रसपरिपोष होतो. कथानक, घटना, प्रसंग, पात्रे, त्यांची भाषा या सर्व पैलूंचा औचित्यामध्ये विचार केला गेला आहे.

### १.६.२ क्षेमेंद्राचा औचित्य विचार:

क्षेमेंद्राने औचित्य विचाराचे विस्तृत विवेचन केलेले आहे. त्यांच्या मते 'औचित्य हे तत्व काव्याच्या आनंददायी आस्वादात चमत्कार उत्पन्न करते. ते रससिद्ध काव्याचे स्थिर जीवित असून काव्यगत अलंकार व गुण याची गणना करणे व्यर्थ आहे. ज्याला जे अनुरूप असते त्याला उचित म्हणतात व त्या उचिताचा जो धर्म (भाव) त्याला औचित्य म्हणतात.' अशी क्षेमेंद्राने औचित्याची व्याख्या दिलेली आहे. "उचितस्य भाव: औचित्यम्।" क्षेमेंद्राने औचित्याला रसाचे जीवित मानले आहे. "औचित्यस्य रसजीवितभूतस्य" औचित्य हे तत्त्व त्याने रसाला पूरक तत्व म्हणून मांडले आहे. औचित्याने रससिद्धी होते आणि ते काव्याचे स्थिर जीवित आहे. शब्द, अर्थ, अलंकार, रस आदींच्या संदर्भात काय उचित तसेच काय अनुचित याचा विचार म्हणजे औचित्य विचार होय. क्षेमेंद्राने काव्याच्या लहान अंगापासून त्याच्या विशाल स्वरूपाचा विचार करून औचित्याचे २८ अंगे स्पष्ट केली आहेत. शब्द, काव्यशास्त्रीय तत्वे, चरित्रसंबंधी व परिस्थितीसंबंधी अशी चार प्रकारांत विभागणी करून क्षेमेंद्राने त्या २८ अंगांचा सूक्ष्म विचार मांडला आहे. यावरून काव्याचा आशय आणि आविष्कार यासंबंधी औचित्याचा विचार क्षेमेंद्राने सूक्ष्मपणे केलेला आहे ते स्पष्ट होते.

प्रा. रा. श्री. जोग यांनी क्षेमेंद्राची भूमिका थोडक्यात स्पष्ट केली आहे ते लिहितात, "औचित्य हे रसाचे जीवित आहे व त्यामुळे काव्यस सौंदर्य येते. कोणतीही गोष्ट उचित असेल तर ती सुंदर दिसते नाही तर सारा विरस होतो. कोणत्याही काव्यात हे अत्यंत आवश्यक असे

आहे, त्यावाचून भागणार नाही. त्यामुळे काव्यात औचित्य हेच मुख्य तत्त्व होय. औचित्याची व्याख्या अगदी साधी आहे. योग्य, अनुरूप, साजेशी गोष्ट म्हणजे उचित गोष्ट होय. ती तशी असणे म्हणजे औचित्य होय. कोणत्याही संदर्भात उचित गोष्ट कोणती हे ठरविणे अर्थात सहृदयच जाणू शकतात व त्यांच्यावरच ते सोपवले पाहिजे." इथे औचित्य ही संकल्पना वस्तुसापेक्ष नसून व्यक्तीसापेक्ष असते ही अडचणीची बाब लक्षात ठेवायला हवी. दलित साहित्यात चित्रित होणारे जीवन, त्याची भाषा या गोष्टी ते जीवन जगणाऱ्यांच्या दृष्टीने उचित असतील पण सर्वसामान्य वाचकाला त्या अनुचित म्हणून खटकल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा हा सिद्धांत निरपेक्ष नव्हे. त्याची ही मर्यादा नजरेआड करता येण्याजोगी नव्हे.

डॉ वा. के. लेले यांनी या सिद्धांत संबंधी पुढील चार विशेष सांगितले आहेत

१. साहित्याचे प्रत्यक्ष मूल्यमापन करणारी विचारसरणी आधी नव्हती ती उणीव क्षेमेंद्राने भरून काढली.

२. औचित्य सिद्धांत म्हणजे समीक्षकांच्या हाती पडलेले एक विश्वसनीय निकष होय.

३. यामुळे कवी व समीक्षक यांच्यातील तेढ कमी होऊ शकते.

४. औचित्याच्या आधारे क्षेमेंद्राने समीक्षेचे काही पाठ दिले आहेत. त्यामुळे गुण-दोष समजण्याची रसिकांत पात्रता येऊ शकते.

## १.७ ध्वनी विचार

'ध्वन' धातू आणि 'इ' प्रत्यय यांच्या संयोगातून दोन्ही शब्द निर्माण होतो. कानाला ऐकावयास येणारा नाद हा त्याचा रूढार्थ आहे. संस्कृत काव्यशास्त्रात ध्वनी सिद्धांताला एक वेगळे महत्त्व आहे.

नवव्या शतकातील आनंदवर्धनाने 'ध्वन्यालोक' या ग्रंथातून ध्वनी सिद्धांत मांडला आहे. "काव्यस्य आत्मा ध्वनि" अर्थात ' ध्वनी हाच काव्याचा आत्मा आहे.' अशी काव्याची व्याख्या करताना आनंदवर्धनाने ध्वनीचे काव्यातील स्थान निश्चित केले. ध्वनीचा संबंध शब्दांच्या व्यंजना शक्तीशी आहे, असे मत या सिद्धांताने मांडले. 'रसनिष्पत्ती हे काव्याचे अगर नाटकाचे अंतिम उद्दिष्ट आहे' हा भरतमुनींचा सिद्धांत आनंदवर्धनाला मान्य होता. कवीची विदग्धोक्ती किंवा वक्रोक्ती साध्या शब्दार्थांना रमणीय रूप प्रदान करते. पण या कविव्यापारात शब्दांचा वाच्यार्थ कुचकामी ठरत होता. काव्यरचनेत शब्दांच्या वाच्यार्थाला फारसे महत्त्व नाही. शब्दांची अमुख्यवृत्ती हीच कवीव्यापाराला पायाभूत आहे, हे उद्भटाने जाणले. शब्दांच्या ह्या अमुख्यवृत्तीच्या विवेचनातून ध्वनी सिद्धांत साकार झाला. ध्वनी म्हणजे शब्दांची सूचन शक्ती किंवा सूचकता होय.

रसतत्वाप्रमाणेच ध्वनीला काव्याचा आत्मा म्हटले गेले. रस हे शब्दार्थाच्या द्वारे प्रतीत होणारे तत्व आहे. शब्दार्थातून ध्वनीत रसप्रतीती म्हणजे रसध्वनी होय. क्रोध, भय, शोक, प्रेम, रती, आदी शब्द उच्चारल्यानंतर त्याचा वाच्यार्थ प्रतीत होतो परंतु त्याची भावानुभूती येत नाही कारण ती वाच्यार्थाच्या पल्ल्याड असते. ती ध्वनित होत असते आणि अशा ध्वनित झालेल्या भावांनुभूतीतून रसनिष्पत्ती होते. म्हणून रसप्रतीतीच्या मुळाशी ध्वनीतत्व

असल्यामुळे 'ध्वनी हा काव्याचा आत्मा' असा सिद्धांत प्रस्थापित झाला. रा. श्री. जोग यांनी आपल्या 'अभिनव काव्यप्रकाश' या ग्रंथात ध्वनीकारांचे मूळ म्हणणे पुढील शब्दात मांडले आहे, "काव्याला दोन प्रकारचा अर्थ असतो. एक वाच्यार्थ व दुसरा प्रतीयमान म्हणजे सूचित, पहिला कळला की मागाहून यावरून समजणारा असा अर्थ. हा जो दुसरा अर्थ महाकवींच्या काव्यात दिसून येतो तोच काव्याचा आत्मा होय." याचे अधिक विवेचन आनंदवर्धनाने केले आहेत ते पुढीलप्रमाणे, 'वाच्यार्थ निराळा, प्रतीमान अर्थ निराळा, वाच्यार्थ शरीर तर त्यावरून काव्यात व्यक्त होणारा ध्वनित अर्थ हा त्याचा आत्मा. असा ध्वनित अर्थ काव्यात असतो म्हणून ते काव्य होते. ध्वनित अर्थ वाच्यार्थापेक्षा वेगळा असतो. किंबहुना त्याच्याशी विरुद्ध ही असू शकतो. वाच्यार्थावरून तो समजतो पण त्यापेक्षा तो सूक्ष्म असतो. देश कालपरत्वे म्हणजे संदर्भाप्रमाणे तो बदलतो . उदा 'सूर्य अस्ताला गेला' या साध्या विधानाचा वाच्यार्थ सृष्टीतील एक घटना सांगतो. ध्वनितार्थ मात्र संदर्भानुसार प्रत्येकाला वेगवेगळा अर्थ सूचित करतो. जसे गुराख्याला गुरे घरी नेण्याची सूचना मिळेल, मंदिरातील पुजाऱ्याला संध्या पूजनाची सूचना मिळेल, गृहिणीला संध्याकाळच्या गृह कर्माची सूचना मिळेल, अभिसारीकेला प्रियकराच्या मिलनाची सूचना मिळेल, चोराला चौर्यकर्म करण्याची वेळ समीप आल्याची सूचना मिळेल. शब्दांचा व्यंजना व्यापारच येथे महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतो. म्हणून ध्वनी हे काव्याचे एक महत्त्वाचे लक्षण ठरते.

**ध्वनीचे प्रकार:**

वस्तुध्वनी अलंकारध्वनी, रसध्वनी हे ध्वनी चे तीन प्रकार आहेत. "रसाला रसध्वनी म्हणून ध्वनी सिद्धांतात सामावून घेण्याचा प्रयत्न आनंदवर्धनाने केला आहे. पण रसास सामावून घेण्याइतकी व्यापकपण ध्वनित आहे असे वाटत नाही. रसाविष्कारात सहाय्यक ठरणारी अभिव्यक्तीची एक उत्कृष्ट पद्धती हे ध्वनीचे योग्य स्थान होय. चारुता व सौंदर्य हेच काव्याचे आत्मतत्व होय. हे चारुत्व ध्वनी शिवाय अन्य कारणांनीनेही येऊ शकेल. रीती, वक्रोक्ती, गुण अलंकार इत्यादी काव्यगत सौंदर्याच्या सर्व घटकांत ध्वनीचे अग्रस्थान राहील यात मात्र शंका नाही. ध्वनीस काव्याचा आत्मा मानणारे आनंदवर्धन देखील रसध्वनीस श्रेष्ठ ध्वनी प्रकार मानून रसाचे महत्त्व दुसऱ्या प्रकारे मान्य करतात. रसानुभूतीसाठी व्यंग्यार्थ अगर धन्यार्थच उपयुक्त ठरतो, म्हणून रसानुभूतीचा मूलाधार सुद्धा ध्वनी होय, हा आनंदवर्धनाचा अभिप्राय रस आणि ध्वनीच्या अन्योन्य पोषक व घनिष्ठ संबंधावर प्रकाश टाकतो." ही ब. लु. सोनार यांनी ध्वनी आणि रस यांच्या संबंधाने केलेली चिकित्सा योग्य ठरते.

## १.८ समारोप

थोडक्यात भारतीय काव्यशास्त्रतील काव्य लक्षणांचा विचार करता हा विचार खूप विस्तृत आणि व्यापकपणे मांडण्यात आलेला दिसून येतो. येथे एकच एक तत्व व्यवच्छेदक मानता येत नाही; तर प्रत्येक मीमांसकाने मांडलेल्या मताचा आदरपूर्वक विचार करून वरील काव्यलक्षणांचा आढावा घ्यावा लागतो.

## १.९ प्रश्न

**दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) अलंकार विचाराचा सविस्तर आढावा घ्या.

२) ध्वनी हा काव्याचा आत्मा आहे या मताचा मागोवा घ्या.

**टीपा लिहा.**

१) वक्रोक्ती हे काव्य लक्षण स्पष्ट करा.

२) क्षेमेंद्राचा औचित्य विचार साधारण लिहा.

३) वामनाचा रिती विचार लिहा.

**पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) 'काव्यस्य आत्मा ध्वनि' असे कोणी म्हटले आहे?

२) आनंदवर्धनाने ध्वनी विचार कोणत्या ग्रंथात मांडला आहे?

३) 'रीतिरात्मा काव्यस्य' असे कोणी म्हटले आहे?

४) भामहची काव्य व्याख्या लिहा.

५) 'काव्यम् ग्राह्यं अलंकारात्' असे कोणी म्हटले आहे?

## १.१० संदर्भग्रंथसूची

१) गाडगीळ स. रा. : 'काव्यशास्त्रप्रदीप', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती नववी,२०१६

२) जोग रा. श्री. : 'अभिनव काव्यप्रकाश', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दहावी,१९९७

३) कुलकर्णी अ. वा. : 'साहित्यविचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी,१९९७

४) देशपांडे ग. त्र्यं. : 'भारतीय साहित्यशास्त्र' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, आवृत्ती तिसरी, १९८०

५) पाटणकर वसंत : 'साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली (पुनर्मुद्रण),२०११

६) उपासे शिवशंकर : काव्य-शास्त्र परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती पहिली, २०१३

७) तुपे केशव (संपा) : 'साहित्यविचार भारतीय व पाश्चात्त्य', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, २०११

*****

# घटक II

# २

# भारतीय साहित्यशास्त्र : साहित्याचा आस्वाद

**घटक रचना**

२.० उद्देश
२.१ प्रस्तावना
२.२ भरताचे रससूत्र
२.३ भट्टलोल्लट
२.४ श्रीशंकूक
२.५ भट्टनायक
२.६ अभिनवगुप्त
२.७ समारोप
२.८ संदर्भग्रंथसूची

## २.० उद्देश

- भरताने मांडलेला रससिद्धांत समजून घेणे.
- रसप्रतितीची प्रक्रिया समजून घेणे.
- रसप्रक्रियेविषयी विविध मतांचा आढावा घेणे.

## २.१ प्रस्तावना

रसविचार ही भारतीय साहित्यशास्त्रातील सर्वात प्राचीन विचारधारा आहे. रासप्रक्रियेचे स्वरूप सांगणारा उपलब्ध ग्रंथात नाट्यशास्त्र हा पहिला ग्रंथ असला तरी रासप्रक्रियेचे विवेचन करणारा भरत हा पहिला ग्रंथकार नाही. नाट्यशास्त्रातील रसप्रक्रिया विकसित स्वरूपात असल्याचे दिसते. तसेच रसप्रक्रियेच्या परंपरेचा उल्लेख नाट्यशास्त्रात येतो. रसासंबधीच्या दोन परंपरा दिसून येतात. एक द्रुहिण याची व दुसरी वासुकीची. भरताने द्रुहिणाच्या परंपरेचा जसा स्पष्ट निर्देश केला आहे तसा वासुकीच्या परंपरेचा निर्देश केला नाही. भरताचे रसविवेचन हे नाट्यरसाचे विवेचन आहे. रसनिष्पत्ती कशी होते हे सांगण्यापूर्वी भरताने आठ रसांचा निर्देश केला आहे. हा निर्देश नाट्यरस या शब्दात केला आहे. म्हणजे हे रस नाट्यप्रयोगात निष्पन्न होतात. या निष्पत्तीच्या संदर्भातच भरताने रससूत्र मांडले आहे.

## २.२ भरताचे रससूत्र

**'विभावानुभावव्यभिचारीसंयोगाद्रसनिष्पत्ती |':**

भरतमुनींनी आपल्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथात नाटकाच्या संदर्भात 'रस' ही संकल्पना मांडली.'रस 'ही नाट्यविष्कारातील सर्वात महत्वाची गोष्ट आहे कारण प्रेक्षकांना आनंद देणे हे नाट्यप्रयोगाचे प्रधान उद्दिष्ट आहे. रसाविष्काराच्या माध्यमातूनच प्रधान उद्दिष्ट सिद्ध होते. म्हणून नाट्यप्रयोगात रसाची निष्पत्ती कशी होते याचे विवेचन करण्यासाठी रस सिद्धांत मांडला.

- रससूत्र मांडण्याआधी भरताने भाव विवेचन केले आहे.
- भरताने नाट्यामधील वस्तूंची यादी देताना रसाबरोबर भावांचा ही निर्देश केला आहे.
- लौकिक जीवनात रसनिष्पत्ती होत नसून भावजागृती होत असते; म्हणून नाटकातील भाव हे मुद्दाम निर्माण केलेले असतात.
- भरताने आपल्या भावविवेचनात स्थायी भाव, सात्विक भाव आणि व्यभिचारी भाव या तीन भावांचे स्पष्टीकरण केले आहे.

**भरताने केलेले भावविवेचन:**

- स्थायी भाव
- स्थायी म्हणजे स्थिर राहणारा.
- स्थायी भाव लौकिक चित्तवृत्तीशी संवादी आहेत.
- जागृत झालेल्या स्थायी म्हणजे रस होय.
- भरताने आठ स्थायीभाव सांगितले आहेत.

I. रती

II. हास

III. उत्साह

IV. विस्मय

V. जुगुप्सा

VI. भीती

VII. क्रोध

VIII. शोक

**सात्विक भाव:**

- सत्व म्हणजे तन्मय झालेले व  साम्यावस्थेत असलेले मन.
- सत्वापासून उत्पन्न होणारे भाव म्हणजे सात्विक भाव होय.
- उत्कट सुखदु:खाने मनावर होणारा परिणाम सात्विक भावाने व्यक्त केला जातो.
- भरताने आठ सात्विक भाव सांगितले आहेत.:

  I. स्वेद – शरीराला घाम येणे.

  II. रोमांच – अंगावर काटा येणे

  III. स्वरभेद – आवाजात बदल होणे

  IV. कंप – शरीर थरथरणे

  V. वैवर्ण्य – चेहऱ्याचा रंग बदलणे.

  VI. अश्रू – डोळ्यात पाणी येणे

  VII. स्तंभ – शरीर ताठरणे

  VIII. प्रलय – बेशुद्ध पडणे.

**व्यभिचारी भाव:**

- व्यभिचारी भाव म्हणजे संचारी भाव होय .
- व्यभिचारी भाव हे दिर्घकाळ टिकणारे नाहीत.
- स्थायी भावाला सहकार्य करणारे भाव आहेत.
- स्थायीभावाच्या अनुषंगाने व्यभिचारी भाव निर्माण होतो.
- भरताने एकूण ३३ व्यभिचारी भाव सांगितले आहेत:

  १४ - शारीरिक अवस्था

  ०३ - ज्ञानात्मक मनोवस्था

  १६ - भावनात्मक मनोविकार

**व्यभिचारी भाव शारीरिक अवस्था:**

- मरण
- व्याधी

- ग्लानी
- श्रम
- आलस्य
- निद्रा
- स्वप्न
- अपस्मार
- उन्माद
- विबोध
- मद
- मोह
- जडता
- चपलता

**व्यभिचारी भाव ज्ञानात्मक मनोवस्था:**

- स्मृति
- मती
- वितर्क

**व्यभिचारी भाव भावनात्मक मनोविकार:**

- हर्ष
- अमर्ष
- धृती
- उग्रता
- आवेग
- विषाद
- औत्स्युक्य

- चिंता
- शंका
- असूया
- त्रास
- गर्व
- निर्वेद
- दैन्य
- अवहित्यथ
- क्रीडा

**विभाव:**

- विभाव म्हणजे भाव निर्माण करणारी परिस्थिती
- विभावाचे दोन प्रकार आहेत:

  i. एक – आलंबन विभाव

  ii. दोन – उद्दीपन विभाव

**आलंबन विभाव:**

- ज्यावर रसनिष्पत्ति अवलंबून असते त्याला आलंबन विभाव म्हणतात
- नाटकातील नायक नायिका परस्परांचे आलंबन विभाव मानले जातात
- राम, सिता, भीम, अर्जुन, दमयंती, दुष्यंत, शकुंतला ही नाटकातील पात्र म्हणजे आलंबन विभाव होय.

**उद्दीपन विभाव:**

- स्थायी भावाला पोषक वातावरण निर्माण करणारे घटक म्हणजे उद्दीपन विभाव
- नाटकातील पात्र ज्या परिस्थिती, वातावरणात वावरतात ते स्थळावकाश म्हणजे उद्दीपन विभाव होय.

**अनुभाव:**

- अनुभाव म्हणजे उत्तपन्न झालेल्या चित्तवृत्तीचे बाह्यपरिणाम

- अनुभाव म्हणजे भावजन्य कार्य .
- पात्रांची कृती नटांचा अभिनय म्हणजे अनुभव होय .
- आंगिक, वाचिक, आहार्य, सात्विक या चार प्रकारच्या अभिनयाचे विशेष ज्ञान आपल्याला अनुभवावरून होते.

**उदाहरणार्थ:**

रती हा स्थायीभाव असेल तर दुष्यंत- शकुंतला हे रतीचे आलंबन विभाव होय. वसंत, ऋतू कोकिळा, बाग हे त्या स्थायी भावाचे उद्दीपन विभाव होय. शकुंतलेचे तिरपे कटाक्ष कमलाशी चाळा हे रती या स्थायी भावाचे अनुभाव होय.

**विभावानुभावव्यभिचारीसंयोगाद्रसनिष्पत्ती:**

- विभाव अनुभव आणि व्यभिचारी भाव यांचा संयोग होऊन रसनिष्पत्ती होते.
- भरताने रस सूत्रात स्थायी भावाचा उल्लेख केलेला नाही.
- नाटककार स्थायी भावाची निवड करतो त्याला योग्य अशा विभाव अनुभव आदींची जोड देतो आणि स्थायी भाव जागृत होतो. हा जागृत स्थायीभाव म्हणजे रस होय.
- विभाव, अनुभव, व्यभिचारी भाव यांचा संयोग स्थायीशी होतो.
- अमूर्त स्थायीचे प्रगटीकरण करण्यासाठी कवी विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव यांची स्थायी भावाला अनुरूप अशी योग्य जोडणी करीत असतो.
- या योग्य जुळणीतूनच अमूर्त स्थायी मूर्त होतो हीच रसनिष्पत्ती होय.
- भरताने आठ रसांचे आठ स्थायीभाव सांगितले आहेत.

| स्थायी | रस |
|---|---|
| रती | शृंगार |
| हास | हास्य |
| उत्साह | वीर |
| विस्मय | अद्भुत |
| जुगुप्सा | बिभत्स |
| भीती | भयानक |
| क्रोध | रौद्र |
| शोक | करुण |
| रती | शृंगार |

**रसप्रतीती:**

नाट्यगत रस निष्पन्न होतो म्हणजे वस्तुतः काय होते, तो रसिकापर्यंत कसा येऊन पोचतो, रसिकाला रसप्रतीती कशी होते, याचा विचार करावयास हवा. विभाव, अनुभव आणि व्यभिचारीभाव यांच्या संयोगाने रसनिष्पत्ती होते' या भरतसूत्राचा अर्थ कसा लावावयाचा व रसिकाच्या रसप्रीतींचे स्वरूप काय असते या दोन प्रश्नांचा उलगडा करण्याच्या प्रयत्नातून रसनिष्पत्तिविषयक निरनिराळे सिद्धांत मांडले गेले. प्राचीन दार्शनिकांनी आपापल्या तत्वज्ञानाला सुसंगत अशा भूमिका घेतल्याने रसप्रतीतीच्या क्षेत्रात मतभेद निर्माण झाले आहेत. काही प्रमुख दार्शनिकांचे विचार येथे थोडक्यात पाहू.

## २.३ भट्टलोल्लट - उपचितीवाद

'भट्टलोल्लट' नावाच्या पंडिताने आपला 'उपचित स्थायी' म्हणजे रस' हा सिद्धांत मांडला. लोल्लट हा मीमांसावादी होता. त्याचा रससिद्धांत मीमांसकांच्या अख्यतिवादावर आधारला आहे. मीमांसकांच्या मते विश्व सत्यच आहे; इंद्रीयादी प्रमाणांच्या साहाय्याने होणारे ज्ञान सत्यज्ञान आहे. मृगजळासारख्या भ्रमज्ञानाच्या ठिकाणी वास्तविक दोन भिन्न सत्यज्ञानेच असतात. चकाकणाऱ्या शिंपल्यावर आपणाला रुप्याचा भास होतो अथवा दोरीवर सर्पाचा भास होतो; येथेही दोन भिन्न ज्ञाने आहेत. या दोन भिन्न वस्तूतील सादृश्याने आपली दृष्टी बाधित होते आणि आपण ही दोन्ही ज्ञान एकाच आहोत असे समजतो. भट्टलोल्लटाने रससूत्राचा अर्थ वरील अख्यातिवादाच्या आधाराने लावून दाखविला आहे.

स्थायीभाव मूळ राम-सीता, दुष्यंत-शकुंतला आदी काव्यगत पात्रांच्या ठिकाणी असतो. नाटकातील विभावादीनी हा स्थायी 'उत्पन्न' होतो; नटाचे हावभाव, अश्रू, रोमांच आदी अभिनयव्यापाराने आपल्या 'प्रत्ययाला येतो. विशिष्ट स्थायीभाव उत्पन्न झाला आहे हे आपण नटाच्या या अभिनयाने जाणतो. व्यभिचारीभावांनी त्या स्थायीचा उपचय-परिपोष होतो. हा उपचित अथवा परिपुष्ट स्थायीभाव म्हणजेच रस होय.

उपचितीवादावरील आक्षेप-दुष्यंतशकुंतलदींचा स्थायीभाव गृहीत धरून हे सर्व विवेचन केले गेले आहे. विभावानुभवाशिवाय स्थायीना स्वतंत्र अस्तित्वच कोठे आहे? भरतांनी रससूत्रात स्थायीचा उल्लेखही केलेला नाही. तेव्हा स्थायीभावाकडून रसाकडे येण्याचा मार्ग भरतांना मान्य नव्हता हे स्पष्ट आहे. (श्रीशंकुकाने केलेले खंडण) रस जर काव्यातही नाही, नटांतही नाही, तर नायकादींच्या ठिकाणचा रस केवळ सादृश्यामुळे रसिकापर्यंत कसा येऊ शकेल? या ठिकाणी भट्ट लोल्लट निरुत्तर होतो. या मताचे परीक्षण करून श्रीशंकुकाने आपली न्याय-शास्त्रीय उपपत्ती पुढे मांडली.

## २.४ श्रीशंकुक - अनुमितीवाद

श्रीशंकुक हा नैयायिक होता. नैयायिकांचा भर अनुमानप्रमाणावर असतो. हातातील कंकणदेखील आरशात पाहून अनुमानाने ते सिद्ध करतील. विभावादिकांच्या संयोगाने जो स्थायी प्रगत होतो तो स्थायी म्हणजे दुष्यंतादिकांच्या स्थायीचे अनुकरण असते. रंगभूमीवर विभवानुभावांचा संयोग झाला की आपण नटांनाच राम-दुष्यंत आदी पात्रांच्या ठिकाणी

कल्पून त्यांच्या स्थायीचे अनुमान करतो. हे अनुमान सुंदर वस्तूचे असल्यामुळे आपणाला आल्हाद ओटो. शकुंकाच्या मते रसनिष्पत्ती म्हणजे रसाची अनुमती. “कवीने वर्णिलेले विभाव, नटाने अभ्यासिलेले अनुभाव व अभिनयाच्याद्वारे दाखविलेले व्यभिचारिभाव यांच्यावरून गम्य-गमक भावाने...स्थायीभावाची अनुमिती होते.” नटाचे अभिनय कुत्रिम असतात. तेव्हा राम, दुष्यंत, शकुंतला इ.चे सत्य स्थायीभाव या कृत्रिम अभिनयांनी कसे प्रगट होतील अशी शंका उपस्थित करून, ‘संवादी भ्रमाने’ हे सत्यज्ञान होते असे शकुंकाने उत्तर दिले आहे. भिंतीवरील चित्रातील घोडा ज्याप्रमाणे आपणाला घोडाच वाटतो, केवळ रंगाचे मिश्रण वाटत नाही,त्याप्रमाणे रंगभूमीवर अभिनय करणारा नट हा आपणाला दुष्यंत अथवा रामच वाटतो. हा संवादीभ्रम होय. या अभिन्नत्वामुलेच रामादींचे रत्यादी स्थायीभाव नटाच्या ठिकाणीच प्रगट होतात असे आपण कल्पितो. “नटाच्या ठिकाणी प्रेक्षकाला रामत्वप्रतीती चीत्रतूरगन्यायाने येते. ही प्रतीती मिथ्या असली तरी संवादी भ्रमात्मक असल्याने तिच्यापासून खऱ्या रामरतीचा बोध आपणांस होतो.” ही रती अनुमिति असते. तेव्हा शंकुकाच्या मते रामादी पात्रांच्या ठिकाणी असणाऱ्या रतिशोकादी भावांचे नाटकातील विभावादींच्या व अभिनयाच्या आधाराने केलेले अनुमान रस होय. पर्वतावरून येणारा धूर पाहून आपण अग्नीचे अनुमान करतो, त्याप्रमाणे नाटकात नातच अभिनय, त्याने प्रगट केलेले अनुभाव इ. च्या योग मूळ पात्रांच्या ठिकाणी असलेल्या स्थायीचे आपण अनुमान करतो. विभाव-अनुभाव हे लिंग किंवा चिन्ह (धूर); आणि मूळ पात्रांचा स्थायीभाव हा लिंगी किंवा अनुमेय पदार्थ (अग्नी). भरतांनी रससूत्रात मूळ स्थायीचा उल्लेख केलेला नाही याचे शंकुकाने मार्मिक स्पष्टीकरण केले आहे. अग्नीचा प्रत्यक्ष उल्लेख न करता धूमावरून अग्नीचे अनुमान होऊ शकते, तद्वत कविवर्णित विभाव आणि नटाने आपल्या अभिनयाने प्रगट केलेले अनुभव यावरून स्थायीचे अनुमान करता येते. विभाव, अनुभव, व्यभिचारी भाव यांच्या संयोगाने रसनिष्पत्ती होते म्हणजेच मूळ पात्रांच्या ठिकाणी असलेल्या स्थायीची अनुमिती होते. रामादी अनुकार्य पात्रांच्या ठिकाणी असलेल्या रति-शोकादी भावांचे अनुमान करण्याने रसिकाला आनंद कसा होतो या प्रश्नाचे उत्तर देताना शंकुक म्हणतो की हे अनुमान नेहमीच्या व्यवहारातले नव्हे. येथे येणारी प्रतीती सम्यक, मिथ्या, संशय अगर सादृश्य यापैकी कोणत्याही प्रकारची नसते. मागे उल्लेखिलेल्या चित्रतुरगप्रतीतीप्रमाणे ही प्रतीती संवादी भ्रमात्मक असते. अशा प्रकारे ही प्रतीती अन्य प्रतीतींहून विलक्षण असल्याने रसिकाला आल्हाद देते.

### अनुमितीवादावरील आक्षेप:

नटाच्या ठिकाणी रामादिकांच्या रती, शोक या भावनांचे आपण अनुमान करतो हे म्हणणे कसे शक्य आहे? नटांच्या हावभावादी अभिनयाच्या द्वारा मूळ पात्रांच्या चित्तवृत्तींचे अनुकरण होणे शक्य नाही. हावभाव, पोशाख हे बाह्य जड पदार्थ आहेत. यांनी चित्तवृत्तींचे अनुकरण कसे होऊ शकेल? दुसरे असे की मूळ गोष्टीच्या आधाराशिवाय अनुकरण कसे ठरवावयाचे? राम दृश्यंतादी मूळ पात्रांचे रत्यादिभाव कोणी पहिले आहेत? याही दृष्टीने अनुकरण पक्ष कमकुवत ठरतो. शिवाय नाटक पाहताना नातच अभिनय हा रामादिकांच्या स्थायीभावाचे अनुकरण आहे याची जाणीव प्रेक्षकाला कोठे असते? नटाच्या दृष्टीनेही त्याचा अभिनय म्हणजे रामाच्या स्थायीचे अनुकरण नसतेच. तो शिकविलेला अभिनय करीत असतो. तो रामाच्या अगर स्वतःच्या स्थायीच अविष्कार करीत नसून नाट्य-गत स्थायीच अभिनय करीत असतो.

लोल्लट आणि शंकुल या दोघांच्याही मतांत रस हा मुख्यत: पत्रागत व गौणवृत्तीने नात्गात मानलेला आहे. रसिकाचा त्यात संबंधही येत नाही. विभावादींच्या योगे मूळ पात्रांच्या स्थायीभावांचा परिपोष होत असल्याने रसाची उत्पत्ती मुख्यत: रामादी अनुकार्य पात्रांच्या ठिकाणी होते व गौणवृत्तीने नटाच्या ठिकाणी होते. रामाचा वेश, अभिनय इ. मुळे नटाच्या ठिकाणी जो अभिनिवेश निर्माण होतो त्या अभिनिवेषामुळे म्हणजेच अनुसंधानबलाने नटाच्या ठिकाणी रस गौणवृत्तीने उत्पन्न होतो असे लोल्लटाचे मत दिसते. शंकुकाच्या मते अनुमित स्थायी म्हणजे रस, अनुमित स्थायीचा आश्रय अनुकर्ता म्हणजे नट होय. नटाच्या ठिकाणी प्रत्ययाला येणारा स्थायी कृत्रिम असूनही आपणाला तो कृत्रिम वाटत काही. नट हाच राम आहे या कल्पनेने आपण तो खरा मानतो. या अर्थाने रस नटाच्या ठिकाणीही उत्पन्न होतो असे शंकुकाचे मत आहे. रस मूळ रामादी पात्रांच्याच ठिकाणी असतो; पण अनुकरणाने तो नटाच्या ठिकाणी उत्पन्न झाल्याचे आपणाला वाटते.

## २.५ भट्टनायक - भोक्तिवाद

भट्टनायक हा सांख्यमतानुयायी होता. त्याच्या मते जगत हे त्रिगुणात्मक आहे. सुख, दु:ख हे भाव त्रिगुणात्मक वस्तुमात्रातील सत्व, रज या गुणांच्या कमी-अधिक-पणावर अवलंबून असतात. काव्यनाटकांतील वर्णनांनी अगर देखाव्यांनी वाचक-प्रेक्षकांच्या अंत:करणातील सत्वगुणांचा उद्रेक होतो म्हणून त्यांना आनंद होतो. भट्टनायकाने प्रथमच रसनिष्पत्तीचा रसिकांच्या अंत:करणाशी संबंध जोडला.

लोल्लटाच्या मते विभावादींच्या योगे रस मूळ पात्राच्या ठिकाणी उत्पन्न होतो आणि व्यभिचारीभावांच्या योगे परिपुष्ट होतो. हा उत्त्पत्तिवाद अथवा परिपुष्टिवाद भट्टनायकाला मान्य नाही. विशिष्ट कार्याची उत्त्पती कारणाशिवाय होऊ शकत नाही. काव्यनाटकात खरी कारणे नसतातच, म्हणूनच त्यांना विभाव म्हणावयाचे. अशा स्थितीत काव्यनाटकांतील कल्पित कारणांनी म्हणजे विभावांनी खऱ्या नायकनायिकांच्या ठिकाणी रस कसा निर्माण होऊ शकेल?

त्याला शंकुकाचा अनुमितिवादही अमान्य आहे. काव्यातील नायक-नायिकांच्या ठिकाणी निष्पन्न झालेल्या रसाचे अनुमान रसिकाला आनंददायक कसे होऊ शकेल? परगत स्थायीभावाचा आस्वाद रसिकाला कसा शक्य होईल? आस्वादासाठी रसिकाच्या ठिकाणी रसोत्पत्ती मानावी लागेल. पण काव्यनाटकांतील विभावादींच्यामुळे रसिकाच्या ठिकाणी रसनिष्पत्ती कशी होऊ शकेल? नाटकांतील नायिका रसिकाच्या शृंगाराचा विषय होणे शक्यही नाही, आणि इष्टही नाही. येथेच भट्टनायकाने एक नवी मार्मिक कल्पना सुचविली. त्याने आपल्या रसप्रक्रियेत शब्दांच्या ठिकाणी तीन शक्ती मानल्या. अभिधा,भावना आणि भोगीकरण या त्या तीन शक्ती होत. अभिधेने काव्यनाट्याचा वाच्यार्थ समजतो. भावकत्वाने नाट्यातील व्यक्तीचे साधारणीकरण होते. नाटकातील दुष्यंत-शकुंतला, राम-सीता या व्यक्तींचे सर्वसामान्य स्त्री-पुरुषांत रुपांतर होते. आता टी केवळ राम-सीता दुष्यंत-शकुंतला राहत नसून प्रेक्षकांप्रमाणेच सामान्य स्त्री-पुरुषांच्या पातळीवर आलेली असतात. त्यामुळे त्यांच्या रत्यादी भावांचा आस्वाद प्रेक्षक घेऊ शकतो. शकुंतलेचे प्रेम हे शकुंतलेचे दुष्यंतविषयक प्रेम न राहता एका स्त्रीचे पुरुषाविषयक प्रेम बनते. यामध्ये व्यक्तिसंबद्ध लौकिक प्रेमाचा लवलेशही राहात नसल्यामुळे रसिकाच्या ठिकाणी त्याविषयी ‘हे मला हवे’,

'हे मला नको' अशा प्रकारची भावना निर्माण होत नाही. शकुंतलेचे प्रेम, सीतेचा शोक या भावांचे काव्यनाटकात लौकिक स्वरूप गळून गेलेले असते. लौकिक व्यवहार व्यक्तिसंबद्ध असतो आणि म्हणूनच तो सुख-दु:खात्मक असतो. केव्हा केव्हा आपण या व्यवहाराकडे ताटस्थाने पाहतो. येथे आस्वाद शक्य नाही. काव्य-नाटकातील गुणालंकारयुक्त शब्दयोजनेमुळे आणि विभावादींच्या अलौकिकत्वामुळे अभिव्यक्त होणारा भाव हाही व्यक्तिसंबद्ध राहात नाही. त्याला स्थल-काल-व्यक्तिनिरपेक्ष शुद्ध भावाचे म्हणजे विश्वात्मक भावाचे स्वरूप आलेले असते. हेच साधारणीकरण होय, साधारणीकरणाच्या या प्रक्रियेमुळेच स्त्री-पुरुष रसिक प्रेक्षक-वाचक काव्य-नाटकातील प्रेम, शोक, भय या भिन्न भावनांचा आस्वाद घेऊ शकतात. हाच भट्टनायकाने सांगितलेला भोगीकरणव्यापार होय. विभावादींच्या साधारणीकरणाने प्रगट होणारा स्थायीभावदेखील रसिकाला साधारण्याच्या पातळीवरून प्रतीत होत असतो. याचाच अर्थ कविकौशल्याने काव्यार्थ भावित होतो. हाच काव्य-नाट्य रस. रसिक प्रेक्षक साधारण्याच्या पातळीवरून या रसाचा आस्वाद घेतो. हीच रसिकाची रसप्रतीती. यावेळी रसिक अलौकिक पातळीवर आलेला असल्यामुळे त्याच्या ठिकाणी सत्वगुणाचा उद्रेक होतो आणि म्हणून त्याला काव्यनाटकापासून आनंद होतो, असे भट्टनायक म्हणतो.

**भोक्तिवादावरील आक्षेप:**

अभिनवगुप्ताने भट्टनायकच्या मताचा निर्देश केला आहे. अभिनवगुप्त भट्टनायकाच्या बहुतांशी मताशी सहमत आहे. त्याच्या नायकाच्या मतावर आक्षेप आहे, तो मुखत: व्यंजनावृत्ती न स्वीकारता भोग नावाचा नवीन व्यापरचा पुरस्कार केल्याबद्दल. भोग हासुद्धा प्रतीतीचा एक प्रकार आहे, तेव्हा रसाची प्रतीती होत नाही असे म्हणणे बरोबर नाही . आनंदवर्धनाने प्रस्थपित केलेल्या रसध्वनिविषयक सिद्धांताला अनुसरूनच रासाची प्रतीति होते, ती अभिव्यक्तीच्या स्वरूपाची असते आणि ही अभिव्यक्ती शाब्दी अथवा आर्थी व्यंजनेच्या द्वारा होते , असे अभिनवगुप्ताचे मत आहे.

भट्टनायकाने नटगत अथवा पात्रगत रस रसिकाच्या ठिकाणी आणिले. अभिनवगुप्ताने भट्टनायकाच्या उपपत्तीमधील दोष काढून टाकून आपली स्वतंत्र अशी रसाभिव्यक्तीची आणि रसास्वादाची प्रणाली प्रस्थापित केली. त्यानंतर मम्मटादी उत्तरकालीन साहित्यशास्त्रज्ञांनी या प्रणालीला मान्यता दिलेली असल्याने त्याबाबतीत अभिनवगुप्ताचा सिद्धांत म्हणजे शेवटचा शब्द असे मानले जाऊ लागले. भारतीय साहित्यशास्त्रातील अनेक मतांचे अत्यंत पद्धतशीरपणे विवरण करून अभिनवगुप्ताने रसास्वादाचा सिद्धांत मांडला. '

## २.६ अभिनवगुप्त - अभिव्यक्तिवाद

भारतांच्या रससूत्रातील 'निष्पत्ति' या पदाबद्दलच ही सर्व चर्चा चालू होती. निष्पत्ती म्हणजे उत्पत्ति-उपचय-परिपोष, अथवा अनुमिति ही मते भट्टनायकानेच त्याज्य ठरविली. त्यासाठी त्याने भावकत्व आणि भोगीकरण हे दोन स्वतंत्र व्यापार मानिले. त्याचे भावकत्व म्हणजेच साधारणीकरण अभिनवगुप्ताने मान्यच केले. परंतु यासाठी भावकत्व नावाचा स्वतंत्र व्यापार मानण्याचे करण नाही असे त्याचे म्हणणे होते. व्यंजनाव्यापारानेच भावांचे साधारणीकरण होते, हे आनंद-वर्धनाचे मत त्याने स्वीकारले. भट्टनायकाची भोगीकरणाची प्रक्रियाही त्याने

अनावश्यक ठरविली. रसिकाचा आस्वाद व्यंजनाव्यापारातच अनुस्यूत आहे हे त्याने दाखवून दिले.

कोणत्याही साभिप्राय विधानाची प्रतीती तीन अवस्थांमधून येते. अभिनवगुप्ताने दिलेले उदाहरणच प्रथम घेऊ.:

“आरोग्यं प्राप्तवान सांब: स्तुत्वा देवं अहर्पतिम !”

‘सांबान सूर्याची स्तुती केली आणि त्याला आरोग्य प्राप्त झाले’ अ वरील वाक्याचा वाच्यार्थ होय. सांब नावाच्या व्यक्तीशी या वाक्यातील अर्थ संबंधित आहे. यावरून ‘कोणत्याही व्यक्तीन सूर्यस्तवन केल्यास ती व्यक्ति आरोग्यवान होईल’ असा सामान्य अर्थ नंतर ध्यानात येतो, आणि शेवटी ‘आपणही सूर्यस्तवन केल्यास आपणालाही आरोग्यप्राप्ती होऊ शकेल’ असा आत्मानुप्रवेशयुक्त विचार मनात येतो. वरील विधानातील अर्थाची प्रतीती तीन अवस्थांमधून येते : (१) व्यक्तिविशिष्ट ज्ञान (२) साधारण्याच्या पातळीवरून होणारे व्यक्तिनिरपेक्ष ज्ञान (३) आत्मानुप्रवेश. ही त्रिविध प्रतीती केवळ व्यंजनाव्यापाराने होते. काव्यातील कविकौशल्याने ही प्रक्रिया अधिक उत्कटत्वाने घडून येते.

काव्यनाटकांमध्ये विभावादींच्यायोगे व्यक्त होणा स्थायीभाव प्रारंभी जरी व्यक्तिसंबद्ध असला तरी व्यंजनेने व कविकौशल्याने तात्काळ त्याचे साधारणीकरण होते. नाटकातील पात्रांचे (दुष्यंत-शकुंतला आदी) व्यक्तिसंबद्धत्व गळून जाऊन त्यांना सामान्य स्त्री-पुरुषांचे स्वरूप लाभते; आणि त्यांच्या अभिनयातून प्रगट होणारा प्रेमभावही कोण विशिष्ट व्यक्तीचा न राहता मानवी प्रणयाचा अविष्कार होतो. विभावादिकांनो अभिव्यक्त झालेला आणि साधारण्याच्या पातळीवरून प्रत्ययाला येणारा हा स्थायीभाव रसिकाच्या ठिकाणी असलेल्या वासनारूप स्थायीभावाशी संवादी असल्याने रसिकाचा त्यामध्ये अनुप्रवेश घडून येऊन त्याला तो आस्वाद होतो. नाटकात व्यक्त होणारा स्थायीभाव हा जसा रामादिकांचा अगर नटांचा मनोविकार राहिलेला नाही, तसाच तो रसिकाचाही व्यक्तिगत मनोविकार राहात नाही. नाट्यगत स्थायीला कविप्रतिमेच्या स्पर्शाने अलौकिकत्वाची पातळी लाभलेली असते. विभावादिकांचे व्यक्तिसंबद्ध स्वरूप नाहीसे होऊन व्यक्तिनिरपेक्ष, देश-कालादी भेदांच्या अतीत अशा साधारण्याच्या पातळीवर ते आलेले असतात. हे व्यंजनाव्यापारांचे सामर्थ्य होय. या अलौकिक बनलेल्या विभावादींचा संयोग झाला की, काव्यार्थाचे अभिव्यंजन होते. रसिकाच्या ठिकाणी असणाऱ्या तदुचित वासनासंस्कारांचे उद्बोधन होऊन आस्वादाचा अलौकिक व्यापार सुरु होतो. लौकिक सृष्टीमधील कार्यकारणसंबंध पाहून विशिष्ट चित्तवृत्तींचे अनुमान करण्याची पटूता रसिकाच्या ठिकाणी आलेली असतेच. तशी पटूता त्याच्या ठिकाणी नसेल तर त्याला काव्यातील अभिव्यक्त भावांचा आस्वाद घडणार नाही. मात्र, आस्वाद-काळी त्याचे परिमित (=मर्यादित) व्यक्तित्व विगलित झालेले असते. देशकालादी मर्यादांचे उल्लंघन करून साधारणीकृत भूमिकेवरून तो नाट्यगतभावाशीकाव्यार्थ्याशी ‘हृदयसंवादा’ मुळे तन्मय पावतो. त्याच्या ठिकाणच्या वासनासंस्कारांनाही अलौकिक स्वरूप प्राप्त होऊन त्यांचे उद्बोधन होते; त्याच्या जाणीवेत अलौकिक अशा विभावादिकांनी अभिव्यक्त केलेल्या अलौकिक स्थायीची चर्वणा सुरु होते. हीच रसप्रतीती. रसाला अभिनवगुप्तान ‘स्थायी विलक्षण’ असे म्हटले आहे.

अभिनवगुप्ताने रसनिष्पत्तीचा अत्यंत सविस्तर विवेचन केले आहे. रसिकाच्या अलौकिक पातळी सुटण्याच्या आणि त्याला व्यक्तिसंबंध रतीक्रोधादी भवांचा अनुभव घेण्याचा धोका दिसत होता; म्हणूनच त्याने रसविघ्नांचा विचार केला आहे. ही रसविघ्ने सात प्रकारची आहेत. ग. त्र्यं. देशपांडे यांनी भारतीय साहित्यशास्त्र या ग्रंथातून या रसविघ्नांचा विचार केला आहे. ते पुढीलप्रमाणे:

अभिनवगुप्ताने रसविघ्नांचे सविस्तर वर्णन केले आहे. निर्विघ्नतेने येणाऱ्या प्रतीतीलाच चमत्कार, निर्वेश, भोग, समापत्ति, लय, विश्रान्ती असे पर्याय अभिनवगुप्ताने वापरले आहेत. रसप्रतीति ही कविरसिकहृदयसंवादरूप व्यापार आहे. काव्य किंवा नाट्य हे त्यांचे माध्यम आहे.

रसामध्ये निर्विघ्न रसनात्मक प्रतीतीला बाधक अशी कविगत, काव्यगत, नटगत किंवा रसिकगत कोणतीही गोष्ट म्हणजे रसविघ्न होय. अभिनवगुप्ताने सात रसविघ्ने दिली आहेत ती अशी – [१] संभावनाविरह, [२] स्वपरगतदेशकालविशेषावेश, [३] निजसुखादिविवशी भाव, [४] प्रतीत्युपायवैकल्य, [५] स्फुटत्वाभाव, [६] अप्रधानता, आणि [७] संशययोग. या विघ्नांचे स्वरूप आपण पाहू.

### १. संभावनाविरह:

संभावनाविरह म्हणजे कल्पनेचा अभाव. ज्याला काव्यवस्तु किंवा नाट्यवस्तूची कल्पनाच करता येत नाही, त्याची संविद्वविश्रान्ती कोठून होणार आणि कसला रसास्वाद येणार ? कवि आपल्या कृतीतून – ती लहान असो की मोठी असो एकच वस्तु निर्माण करीत असतो. ही संवेद्द वस्तु असते. या वस्तूची वाचकाला नीट कल्पनाच जर करता न आली तर त्याला प्रतीतीच येणार नाही, मग प्रतीतिविश्रांति तर दूरच. हा दोष कविगत किंवा रसिकगत असा दोन्हीहि प्रकारचा असू शकतो. कविगत दोष अशक्तीमुळे येतो. कवीला उचितानुचितविवेक न राहिला तर हा दोष घडतो. आनंदवर्धनाने यांचे विवेचन ध्वन्यालोकाच्या तृतीय उद्द्योतांत केले आहे. पण कित्येकदा कविकृति चांगली असूनसुद्धा रसिकालाच कल्पनादारिद्रामुळे तिचे आकलन करता येत नाही. अशा वेळी त्याचा हृदयसंवादच होत नाही.

### २. स्वपरगतदेशकालविशेषावेश:

हे रसिकगत विघ्न होय. कित्येक वाचक व प्रेक्षक काव्यनाट्यातून स्वत:च्या वैयक्तिक सुखदु:खांचा आस्वाद घेतात. अशा वाचकांच्या मनोविकारांना जोवर सुखकर चालना मिळते तोवर ते काव्यांत गढून जातात, पण वैयक्तिक दृष्ट्या अप्रिय किंवा दु:खद प्रसंग त्यांना बघवत व वाचवत नाहीत. आपणाला सुखकारक वाटणारा प्रसंग तसाच टिकावा, तो लागलीच जाऊ नये, दु:खद प्रसंग तत्काळ जावा, अशा प्रकारच्या वृत्त्यतरांनी त्यांची रससंवित गढूळ झालेली असते. नाटकांतील किंवा काव्यांतील प्रसंग आपल्यालाच उद्देशून आहेत असे कित्येकांना वाटत असते अशा वाचकांना व प्रेक्षकांना रसास्वाद घेणे शक्य नसते, करण रसास्वादाकरिता आवश्यक असणारी साधारणीभवनाची पटली, यांचे व्यक्तितत्व विगलित न झाल्यामुळे, यांना येताच नाही.

### ३. निजसुखादिविवशी भाव:

कित्येकदा प्रेक्षक आपल्या वैयक्तिक सुखदु:खांत अगोदरच चूर झालेला असतो व तशाच अवस्थेत तो नाट्य पाहावयास किंवा काव्य ऐकावयास बसतो. अगोदरच्या व्यग्रतेमुळे त्याची काव्यार्थाच्या ठिकाणी संविद्विश्रांती होत नाही व त्यामुळे रसास्वादाचा लाभ घडत नाही. काव्य वाचतांना किंवा नाट्य पाहतांना त्याच्या मनांत मधून मधून पूर्वीच्या सुखदु:खादि वृत्ति जागृत होत असतात. या विघ्नाच्या उपशमाकरितां नाट्यात विविध प्रकारचे गान, मंडपवैचित्र्य, विदग्ध गणिकांचे नृत्य, इत्यादिकांची योजना केलेली असते. अशा उपायांनी अहृद्य प्रेक्षकाच्या ठिकाणी हृद्यनैर्मल्य येऊन तो सहृद्य बनतो.

### ४. प्रतीत्युपायवैकल्य:

विभावानुभाव हेच रसप्रतीतीचे उपाय होत. विभावानुभावांची नीट संगति नसली, ते विकल असले किंवा त्यांचा अभावच असला तर रसास्वादाची निर्मिति होणेंच शक्य नाही. हा दोष कविगत असू शकतो.

### ५. स्फुटत्वाभाव:

विभावानुभावांची प्रतीति स्फुटतेने आली पाहिजे. ती अस्फुट असली तर रसिकाची संविद्धीश्रांति होत नाही. विभावादिकांचे हे स्फुटत्व प्रत्यक्षकल्प असावे लागते. ‘भावा: प्रत्यक्षवत स्फुटा:’ असे भट्टलोल्ट म्हणतात त्यांतील आशय हाच आहे. ‘सर्वा चेयं प्रमिति: प्रत्यक्षपरा’ – अनुमान, उपमान इत्यादीनी होणारी प्रमितिहि प्रत्यक्ष प्रधान असते, असे वात्स्यायनभाष्यहि म्हणते प्रतीत्युपायांचे वैकल्य व अस्फुटता या दोन विघ्नांचा निरास व्हावा म्हणूनच अभिनयाला लोकधर्मी वृत्तिप्रवृत्तींचा आधार असला पाहिजे असे भरत म्हणतात. या आधारामुळे विभावादिकांची विकलता नाहीशी होते व अभिनयाने काव्यार्थाला प्रत्यक्षकल्पता येत असल्याने तो स्फुटतेने प्रतीत होतो. हे दोन्ही दोष कविगत किंवा नटगत असू शकतात.

### ६. अप्रधानता:

काव्यांतील प्रधान वस्तू सोडून गौण वस्तूवरच भर दिला तर रसप्रतीतींचा विघ्न येते. रसिकाची वृत्ति गौण वृत्तीवर केंद्रित होईल हे खरे पण गौण वस्तूला निरपेक्ष अस्तित्व नसल्याने आणि तिचे पर्यवसान अखेर प्रधानवस्तूंतच व्हावयाचे असल्याने, गौण वस्तूच्या प्रतीतीला निरपेक्ष स्थिरता येणार नाही. म्हणून काव्यनाट्यगत स्थायी हाच चर्वणेचा विषय व्हावयास हवा. असे न झाले तर काव्यनाट्यातील प्रधानवस्तु बाजूला पडून गौणवस्तूच प्रामुख्याने पुढे येतील. हा फार मोठा दोष होय. हा दोष कथावस्तूदृष्टीने कविगत असू शकतो, तर अभिनयदृष्टीने नटगत असू शकतो.

### ७. संशययोग:

विभावानुभावादिकांतून स्थायी अभिव्यक्त होतो, पण अमुक एका स्थायीचे अमुकच विभाव, अमुकच अनुभव, किंवा अमुकच संचारी भाव असे ठरलेले नाही. व्याघ्र हा जसा भयाचा विभाव होईल तसा तो क्रोधाचाहि विभाव होऊ शकेल, अश्रु हे जसे शोकाच्व अनुभाव

होतील तसे ते हर्षाचेहि अनुभव होऊ शकतील, आणि चिंता व दैन्य हे जसे शोकाचे संचारी भाव आहेत तसेच ते विप्रलंभाचेहि संचारी होऊ शकतील. ते केवळ एकेकटे घेऊन पहिले तर कोणत्या स्थायीचे ते द्योतक आहेत याबद्दल संदेह उत्पन्न होईल व रसास्वादास विघ्न येईल. पण या तिघांचीहि जर औचित्याने जुळणी झाली तर स्थायीचा निश्चित प्रत्यय येऊन तो आस्वादाचा विषय होऊ शकेल.

वरील सात विघ्नांचा निरास झाला अर्थात टी नसली तरच रसास्वाद येऊ शकतो. नाहीतर त्यात खंड पडतो. विभावादिक काव्यनाट्यात उचित प्रकारे आलेले असले तरच ते रसिकाच्या ठायी विघ्नापसारणपूर्वक रसनाव्यापाराची निष्पत्ति करितात, व तेव्हाच रसिकाला निर्विघ्न रसप्रतीति येते.

## २.७ समारोप

रति, भय, क्रोध आदी स्थायी हे कोण्या एका व्यक्तीचे  नसून त्याचे साधारणीकरण झालेले आहे. भरतांनी रससुत्रात स्थायींचा उल्लेख यासाठीच केलेला नाही. अशा या अलौकिक स्थायीची चर्वणा म्हणजे रस. रस नटाच्या ठिकाणी नसतो, काव्यगत पात्रांच्या ठिकाणीही नसतो; विभावादिकांनी उद्दबुद्ध झालेल्या रसिकांच्या वासनासंस्कारांच्या ठिकाणी जी एक अपूर्व, अलौकिक अनुभूती येते तिलाच रस हे नाव आहे. ही चित्तवृत्ती आस्वाद असल्यामुळे तिला ‘रस’ हे नाव दिले आहे.  रस म्हणजे केवळ स्थायीभाव नव्हे. तो स्थायीचा उपचय नव्हे, तो अनुमित स्थायी नव्हे, किंवा साधारणीभूत स्थायीचा उपभोग नव्हे. निर्विघ्न अशा रसनात्मक प्रतीतीचा तो भाव विषय होणे हेच रसाचे व्यवछेदक लक्षण होय.

## २.८ संदर्भग्रंथसूची


- काव्यशास्त्र प्रदीप – स.रा.गाडगीळ
- भारतीय साहित्यशास्त्र- ग.त्र्यं. देशपांडे
- वाड्.मयीन संज्ञा-संकल्पना कोष- संपादक ,प्रभा गनोरकर, वसंत आबाजी डाहके मराठी वाड्.मयकोष-खंड ४ -संपादक, डॉ. विजया राजाध्यक्ष,


*****

# घटक III

# ३

# साहित्य भाषेचे स्वरूप आणि कार्य, शब्दशक्ती - अभिधा, लक्षणा, व्यंजना

**घटक रचना**

३.१ प्रस्तावना

३.२ साहित्य भाषेचे स्वरूप आणि कार्य

३.३ शब्दशक्तीचे प्रकार

३.३.१ अभिधा

अ) रूढी

ब) योग

क) योगरूढी

३.३.२ लक्षणा

अ) निरुढा लक्षणा

ब) प्रयोजनवती लक्षणा

ब.१ गौणी

ब.१.१ सारोपा

ब.१.२ साध्यवसाना

३.३.२ शुद्धा

अ) सारोपा

ब) साध्यवसाना

क) उपादान

ड) लक्षणलक्षणा

३.३.३.व्यंजना

अ) शाब्दी व्यंजना

अ.१ अभिधामूलक शाब्दी व्यंजना

अ.२ लक्षणा मूलक शाब्दी व्यंजना

ब) आर्थी व्यंजना

ब.१ वस्तूध्वनी

ब.२ अलंकारध्वनी

ब.३ रसध्वनी

३.४ समारोप

३.५ संदर्भ ग्रंथ

३.६ प्रश्न



## ३.१ प्रस्तावना


साहित्याची भाषा, व्यवहार भाषा आणि शास्त्र भाषा यामध्ये भेद आहे. भाषा कोणतीही असली तरी ती संदेशवहनाचे कार्य करते. दैनंदिन जीवन व्यवहारात उपयोगी पडणारी भाषा म्हणजे व्यवहार भाषा. सार्वजनिकता हा तिचा विशेष महत्त्वाचा गुण. शास्त्र भाषा हे लिखित भाषेचे एक रूप आहे यातून केले जाणारे संदेश वहन हे मुख्यतः ज्ञानात्मक विधाने, तर्काधिष्ठित चर्चा तसेच विश्लेषणासाठी आवश्यक ठरते. सुस्पष्टता हे शास्त्र भाषेचे महत्त्वाचे लक्षण. व्यवहार भाषा आणि साहित्याची भाषा यामध्ये काटेकोर सीमारेषा सांगता येत नाही मात्र तरीही साहित्य भाषेची स्वतःची लकब आहे, अनेकार्थसूचकता, नियमोल्लंघन, अलंकारिकता असे तिचे विशेष सांगता येतात. शास्त्र, व्यवहार आणि साहित्य यामध्ये भाषा ही एकच असते मात्र संदर्भ बदलला की भाषा बदलते. शब्दरूपी भाषा समाजव्यवहारात संदेशवहनाचे कार्य करते. ती साहित्यालाही जन्म देते. भाषा व साहित्य शास्त्रज्ञाने भाषेच्या विविध शक्ती सांगितल्या आहेत या शक्तीमुळे शब्दांना अर्थ प्राप्त होत असतो आणि काव्याच्या ठिकाणी शब्दांचे सौंदर्य निर्माण होते. शब्दांच्या शक्ती तीन प्रकारच्या असतात. शब्द म्हणजे पदार्थाचे प्रतीक. वृक्ष हा शब्द वृक्ष या पदार्थाचे प्रतीक. हा शब्द उच्चारताच आपल्या मनचक्षूपुढे विशिष्ट प्रकारची आकृती येते. शब्दाच्या या शक्तीला अभिधा असे म्हणतात. या शक्तीमुळे शब्दांना जो अर्थ प्राप्त होतो तो वाच्यार्थ. दैनंदिन व्यवहार शब्दाच्या याच शक्तीवर आधारलेला असतो. कित्तेकदा वाक्याचा अर्थ समजून घेण्यासाठी अभिधा शक्ती अपुरी पडते अशा वेळीं अर्थ ग्रहण होण्यासाठी शब्दांच्या वेगळ्या शक्तीचा आश्रय घ्यावा लागतो. वेगवेगळ्या संदर्भात याच शब्दाला वेगवेगळे अर्थ प्राप्त झालेले असतात. भारत मातेच्या शूरवीरांना उद्देशून 'सीमेवर आमचे वाघ आमचे रक्षण करीत आहेत' या वाक्यातील वाक्याचा अर्थ समजण्यासाठी अभिधा शक्ती अपुरी पडते इथे 'वाघ' या शब्दाचा केवळ वाच्यार्थ केवळ जंगलातील प्राणी असा होतो मात्र तो या ठिकाणी प्रस्तुत नाही या ठिकाणी अभिप्रेत असलेला अर्थ असा आहे इथे अभिप्रेत नसतो तर 'वाघ' या शब्दाचा अर्थ या ठिकाणी शूर सैनिक असा आहे. शब्दांची ही शक्ती आहे ती लक्षणं शक्ती आणि या शक्तीने व्यक्त होणारा अर्थ हा लक्षा अर्थ कित्येक वेळा अभी जा आणि लक्षणा या शब्द शक्तीही अपुऱ्या पडतात अशा वेळी व्यंजना ही शब्दशक्ती उपयोगात आणावी लागते. व्यंजना या शब्द शक्तीमुळे सुचित होणारा अर्थ म्हणजे व्यंगार्थ. 'बुद्धगयेचा पिवळा वारा' मर्ढेकरांच्या या उक्तीमध्ये 'पिवळा' हा शब्द बुद्ध भिख्खूंनी परिधान केलेल्या पीत वस्त्रांसाठी आहे. ही लक्षणा. पण 'पिवळा' याचा अर्थ केवळ पीतवस्त्र एवढाच नाही तर बुद्धांच्या निवासाने पवित्र झालेली बुद्धगया हे भारतीयांचे क्षेत्रस्थान. अर्थाची ही सूक्ष्म वाल्या रसिकाच्या ठिकाणी निर्माण होतात यालाच काव्यशास्त्र मध्ये व्यंगार्थ किंवा असा ध्वन्यार्थ असे म्हणतात.

## ३.२ साहित्य भाषेचे स्वरूप आणि कार्य

मानवी संदेशवहनाच्या गरजेतून भाषेची निर्मिती झाली आहे. शास्त्र, साहित्य हे भाषेचाच आधार घेऊन निर्माण झाले आहे. भाषेचा उपयोग एकाच वेळी विविधांगाने होऊ शकतो एखादी सर्वसामान्य व्यक्ती कवी प्रमाणे बोलू शकते. कित्येक कवींनी, लेखकांनी आपली निर्मिती व्यवहार भाषेतून केलेली पाहायला मिळते. व्यवहार भाषा आणि साहित्याची भाषा यामध्ये काटेकोर सीमारेषा सांगता येत नाही मात्र तरीही साहित्य भाषेची स्वतःची लकब आहे तिची स्वतःची वैशिष्ट्ये आहेत. साहित्य अंतर्गत विचार केला तरी त्यामध्ये कवितेची भाषा, नाटकाची भाषा, कादंबरीची भाषा यांचे वेगळेपण लक्षात घेता येते. याचा अर्थ असा की या भाषेला त्या साहित्यप्रकाराचा संदर्भ प्राप्त होत असतो कविता वाचताना ती एका लयीत वाचली जाते आणि त्याचे भान वाचकाला आवश्यक असते. लघुकथा वाचताना एका वाक्याचा दुसऱ्या वाक्याचे असणारा संबंध लक्षात ठेवावा लागतो. कादंबरी अवकाश त्या पेक्षा मोठा असतो त्यामुळे कादंबरीचा आशय, त्यातील पात्र, वातावरण, कथानक, भाषा, संवाद हे घटक जुळवत ती वाचावी लागते**.** साहित्य भाषेला चिरंतन काल संदर्भ असतो. त्याचे भाषिक रूप हे अनेकार्थ सूचक असू शकते. 'हिरवे हिरवे गार गालिचे' या बालकवींच्या भाषिक रूपाला एक वेगळा अर्थ प्राप्त झालेला दिसतो. यातील रंग संवेदना, स्पर्श संवेदना, विशेषणांची पुनरावृत्ती, ध्वनींच्या संयोजन यातून एक वेगळेच मिश्रण तयार झालेले पाहायला मिळते. फुलराणीचा एकंदर रूपाला भाषिक सहकार्य लाभलेले अशी भाषिक कृती ठरते. साहित्य भाषेमध्ये आणखी एक महत्वाची बाब असते ती म्हणजे अनपेक्षित अर्थव्यक्ती. साहित्यिक भाषेमध्ये शब्दांची मोडतोड करून, नियमांचे उल्लंघन करून अपरिचित भाषेचे रूप वाचकापर्यंत पोहोचू शकते. जुनी झालेली भाषेची बोथट रुपे बाजूला ठेवून नवीन अर्थच्छटा प्राप्त करून देण्यासाठी लेखक प्रयत्नरत असतो. नवनवीन शब्दरूप कवी किंवा लेखक तयार करत असतात. भाषिक रूपांना अर्थ समृद्धी प्राप्त करून देणे अर्थाचे विशिष्टीकरण करणे अशा बाबी साहित्यिक भाषेमध्ये सातत्यानं घडवतात. साहित्याची भाषा ही शास्त्र आणि व्यवहार भाषांच्या तुलनेत अधिकाधिक समृद्ध, विस्तृत, रचना स्वातंत्र्य प्राप्त करून देणारी, अर्थ व्यक्तीला नव्या दिशा देणारी स्वतंत्र अशी भाषा असते. शास्त्रामध्ये शब्दाच्या एकार्थाला प्राधान्य असते. इतिहास, आख्यान यामध्ये अर्थाला महत्त्व असते. साहित्यामध्ये शब्द आणि अर्थ या दोन्हीला गौणत्व असते.. तिथे कवी व्यापाराला प्राधान्य असते. त्यांना अभिप्रेत असलेला कवी व्यापार हा व्यंजना व्यापारच आहे. कवि व्यापारामध्ये वक्रोक्ति, अलंकार, रीती यांचा अंतर्भाव असतो मात्र कवीच्या प्रतिभेचे रमणीय स्वरूप त्याच्या व्यंजनाव्यापारातून व्यक्त होते. भाषा जरी एकच असली तरी तिची कार्ये ही भिन्न आहेत. भट्टनायकाने शास्त्रादी वाङ्मयाला 'शब्दप्रधान वाङ्मय' असे म्हटले आहे. शास्त्रांमध्ये शब्दाला प्राधान्य असते. इतिहास व आख्याने इत्यादी वाङ्मय प्रकारात अर्थाला महत्व असते. मात्र काव्यामध्ये शब्द आणि अर्थ या दोघांनाही गौणत्व असून कवी व्यापाराला प्राधान्य असते. भट्टनायक यांनी शब्द आणि शब्दाचा वाच्यार्थ यांचे काव्यातील गौणत्व मान्य करून ही व्यंजना व्यापाऱ्याला स्वतंत्र मान्यता दिलेली दिसत नाही. परंतु कवीव्यापार म्हणजेच व्यंजनाव्यापार होय. कारण कवीप्रतिभेचे अतिरमणीय असे स्वरूप त्यांच्या व्यंजनाव्यापारातून व्यक्त होते. म्हणूनच आनंदवर्धन यांनी व्यंजना व्यापाऱ्याला (ध्वनीला) काव्याचे आत्मपद दिले आहे. मम्मटानेसुद्धा अन्य शास्त्र व काव्य यातील वेगळेपण दाखवताना याच पद्धतीने वाङ्मयाचे

वर्गीकरण केले आहे. शब्दाला संकेताने एक अर्थ प्राप्त होत असतो. तो वाच्यार्थ किंवा मुख्यार्थ. कवी व्यापारामुळे वाच्यार्थापेक्षा वेगळा अर्थ प्राप्त होतो तो ध्वन्यार्थ. काव्यसौंदर्य या कवी व्यापार निर्मितीवरच आधारलेले असते. या शब्दशक्ती इथे विस्ताराने विचारात घेता येतील.

## ३.३ शब्दशक्तीचे प्रकार




**शब्दांच्या अंगी तीन प्रकारची शक्ती असते:**

१) अभिधा

२) लक्षणा

३) व्यंजना

### ३.३.१ अभिधा (वाच्यार्थ, मुख्यार्थ, संकेतार्थ):

एखादा शब्द उच्चारल्याबरोबर त्याचा एक शब्दशः, शब्दकोशगत सरळ व रुढ अर्थ समजतो किंवा त्याच्याशी निगडीत जो सर्वसामान्य अर्थ निघतो, त्या शब्दांच्या शक्तीस अभिधा असे म्हणतात. शब्दाचा प्रचलित अर्थ या शक्तीमुळे जाणवतो. ही शक्ती शब्दाचा प्रथम बोध प्रकट करते आय ए रिचर्डस यांनी अभिधा शब्दशक्तीला Scientific Meaning असे म्हटले आहे. उदा. 'वाघ' हा शब्द उच्चारताच विशिष्ट प्राण्याची आकृती व गुण विशेष आपल्या मनःचक्षूसमोर उभे राहते याला वाच्यार्थ, मुख्यार्थ किंवा संकेतार्थ असे म्हटले जाते.

**अभिधा शब्दशक्तीचे पुढीलप्रमाणे तीन प्रकार पडतात:**

**अ) रूढी:**

शब्दांची शक्ती रूढीने प्राप्त झालेली असते येथे शब्दांच्या व्युत्पत्ती वरून अर्थ करता येत नाही. शब्दांना रूढीने मिळालेला एकच अर्थ प्राप्त असतो.

उदा.- गाय, घर, डोळा, मंडप

**ब) योग**:

काही शब्दांचे अर्थ व्युत्पत्तीवरून कळतात. योग म्हणजे व्युत्पत्ती. व्युत्पत्ती ने जेव्हा शब्दांचा अर्थ सिद्ध होतो तेव्हा त्या शब्द शक्तीला 'योग्यशक्ती' म्हणतात. यालाच योग किंवा यौगिक असेही म्हणतात. यामध्ये शब्दांचा उगम तसेच उलगडा सांगता येतो आणि शब्दाला एकाच मूळ अर्थ असतो.

उदा.- भारतीय, गृहस्थ, देशस्थ

**क) योगरूढी**:

काही शब्दांमध्ये रूढी आणि व्युत्पत्ती या दोन्हींची मदत घ्यावी लागते. घटक अवयवांच्या स्वतंत्र अर्थाप्रमाणे याचा अर्थ घेता येत नाही.

उदा.- खग (ख -आकाश , ग – गमन करणारा ) – आकाशात गमन करणारा तो. व्युत्पत्तीने पक्षी विमान सूर्य-चंद्र असा कोणताही अर्थ होऊ शकेल. मात्र आकाशात गमन करणाऱ्या प्रत्येकाला खग म्हंटले जात नाही तर खग म्हणजे पक्षी. पंकज पंक+ज म्हणजे चिखलात जन्मलेले. यामध्ये बेडूक, चिखलातील अन्य कृमी असेही होऊ शकतो मात्र रूढीने पंकज म्हणजे कमल असा अर्थ निश्चित केलेला आहे.

**३.३.२ लक्षणा:**

शब्दांची ही दुसरी शक्ती. ज्यावेळी शब्दाचा मूळ अर्थ न घेता त्याच्याशी सुसंगत असलेला दुसरा अर्थ घ्यावा लागतो. म्हणजे वाक्याचा बोध होण्यासाठी कित्येक वेळा मुख्यार्थ बाजूला ठेवून अमुख्य म्हणजेच गौण अर्थ घ्यावा लागतो हाच लक्षार्थ होतो. शब्दांच्या या शक्तीस 'लक्षणा' असे म्हणतात. व या शक्तीमुळे प्रगट होणा-या अर्थास ‘लक्षार्थ’ असे म्हणतात. व्यवहारामध्ये किंवा काव्यामध्ये या शब्द शक्तीला महत्व असते. अभिधेपेक्षा ही शब्दशक्ती अधिक महत्त्वाची असून लेखनात व्यवहारात याची मदत घेतली जाते.

उदा.-

मी पु. ल. देशपांडे वाचले याचा वाक्यातील पु ल देशपांडे म्हणजे त्यांचे साहित्य असा होतो.

तू दगड आहेस या वाक्यातील दगड याचे कारण त्यांची कृती सारखी आहे.

लक्षणा शब्दशक्तीचे पुढीलप्रमाणे मुख्य दोन प्रकार पडतात:

**अ) निरुढा लक्षणा:**

मुळातील लक्ष अर्थ नंतर वाचा अर्थ बनतो तेव्हा निरुहा लक्षणा होते. यामध्ये मूळ अर्थ न घेता रूढीने प्राप्त झालेला अर्थ घेतला जातो.

उदा.- इंदा फिरविणे, ठिय्या देऊन बसणे

सातारा शूर आहे.

**ब) प्रयोजनवती लक्षणा:**

जेव्हा वाच्यार्थाच्या जागी वेगळा अर्थ घेण्याला काहीतरी प्रयोजन असले पाहिजे म्हणून अशा लक्षणेला प्रयोजनवती लक्षण असे म्हटले जाते. हे प्रयोजन जेव्हा व्यंग असते तेव्हा काव्यसौंदर्य निष्पन्न होते.

प्रयोजनवती लक्षणाचे दोन प्रकार पडतात:

**ब.१) गौणी (सादृश्यमूलक) लक्षणा:**

यामध्ये गुणसादृश्यामुळे लक्षणा होते. इथे उपमेय आणि उपमान यांच्यातील गुणसाधर्म्य दाखवले जाते.

**गौणी लक्षणेचे दोन प्रकार पडतात सादृश्येत्तर:**

ब.१.१ सारोपा - सदृश्य

ब.१.२ साध्यवसाना

**ब.१.१ सारोपा:**

उदा.- 'तिचे मुख म्हणजे चंद्रबिंबच' यामध्ये मुखाचा चंद्रावर अध्यारोप केला आहे. अर्थात सारोपामध्ये दोन वस्तूपैकी एकीचा दुसरीवर अध्यारोप केलेला असतो.

**ब.१.२ साध्यवसाना:**

जेथे उपमेय काढून केवळ उपमानाचीच योजना केली जाते तेव्हा साध्यवसाना लक्षणा होते.

उदा.- 'हा चंद्र भूतलावर उतरला आहे' येथे मुख्य शब्दाचे अध्यावसान (लोप) झाले आहे.

उदा.- कमल नयन पाहून मन झाले प्रसन्न.

**३.३.२ शुद्धा लक्षणा:**

यामध्ये गुणसामानतेशिवाय इतर पद्धतीने लक्ष्यार्थ घेतला जातो. सादृश्येत्तर संबंधावर अधिष्ठित झालेल्या शुद्ध लक्षणाचे चार प्रकार सांगितले जातात.

अ) सारोपा

ब) साध्यवसाना

क) उपादान (अजहल्लक्षणा)

ड) लक्षणलक्षणा (जहल्लक्षणा)

**अ) सारोपा:**

च्यवनप्राश म्हणजे साक्षात बलच होय. च्यवनप्राश हे बल निर्मितीचे कारण आहे. या वाक्यातील संबंध सादृश्य मूलक नाही. याला शुद्धा सारोपा लक्षणा म्हणतात.

**ब) साध्यवसाना:**

'तो साक्षात बल सेवन करीत आहे.'

या ठिकाणी च्यवनप्राश शब्दाचे अध्यावसान झाले आहे. यामध्ये उपमेय काढून टाकलेला दिसतो.

**क) उपादान (अजहल्लक्षणा):**

'पानपतावर सव्वा लाख बांगडी फुटली'

या वाक्यामध्ये 'बांगडी फुटणे' याचा मुख्यार्थ 'वैधव्य येणे' या लक्षार्थाला प्रकट करीत आला आहे. म्हणजे तो लक्ष्यार्थामध्ये समाविष्ट आहे. उपादान लक्षणे मध्ये शब्दाचा मुख्यार्थ लक्षार्थामध्येच समाविष्ट होत असतो. तो पूर्णत: नाहीसा होत नाही असे दिसते.

**ड) लक्षणलक्षणा (जहल्लक्षणा):**

यामध्ये मुख्य अर्थ लक्षात आला पुढे करून आपण लुप्त होत असतो

उदा.- घरावरून हत्ती गेला.

**३.३.३ व्यंजना:**

या शब्द शक्तीवर काव्यसौंदर्य कवी निर्मिती अर्थावर अधिष्ठित असते रुक्ष अर्थाचे बाधा न होता शब्दोच्चार याबरोबरच रसिकाच्या अंतकरणात अर्थापेक्षा वेगळा अशा रमणीय अर्थाची जे अनंत वलय निर्माण होतात त्यांना व्यंगार्थ किंवा ध्वन्यार्थ असे म्हटले जाते शब्दांच्या व्यंजने व्यापाराने हे कार्य सिद्ध होते. मूळ अर्थाला बाधा न आणता दुसरा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती असते तिला ‘व्यंजना’ शक्ती असे म्हणतात. या शक्तीने प्रकट होणा-या अर्थाला ‘व्यंग्यार्थ’ असे म्हणतात. अभिनव गुप्ताने व्यंजना व्यापार अलौकिक मानला आहे धन्या अर्थाची प्रतीती येण्यासाठी सर्वोदय श्रोत्यांची आवश्यकता आहे कमी प्रमाणे श्रोताही प्रतिभा युक्त असावा लागतो इथे वाचा अर्थाप्रमाणे शब्दाच्या ठिकाणी सांकेतिक अर्थ नसतो कवीच्या अंतःकरणातील भाव वाचकाने किंवा श्रोत्यांनी कल्पना शक्तीने जाणून घ्यायचा असतो नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा अशी प्रतिभेची व्याख्या केली आहे ही नवनिर्माण शक्ती वाचकाच्या ठिकाणी असणे आवश्यक असते आपल्या प्रतिभेच्या साह्याने शब्दार्था वर केलेले संस्कार समजून घेण्यासाठी व्यंजना व्यापाराचा आश्रय घ्यावा लागतो यावें जनाने काव्याचे रहस्य प्रकट होते आनंदवर्धन आने ध्वनीला काव्याचा आत्मा म्हटले आहे.

**व्यंजना शब्दशक्तीचे पुढीलप्रमाणे दोन प्रकार पडतात:**

**अ) शाब्दी व्यंजना:**

शब्दावर अधिष्ठित असलेली शब्दशक्ती म्हणजे शाब्दी व्यंजना. यामध्ये एकाच शब्दाचे दोन अर्थ निघतात. जेव्हा दोन स्वतंत्र वाच्यार्थ असून एक संदर्भाने नियंत्रित झाला आणि दुसरा ध्वनी रूपाने व्यक्त होऊ लागला अथवा शब्दांच्या वाच्यार्थाला बाधा येऊन दुसराच अर्थ लक्षणेने घ्यावा लागला म्हणजे जो ध्वनी व्यापार प्रवृत्त होतो तो मूळ शब्दावर अधिष्ठीत असतो याला शाब्दी व्यंजना असे म्हणतात.

**शाब्दी व्यंजनेचे दोन प्रकार सांगितले जातात:**

अ.१ अभिधामूलक शाब्दी व्यंजना

अ.२ लक्षणामूलक शाब्दी व्यंजना

**अ.१ अभिधामूलक शाब्दी व्यंजना:**

मुख्य अर्थ निश्चित होऊनही मुख्य वृत्तीने त्या शब्दाचा दुसरा अर्थ ही आपल्या मनाला पुढे येतो. हा दुसरा अर्थ प्रस्तुत नसतो पण त्या शब्दाची कवीने अशी काही खास खुबीने योजना केलेली असते की, प्रस्तुत मुख्यार्थ निश्चित होऊनही व अप्रस्तुत अर्थही मुख्य व्यापाराने वाचकाच्या मनापुढे येतो हीच अभिधामूलक व्यंजना. शब्दाचा हा दुसरा अर्थ स्वतंत्ररित्या वाच्यार्थच असतो.

उदा.- १) राम गणेश गडकरीं यांच्या नाटकात अशा प्रकारची उदाहरणे पाहायला मिळतात. त्यांच्या 'भावबंधन' या नाटकांमध्ये प्रभाकर मी आता मुक्याचे व्रत सोडणार नाही' असे म्हणतो. यातील 'मुका' या शब्दाचा वाचा नसलेला तसेच चुंबन असे दोन्ही मुख्यार्थ. प्रभाकर असे म्हणतो त्या वेळेला त्याला मौनव्रत धारण करतो असा अर्थ अभिप्रेत आहे. संदर्भाच्या दृष्टीनेही ते योग्य आहे. पण या शब्दांमधून चुंबन व्रत असाही अर्थ ध्वनित होतो हा व्यंजना व्यापार होय.

२) कुस्करु नका ही सुमने। जरि वास नसे तिळ यास, तरी तुम्हास अर्पिली सु-मने॥

**अ.२ लक्षणामूलक व्यंजना:**

काही विशिष्ट हेतू मनात बाळगून लक्षणेचा अवलंब केला जातो पण कित्येक वेळा लक्षणेमागचे प्रयोजन केवळ लक्षणे व्यापाऱ्यांनी कळत नाही तेथे व्यंजना या शब्द शक्तीचा आश्रय घ्यावा लागतो. अशावेळी लक्षणे मूलक व्यंजना होते. गंगायां घोषः इथे गंगातट असे लक्षात घेतले तरीसुद्धा बोलणाऱ्याचा हेतू पूर्णपणे प्रकट होत नाही. गंगेवरून येणारा शीतल वारा गंगेचे पावित्र्य इत्यादी गोष्टी लक्षार्थाने समजू शकत नाहीत. त्यासाठी व्यंजना व्यापाराचे सहाय्य घ्यावे लागते. लक्षणामूलक व्यंजना व्यापाराची बरीच उदाहरणे सांगता येतात. बालकवींच्या संध्यातारक, प्रेम लेख, फुलराणी, औदुंबर यासारख्या कवितांमधून लक्षणामूलक व्यंजनेचा व्यापार दिसून येतो.

'छानी माझी सोनुकली ती ।

कुणाकडे ग पाहत होती? ।

कोण बरे त्या संध्येतून ।

हळुच पाहते डोकावून? ।

तो रविकर का गोजिरवाणा ।

आवडला आमुच्या राणींना।

लाजलाजली त्या वचनांनी ।

साधीभोळी ती फुलराणी ।

या चरणामध्ये आवडणे, लाजणे, डोकावून पाहणे यासारख्या चेतनधर्माचा फुलराणीच्या ठिकाणी बोध होतो. यासाठी फुलराणीचा प्रणयविद्ध मुग्धबालिका असा लक्षात घ्यावा लागतो. प्रणय लीलांचा रमणीय आविष्कार हे लक्षार्थाचे प्रयोजन होय. अर्थात हे व्यंग आहे आणि या कवितेचे रम्यत्व व व्यंग प्रयोजनातच आहे. वनदेवता आणि आकाशातील प्रणय देवता यांनी सूचित केलेली फुलराणीची प्रणयविद्ध मनस्थिती लज्जा, उत्कंठा, विरह यामुळे उद्भवलेली हुरहुर आणि शेवटी मिलनातील आनंद यांचे अतिशय बहारीचे चित्रण कवीने केलेले आहे. 'औदुंबर' या कवितेतील व्यापार हासुद्धा लक्षणामूलक व्यंजनाव्यापार आहे.

"पायवाट पांढरी त्यातून अडवीतिडवी पडे,

हिरव्या कुरणामधुन चालली काळया डोहाकडे

झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर

पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर"

सदानंद रेगे यांची 'वसंतागम' ही कविता ही या दृष्टीने पाहता येते.

वसंतागमी

तव नयनीची

रानपाखरे

नाहि बोलली

तर उमगावे

मनास माझ्या

गारठलेल्या

पाने झडल्या

कसे खोडकर

हिरवे हिरवे

छटेल फसवे

चैत्र फुलांचे

वेडे कोडे?

**ब) अर्थी व्यंजना:**

यामध्ये मूळ अर्थासोबत वेगळा अर्थसुद्धा व्यक्त होतो. शब्दांचे वाच्यार्थ एकाहून अधिक नसले तरी वाच्यार्थहून भिन्न आणि हृदयंगम असा अर्थ वाचकांच्या मनापुढे तरळू लागतो. याला वाचक अगर लक्षक शब्दांचे मुळीच सहाय्य लागत नाही. हा केवळ अर्थ व्यापार आहे म्हणूनच या व्यंजनेला अर्थी हे नाव दिले आहे. उदा. भा. रा. तांबे यांची 'नववधू' ही कविता. या कवितेमधून दोन भिन्न पातळीवरील अर्थाचा प्रत्यय येतो नववधूच्या मनाची रमनी अवस्था काव्यामध्ये चित्रीत झालेली आहे.

एवंवादिनि देवेषां पार्श्वे पितुरधोमुखी।

लीलाकमलपत्राणि गणयामास पार्वती ॥

- **कुमार संभव:**

पार्वतीला मागणी घालण्यासाठी शंकराकडून अंगिरस ऋषी हिमालयाकडे आले असता पार्वती पिता शेजारीच उभी होती. अंगीरस ऋषींनी शंकराकडून मागणी घातली असता, त्याच्या बाजूला उभी असलेली पार्वती आपल्या हातातील कमळाच्या पाकळ्या मोजू लागते. पार्वती आपल्या हातातील कमळाच्या पाकळ्या मोजू लागते या क्रियेने सूचित होणारे तिच्या अंतःकरणातील लज्जा, आनंद, उत्सुकता इत्यादी भाव रसिकांना आनंद देतात. कवीने येथे ध्वनीचा उपयोग केला आहे. हेच ध्वनीकाव्य होय.

**आर्थी व्यंजनेचे तीन प्रकार पडतात:**

ब.१ वस्तुध्वनी

ब.२ अलंकारध्वनी

ब.३ रसध्वनी

**ब.१ वस्तुध्वनी:**

वाच्यार्थातून व्यक्त होणारा ध्वन्यार्थ कधीकधी केवळ वस्तूचा अगर कल्पनेचा आविष्कार करतो. येथे व्यंग्य केवळ वस्तूरूप, कल्पनारूप असते तेव्हा वस्तूध्वनी होतो.

उदा.- 'सूर्य अस्तास गेला' या वाक्यातील अर्थाच्या विविध छटा श्रोत्यांच्या मनावर उमटत जातात. त्या केवळ वस्तुरूप, कल्पनारूप आहेत म्हणून तो वस्तूध्वनी होतो.

**ब.२ अलंकारध्वनी:**

जेव्हा व्यंग्य एखाद्या अलंकाराच्या रूपाने व्यक्त होते तेव्हा अलंकार ध्वनी होतो. यातील अलंकार स्पष्ट नसून सूचित असतो.

जिवित आशा बलवंती धनाशा दुर्बलम।

गच्छवा तिष्टवा कांता सावस्था तू निवेदिता।

व्यापारासाठी परदेशी जाणाऱ्या पतीला त्याची पत्नी प्रवासाला जा किंवा नको असे स्पष्ट न सांगता माझी जगण्याची इच्छा प्रबळ तर धनाची इच्छा दुर्बळ आहे काय करायचे ते तुम्ही ठरवा असे उत्तर देते. याठिकाणी अप्रत्यक्षपणे प्रवासला जाऊ नका असे सुचवले आहे.

**ब.३ रसध्वनी:**

रसध्वनी हा शब्दाने कधीच वाच्य होऊ शकत नाही. सहृदय रसिकाच्या ठिकाणी विदग्ध बुद्धीलाच त्याची प्रचिती येऊ शकते. तो स्वसंवेद्य आहे. याला 'अलौकीक ध्वनी' असेही नाव आहे. धन्यालोककारांनी याला काव्याचा आत्मा म्हटले आहे. रसध्वनीची प्रतीती एकदम येते. यास 'असंलक्ष्यक्रमध्वनी' असेही नाव आहे.

उदा.- "नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुंडले।

नुपुरे त्वभिजानामि नित्य पादाभिवंदनात्॥"

- **रामायण किष्किंधाकांड:**

यामध्ये 'मी नुपुरे ओळखतो' हा वाच्यार्थ कवीला अभिप्रेत नाही तर लक्ष्मणाची सीतेकडे पाहण्याची दृष्टी सूचित केली आहे. सीतेविषयीची भक्ती, त्याची पवित्र शुद्ध दृष्टी इत्यादीच्या सूचकतेमुळे प्रस्तुत काव्य रसिक हृदयाला आल्हाद देते. हेच ध्वनीकाव्य होय.

**आपली प्रगती तपासा:**

१) साहित्याचे स्वरूप व कार्य सविस्तर लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------

## ३.४ समारोप

अशा प्रकारे भाषेमध्ये शास्त्र भाषा, व्यवहार भाषा आणि साहित्य भाषा पहायला मिळत असतात. साहित्य भाषेचे स्वरूप इतर भाषांच्या तुलनेत तिचे कार्य ही भिन्न आहे. साहित्य भाषेचे मुख्यता तीन प्रकार पडतात अभिधा लक्षणा आणि व्यंजना. अभिधा शब्दशक्तीच्या अंतर्गत रूढी, योग आणि योगरूढी असे प्रकार आहेत. जिथे अभिधा शब्दशक्तीला अर्थाला

मर्यादा येते तिथे दुसऱ्या शब्दशक्तीचा विचार म्हणजे लक्षणेचा विचार केला जातो. लक्षणेमध्ये निरूढा आणि प्रयोजनवती या लक्षणा सांगता येतात. दोन्हीमध्ये सारोपा आणि साध्यवसाना असे उपप्रकार आहेत. तर प्रयोजनवती लक्षणेमध्ये उपादान आणि लक्षणलक्षणा असे आणखी दोन उपप्रकार पहायला मिळतात. शब्दाची सर्वात महत्त्वाची शब्दशक्ती म्हणजे व्यंजना. लेखक त्याच्या साहित्यामध्ये या शब्दशक्तींचे उपयोजन करत असतो. व्यंजना शब्दशक्तीमध्ये शाब्दी व्यंजना आणि आर्थी व्यंजना असे दोन मुख्य प्रकार पडतात. शाब्दी व्यंजनेमध्ये अभिधामूलक शाब्दी व्यंजना आणि लक्षणा मूलक शाब्दी व्यंजना तर आर्थी व्यंजनेमध्ये वस्तूध्वनी, अलंकार ध्वनी आणि रसध्वनी असे प्रकार पडतात. एकूणच भाषेचा विचार करता साहित्य व्यवहारामध्ये शब्दशक्ती भाषेचे महत्त्वाचे कार्य बजावत असतात. अशा भाषेमुळे साहित्याचे सौंदर्य निश्चितच खुलून दिसते.

## ३.५ संदर्भ ग्रंथ


- काव्यशास्त्रप्रदीप - स.  रा गाडगीळ
- अभिनव काव्यप्रकाश - रा श्री जोग
- भारतीय साहित्यशस्त्र - ग त्रं देशपांडे
- भारतीय साहित्यविचार - डॉ लीला गोविलकर
- साहित्याची भाषा - भालचंद्र नेमाडे
- साहित्य विचार - अ वा कुलकर्णी
- साहित्य स्वरूप आणि समस्या - वसंत पाटणकर


## ३.६ प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१) शब्दशक्ती म्हणजे काय? ते सांगून शब्दशक्तीच्या प्रकारांचे सविस्तर विवेचन करा.

२) विविध शब्दशक्ती कोणत्या त्यातील कोणत्याही दोन शब्द शक्तींचे प्रकारांसह सविस्तर विवेचन करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न.

१) साहित्याची भाषा म्हणून अभिधेचे कार्य सविस्तर सांगा.

२) साहित्याची भाषा म्हणून लक्षणेचे कार्य सविस्तर सांगा.

३) साहित्याची भाषा म्हणून व्यंजनेचे कार्य सविस्तर सांगा.

**क) एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. अभिधा या शब्दशक्तीचे प्रकार सांगा.

२. लक्षणा या शब्दशक्तीचे मुख्य प्रकार सांगा.

३. गौणी लक्षणा या शब्दशक्तीचे प्रकार सांगा.

४. शुद्धा लक्षणा या शब्दशक्तीचे प्रकार सांगा.

५. व्यंजना या शब्दशक्तीचे मुख्य प्रकार सांगा.

६. शाब्दी व्यंजना या शब्दशक्तीचे प्रकार सांगा.

७. आर्थी व्यंजना या शब्दशक्तीचे प्रकार सांगा.

*****

# घटक IV

# भारतीय साहित्यशास्त्र : निर्मितीप्रक्रिया व प्रयोजन विचार

१. साहित्य निर्मितीमागील कारणे : प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास

२. साहित्याची प्रयोजने : भरत ते अभिनवगुप्त

# ४.१

## साहित्य निर्मितीमागील कारणे : प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास

**घटक रचना**

४.१.१ उद्दिष्टे

४.१.२ प्रस्तावना

४.१.३ विषय विवेचन

४.१.४ प्रतिभा

- भट्टतौत
- दण्डी
- भामह
- वामन
- आनंदवर्धन
- रुद्रट
- राजशेखर
- अभिनवगुप्त
- मम्मट
- हेमचंद्र
- माहिमभट्ट
- जगन्नाथ

४.१.५ प्रतिभेच्या व्याख्या

४.१.६ प्रतिभेच्या वैशिष्ट्ये

४.१.७ व्युत्पत्ती

४.१.८ अभ्यास

४.१.९ समारोप

४.१.१० स्वाध्याय

४.१.११ संदर्भग्रंथसूची

## ४.१.१ उद्दिष्टे

- साहित्याच्या निर्मितीमागील कारणांची सविस्तर मांडणी करणे.
- साहित्य निर्मितीचे नेमके स्वरूप काय आहे याबद्दल चर्चा करणे.
- साहित्य निर्मितीसाठी महत्वाचे घटक कोणते आहेत याची चर्चा करणे.
- भारतीय परंपरेतील प्रतिभाशक्तीचा आढावा घेणे.
- प्रतिभेचा अर्थ व तिचे स्वरूप समजून घेणे.
- साहित्य निर्मितीमागील व्युत्पत्ती हे कारण समजून घेणे.
- साहित्य निर्मितीमागील अभ्यास हे कारण स्पष्ट करणे.

## ४.१.२ प्रस्तावना

प्राचीन काळापासून भारतात साहित्याचा सूक्ष्म विचार झालेला दिसून येतो. संस्कृतमध्ये साहित्यविषयक अनेक मौलिक ग्रंथ लिहिले गेले आहेत. साहित्यावरील शास्त्रीय स्वरूपाच्या ग्रंथनिर्मितीला सुरुवात इसवी सनापूर्वी झालेली दिसते. भरतमुनींचा 'नाट्यशास्त्र' हा नाट्यचर्चा करणारा ग्रंथ इ. स. पू. २०० ते इ. स. २०० या दरम्यान केव्हातरी लिहिला गेला असे मानले जाते. आपल्याला उपलब्ध असलेला तो पहिला साहित्यशास्त्रीय ग्रंथ आहे. यापासून पुढे २००० वर्ष ही काव्यचर्चा सुरू राहिली; एवढेच नव्हे तर उत्तरोत्तर विकसित होत गेली. १८ व्या शतकातील जगन्नाथ पंडितापर्यंत या काव्यचर्चेचा उत्कर्ष दिसून येतो.

प्राचीन काळी 'साहित्य' हा शब्द आढळत नाही. साहित्य किंवा वाङ्मय या अर्थाने 'काव्य' हा शब्द रूढ होता. म्हणून साहित्यविषयक चर्चेला 'काव्यचर्चा' किंवा 'काव्यशास्त्र' असे संबोधले गेले. साहित्यशास्त्राला किंवा साहित्यचर्चेला 'क्रियाकल्प, काव्यालंकार', 'काव्यलक्षण' अशी नावे असलेली दिसतात.
'भारतीय साहित्यशास्त्र : निर्मितीप्रक्रिया व प्रयोजन विचार' या अभ्यासघटकामध्ये आपण 'साहित्य निर्मितीमागील कारणे: प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास' हा घटक अभ्यासणार आहोत. या घटकांतर्गत प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास या साहित्य निर्मितीमागील कारणांचा आढावा घेणार आहोत. तसेच साहित्यनिर्मितीचे नेमके स्वरूप काय आहे? साहित्यनिर्मितीसाठी महत्वाचे घटक कोणते आहेत? याबद्दलची चर्चा आपण करणार आहोत.

## ४.१.३ विषय विवेचन

प्राचीन काळापासून साहित्याच्या निर्मितीमागील काव्यकारणांच्या स्वरूपाचा विचार भारतीय व पाश्चात्य साहित्यात होत आलेला आहे. साहित्यनिर्मितीचे नेमके स्वरूप काय आहे? साहित्य निर्मितीसाठी महत्वाचे घटक कोणते आहेत? याबद्दलची चर्चा प्राचीन काळापासून होत आलेली दिसते. साहित्याची निर्मिती मुल्ययुक्त असते, वैशिष्ट्यपूर्ण असते. म्हणूनच साहित्याची निर्मिती कशी होते याचे सर्वांनाच एकप्रकारचे कुतूहल असलेले दिसून येते.

साहित्याची निर्मितीप्रक्रिया ही साहित्यशास्त्रातील एक महत्वाची संकल्पना आहे. कलेच्या निर्मितीतील एक महत्त्वाची चर्चा म्हणून निर्मितीप्रक्रियेचा विचार मानला जातो. लेखन करताना लेखकाची कोणती मानसिक प्रक्रिया घडून येते याचा अभ्यास यात होतो. लेखकाची निर्मितीप्रक्रिया नेमकी कधीपासून सुरू होते याबद्दल अभ्यासकांमध्ये मतमतांतरे आहेत. त्यामुळे साहित्याची निर्मिती ही प्रक्रिया फार गुंतागुंतीची आहे. भारतीय साहित्यशास्त्रकारांनी प्रतिभा, स्फूर्ती, उत्प्रेक्षा, भावनात्मकता, व्युत्पत्ती व अभ्यास, बहुश्रुतता अशी वेगवेगळी काव्यकारणे सांगितली आहेत. यापैकी प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास ही तीन जनक कारणे मानली जातात. इतर कारणे गौण मानली जातात.

साहित्याची निर्मिती प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास या प्रमुख तीन कारणांमुळे होते असे मानले गेले तरी प्रतिभा हे मुख्य काव्यकारण असल्याचे अनेक अभ्यासकांनी म्हटले आहे. प्रतिभेला 'कल्पनाशक्ती' असेही म्हटले जाते. कलेचा, साहित्याचा कल्पनाशक्तीशी काय संबंध आहे? कलेच्या क्षेत्रात 'कल्पनाशक्ती' या संज्ञेचा अर्थ कोणता आहे? असे प्रश्न निर्माण होतात तेव्हा आपल्या असे लक्षात येते की कला- साहित्याच्या क्षेत्रात 'कल्पनाशक्ती' ही संज्ञा 'प्रतिभा' या अर्थाने योजली जाते. ही संज्ञा नवनिर्मिती करणारी शक्ती या अर्थानेही वापरली जाते.

कलेच्या क्षेत्रात प्रतिभेला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. साहित्य ही कल्पनाजनित कला आहे; तर प्रतिभा वा कल्पनाशक्ती ही साहित्याची कारकशक्ती आहे. कलानिर्मितीसाठी प्रतिभा अत्यंत आवश्यक असते, त्याखेरीज कलानिर्मिती शक्य नसते. प्रतिभा ही अलौकिक शक्ती आहे. साहित्याच्या निर्मितीमध्ये जशी प्रतिभा महत्त्वाची असते तशीच साहित्याच्या आस्वाद प्रक्रियेमध्येही प्रतिभा महत्त्वाची आहे. कला– साहित्याचे विश्व हे कल्पनाजनित असते. कलावंत आपल्या कलाकृतीतून जेव्हा नवविश्वाची निर्मिती करीत असतो तेव्हा त्यामागे त्या कलावंताची प्रतिभा असते. साहित्याच्या निर्मितीसाठी प्रतिभेबरोबरच व्युत्पत्ती व अभ्यास ही काव्यकारणेही महत्त्वाची आहेत. या अभ्यासघटकामध्ये प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास या काव्यकारणांचा परामर्श घ्यावयाचा आहे.

**साहित्य निर्मितीमागील कारणे:**

- प्रतिभा
- व्युत्पत्ती
- अभ्यास

## ४.१.४ प्रतिभा

उत्कृष्ट काव्यनिर्मितीसाठी लेखकाच्या ठिकाणी ज्या गुणाची नितांत आवश्यकता असते त्या विशेष गुणाला 'प्रतिभा' असे म्हणतात. प्रतिभा ही एक अलौकिक शक्ती आहे. तेज, प्रकाश, बुद्धी, स्फूर्ती, प्रज्ञा असे वेगवेगळे अर्थ प्रतिभेचे सांगितले जातात. इटालियन मानसशास्त्रज्ञ लोंब्रोसो याने प्रतिभेला वेडाची बहीण मानले. एक नवीन अपूर्व विश्व निर्माण करण्याचे सामर्थ्य प्रतिभाशक्तीत असते. प्रतिभेच्या सहाय्याने दिव्य स्वरूपाचे ज्ञान कलावंताजवळ येत असते. साहित्यकृती ही लेखकाच्या प्रतिभा शक्तीतून शब्दांद्वारे बद्ध झालेली कलाकृती असते.

मनुष्याचा मेंदूवर किंवा मनावर बालपणापासून विविध प्रकारचे संस्कार होत असतात. अनेक अनुभव, वेगवेगळी माणसे, अनेक दृश्य, विविध प्रसंग या सर्वांचे तपशील त्याच्या स्मृतीत असतात. या अनुभवाच्या सूक्ष्म तपशिलातून ईष्ट असा भाग निवडला जातो आणि त्याची मांडणी, मिश्रण, एकत्रीकरण, संगती, समन्वय हे काही वेगळ्या प्रकाराने करून नवीनच व्यक्तिप्रसंग निर्माण करणे हे प्रतिभेचे कार्य असते.

प्रतिभा म्हणजे नेमके काय? प्रतिभेची प्रक्रिया कशा प्रकारची असते? तिचे नेमके स्वरूप कसे असते? यासंबंधी काही संस्कृत साहित्यमीमांसकांनी आपापल्या कल्पना मांडल्या आहेत. या कल्पना आपण सविस्तर पाहू. भट्टतौत, आनंदवर्धन, दण्डी, भामह, वामन, अभिनवगुप्त, मम्मट, रुद्रट, हेमचंद्र, माहिमभट्ट, राजशेखर, जगन्नाथ या संस्कृत साहित्य अभ्यासकांनी प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास ही तीन जनक कारणे सांगितली. त्यापैकी प्रतिभा या काव्यकारणाचे भारतीय साहित्यमीमांसकांनी केलेले विवेचन पुढीलप्रमाणे –

- **भट्टतौत:**

भट्टतौत याने कवीजवळ असलेल्या वर्णन करण्याच्या शक्तीला प्रतिभा म्हटले आहे. भट्टतौत याने 'दर्शन' व 'वर्णना' अशा दोन संकल्पना मांडल्या. त्याच्या मते, ज्याला दर्शन झाले त्याला ऋषी म्हणतात. हे दर्शन वस्तूधर्मातील तत्त्वाच्या ज्ञानाच्या स्वरूपाचे असते. कवीला होणारे वस्तूचे दर्शन ऋषींना होणाऱ्या दर्शनासारखे असते. म्हणजे ते सामान्य मनुष्यांना होणाऱ्या दर्शनापेक्षा वेगळे असते. कवी वर्णनाच्या रूपात आपले दर्शन साकार करतो म्हणून तो कवी ठरतो. ऋषी हे कवी ठरत नाहीत. कारण ऋषीला झालेले दर्शन वर्णनाच्या रूपात साकार होत नाही म्हणून तो कवी ठरत नाही आणि वर्णना शक्य होते ती प्रतिभेमुळे. म्हणून कवीच्या ठिकाणी प्रतिभा शक्ती असते. स्वतःला झालेले वस्तूंचे दर्शन जो वर्णनाच्या रूपात साकारतो तोच कवी ठरतो. ज्याच्या जवळ प्रतिभा शक्ती आहे त्यालाच हे वर्णन करता येते. म्हणजेच कवीच्या ठिकाणी प्रतिभा शक्ती असावी लागते.

- **दण्डी:**

**"पूर्ववासनागुणानुबन्धि प्रतिभानम।"**

दण्डीने प्रतिभेचे स्वरूप स्पष्ट करताना ती नैसर्गिकी व पूर्ववासनागुणानुबंधी असते असे म्हटले आहे. त्याच्या मते, प्रतिभा म्हणजे पूर्वजन्मीच्या वासनागुणांवर अवलंबून असणारे ज्ञान होय .पूर्वजन्म हा संस्काराचा परिणाम आहे. म्हणजेच प्रतिभा ही ईश्वरनिर्मित शक्ती

असून ती संस्कारातून येत असते. प्रतिभा जर जन्मताच नसेल तर श्रृत (व्युत्पत्ती) व अभियोग (अभ्यास) यांच्या साहाय्याने ती मिळवता येते असेही त्याने म्हटले.

- **भामह:**

भामहाने आपल्या .या ग्रंथात प्रतिभेचे विवेचन केले आहे 'काव्यालंकार' उत्कृष्ट काव्यनिर्मितीसाठी कवी प्रतिभासंपन्न असावा लागतो असे तो म्हणतो. त्याच्या मते, गुरूजवळ अध्ययन केल्यामुळे मंदबुद्धीच्या मनुष्यालाही शास्त्राचे ज्ञान प्राप्त करून घेणे शक्य असते; परंतु एखादाच प्रतिभावान मनुष्य काव्यनिर्मिती करू शकतो.

- **वामन:**

**“जन्मांतरागत संस्कारविशेष:|”**

वामनाने दण्डीप्रमाणे प्रतिभा ही जन्मापासूनच असते असेच म्हटले आहे. प्रतिभेचे स्वरूप स्पष्ट करताना “'प्रतिभा हा पूर्वजन्मीपासून प्राप्त झालेला एक विशिष्ट संस्कार” असे त्याने म्हटले आहे. वामनाने प्रतिभेचे विवेचन करताना दण्डीप्रमाणेच प्रतिभेचा संबंध पूर्वजन्माशी जोडलेला दिसतो.

- **आनंदवर्धन:**

आनंदवर्धनाने प्रतिभा शक्तीचे वर्णन करताना असे म्हटले आहे की प्रतिभा ही वाग्देवता सरस्वतीच्या कृपाप्रसादाने लाभते. महाकवींच्या काव्यात त्यांच्या अलौकिक प्रतिभाशक्तीचा जो आविष्कार होतो तो वाग्देवता सरस्वतीच्या कृपाप्रसादामुळेच. असे अलौकिक प्रतिभा असलेले कालिदासासारखे महाकवी दोन- तीन किंवा फार तर पाच- सहाच झाले असावेत, असे आनंदवर्धनाने म्हटले आहे.

- **रुद्रट:**

रुद्रटाने प्रतिभेचे दोन प्रकार सांगितले. एक सहजा आणि दुसरी उत्पाद्या. सहजा प्रतिभा ही नैसर्गिक, ईश्वरदत्त देणगी असते. तसेच ती कवीबरोबरच बद्ध होते. तर उत्पाद्या प्रतिभा म्हणजे अधिकाधिक परिश्रमाने संपादन केलेली. उत्पाद्या प्रतिभा ही शास्त्र अभ्यासाने किंवा मनीमंत्र औषधोपचाराने प्राप्त होते. परंतु सहजा प्रतिभा हीच श्रेष्ठ असेही त्याने म्हटले.

- **राजशेखर:**

राजशेखर प्रतिभेला ‘शक्ती' म्हणतो. त्याने प्रतिभेचे स्वरूप स्पष्ट करताना ‘कारयित्री प्रतिभा' आणि ‘भावयित्री प्रतिभा' असे प्रतिभेचे दोन भेद सांगितले. कारयित्री प्रतिभा म्हणजे निर्माण करण्यासाठी लागते ती. ही प्रतिभा कलावंताजवळ असते. तर भावयित्री प्रतिभा वाचक, रसिक यांच्याजवळ असते. त्याने “प्रतिभा म्हणजे सर्व प्रकारचे शब्द, अर्थ, अलंकारांचे तंत्र, उक्तींचे मार्ग (शैली), आणि इतरही तसल्या गोष्टी अंतःकरणात प्रकाशित करते ती” अशी प्रतिभेची व्याख्या केली आहे.

- **अभिनवगुप्त:**

**"अपूर्ववस्तू निर्माणक्षम: प्रज्ञा|"**

"अपूर्व वस्तू निर्माण करणारी बुध्दी किंवा शक्ती म्हणजे प्रतिभा" अशी व्याख्या अभिनवगुप्ताने केली. वस्तूनिर्मितीमध्ये काव्याचे घटक कथानक, पात्रांचे दर्शन, स्वरूप कल्पना व त्या कल्पनेची मांडणी यांचा समावेश होतो. त्याच्या मते, कोणतीही वस्तू अपूर्व, अलौकिक करण्याची क्षमता प्रतिभेत असते. प्रतिभेमुळे आशय, रचना आदी सर्वच घटकांना अपूर्वत्व प्राप्त होत असते. अभिनवगुप्ताने प्रतिभेला काव्यार्थाला अलौकिक बनविणारी शक्ती मानले. केवळ शब्दार्थांच्या मांडणीने काव्य निर्माण होत नाही. व्यंजनेचा वा ध्वन्यार्थाचा प्राणही प्रतिभाच आहे असे त्याने म्हटले आहे.

- **मम्मट:**

**"शक्ती कवित्वबीजरूप संस्कारविशेष:|"**

मम्मटाच्या मते, "प्रतिभाशक्ती म्हणजे कवित्वबीजरूपी विशिष्ट संस्कार आहे." ही शक्ती नसेल तर काव्यनिर्मिती होऊ शकत नाही. प्रतिभा ही कवित्वाच्या मुळाशी असणारी एक आवश्यक शक्ती आहे. चांगले काव्य निर्माण होण्यासाठी प्रतिभेची आवश्यकता असते. प्रतिभा नसेल तर चांगले काव्य निर्माण होऊ शकणार नाही व जर निर्माण झालेच तर ते उपहासास्पद होईल. मम्मटानेही भामहाप्रमाणे प्रतिभा जन्मताच पूर्वसंस्काराने निर्माण होत असते असे म्हटले.

- **हेमचंद्र:**

**"नवोन्मेषशालिनी प्रज्ञा प्रतिभा|"**

"प्रतिभा म्हणजे नवनवीन उन्मेष धारण करणारी प्रज्ञा" अशी प्रतिभेची व्याख्या हेमचंद्राने केली. तसेच त्याने रुद्रटाप्रमाणेच प्रतिभेचे दोन प्रकार सांगितले. सहजा प्रतिभा आणि अनौषादी/ औपाधिकी प्रतिभा असे दोन प्रकार सांगितले. सहजा प्रतिभा म्हणजे जन्मतःच असलेली आणि औपाधिकी म्हणजे मंत्रशक्तीने, शास्त्रशुद्ध अभ्यासाने प्राप्त होणारी प्रतिभा असे त्याने म्हटले.

- **माहिमभट्ट:**

माहिमभट्टने प्रतिभेला भगवान शंकराचा तृतीय नेत्र म्हटले. त्याने प्रतिभेचा संबंध रसाविष्काराशी जोडला आहे. प्रतिभेमुळे कवीला त्रैलोक्यातील सर्व पदार्थांचा साक्षात्कार होत असतो असे त्याने म्हटले.

- **जगन्नाथ:**

जगन्नाथाच्या मते, भाषाप्रभुत्व व कल्पनाप्रभुत्व यांच्या मदतीने कवीने केलेली रचना व त्याच्यासाठी लागणारी शक्ती म्हणजे प्रतिभा होय. तसेच प्रतिभा ही काव्यास अनुकूल अशा

शब्दार्थांची रचना करण्याची शक्ती असते. देवता, महापुरुष यांच्या प्रसादाने वा अदृष्टामुळे प्रतिभा प्राप्त होते असेही त्याने म्हटले आहे.

- **प्रभाकर पाध्ये:**

मराठी साहित्यविचारामध्ये प्रतिभेचा जो विचार मांडलेला आहे तो संस्कृत किंवा पाश्चात्य साहित्यविचारातील कल्पनांवर आधारलेला आहे. मात्र प्रभाकर पाध्ये यांनी मांडलेला प्रतिभेचा विचार हा वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रभाकर पाध्ये यांच्या विवेचनात संज्ञा, बोधना व प्रतिभा या तीन संकल्पना महत्त्वूर्ण आहेत. तसेच त्यांनी प्रतिभेचे दोन प्रकार सांगितले. 'बद्ध प्रतिभा' व 'मुक्त प्रतिभा' असे प्रतिभेचे दोन प्रकार सांगितले.

थोडक्यात दण्डी, भामह, वामन, रुद्रट, मम्मट, अभिनवगुप्त, माहिमभट्ट, राजशेखर, जगन्नाथ या सर्वांनीच काव्यनिर्मितीसाठी 'प्रतिभा' हा घटक आवश्यक मानला. प्रतिभेशिवाय काव्य निर्माण होऊ शकत नाही हे सर्वांनी आवर्जून सांगितले. तसेच प्रतिभेचे स्वरूप नेमके सांगता न आल्यामुळे जवळपास सर्व साहित्यशास्त्रकारांनी प्रतिभेला अद्भुत , ,अलौकिक दैवी देणगी असे म्हटले आहे. प्रतिभा ही ईश्वरदत्त शक्ती असली तरी ती आपण अन्य मार्गानेही मिळवू शकतो. हे अन्य मार्ग म्हणजे व्युत्पत्ती व अभ्यास हे होत.

## ४.१.५ प्रतिभेच्या व्याख्या

- **भट्टतौत:**

    “प्रज्ञा नवोन्मेषशालिनी प्रतिभा माता!”

- **दण्डी:**

    'पूर्ववासनागुणानुबंधी‘ प्रतिभानम!”

- **अभिनवगुप्त:**

    “अपूर्ववस्तू निर्माणक्षम: प्रज्ञा|' '

- **मम्मट:**

    “शक्ती कवित्वबीजरूप संस्कारविशेष:|”

- **वामन:**

    “जन्मांतरागत संस्कारविशेष:|”

- **हेमचंद्र व वाग्भट:**

    “नवोन्मेषशालिनी प्रज्ञा प्रतिभा|"

## ४.१.६ प्रतिभेची वैशिष्ट्ये

**१) प्रतिभेचे अलौकिकत्व:**

प्रतिभा ही एक अलौकिक शक्ती आहे. या शक्तीचे स्वरूप शास्त्रीय भाषेत नेमके सांगता न आल्यामुळे जवळपास सर्व साहित्यशास्त्रकारांनी प्रतिभेला अद्भुत,अलौकिक , दैवी देणगी असे म्हटले आहे. प्रतिभाशक्ती लेखक, कवींमध्ये इतरांपेक्षा अधिक प्रमाणात असते. लेखक, कवी अलौकिक असे विश्व आपल्या साहित्यातून निर्माण करत असतात. म्हणूनच साहित्यातून मिळणारा आनंद हा अलौकिक असतो असे म्हणतात.

प्रतिभेचे एक तत्त्व आहे ते म्हणजे तिचे विरलत्व. यामुळेच प्रतिभा ही अलौकिक शक्ती आहे असे म्हटले जाते. प्रतिभा कमी लोकांनाच प्राप्त होते. बहुतेक जणांच्या ठिकाणी ही शक्ती नसते. म्हणून तिला अलौकिक शक्ती म्हणतात. आनंदवर्धनाने आपला प्रतिभाविचार मांडताना केलेले विधान येथे लक्षात घ्यावे लागते. त्याच्या मते, “अलौकिक प्रतिभा असलेले कालिदासासारखे महाकवी दोन- तीन किंवा फार तर पाच- सहाच झाले असावेत.” एकंदर, एक नवीन अपूर्व विश्व निर्माण करण्याचे सामर्थ्य प्रतिभाशक्तीत असते. प्रतिभेच्या सहाय्याने दिव्य स्वरूपाचे ज्ञान कलावंताजवळ येत असते.

**२) प्रतिभाव्यापार:**

प्रतिभेशिवाय काव्यनिर्मिती शक्य होत नाही. प्रतिभाशक्तीमुळे मनोवृत्ती तल्लीन होते व साहित्यिकाला शब्द आपोआप सुचतात. म्हणजेच कवीच्या ठिकाणी दिव्यशक्ती असते. त्यालाच आपण प्रतिभा म्हणतो. प्रतिभा ही एक अलौकिक शक्ती आहे. तेज, प्रकाश, बुद्धी, स्फूर्ती, प्रज्ञा असे वेगवेगळे अर्थ प्रतिभेचे सांगितले जातात. भारतीय साहित्यशास्त्रकारांनी काव्यनिर्मितीसाठी 'प्रतिभा' हा घटक आवश्यक मानला. प्रतिभेशिवाय काव्य निर्माण होऊ शकत नाही हे सर्वांनी आवर्जून सांगितले.

काही मानसशास्त्रज्ञांनी प्रतिभा ही वेडाची बहीण आहे असे म्हटले. इटालियन मानसशास्त्रज्ञ लोंब्रोसो याने प्रतिभेला वेडाची बहीण मानले. त्याच्या मते, प्रतिभा ही मनाची विकृती आहे आणि जेव्हा या मानसिक विकृतीचा अंश जेव्हा तीव्र बनतो तेव्हा काव्यनिर्मिती होते. शेक्सपियरनेही कलावंतांना वेडे म्हटले आहे. वेडा व प्रतिभावंत या दोघांनाही जगाचे भान नसते असे त्याने म्हटले आहे

**३) अपूर्व वस्तू निर्माण करणारी शक्ती:**

“अपूर्ववस्तू निर्माणक्षम: प्रज्ञा|" असे प्रतिभेचे वर्णन अभिनवगुप्ताने केले. प्रतिभाशक्ती ही एक अपूर्व वस्तू निर्माण करणारी शक्ती आहे. कोणतीही वस्तू अपूर्व, अलौकिक करण्याची क्षमता प्रतिभेत असते. एका नव्या विश्वाची निर्मिती लेखक आपल्या कलाकृतीतून करीत असतो. माणसाच्या मनावर किंवा मेंदूवर लहानपणापासून विविध प्रकारचे संस्कार होत असतात. अनेक अनुभव, वेगवेगळी माणसे, अनेक दृश्य, विविध प्रसंग या सर्वांचे तपशील त्याच्या स्मृतीत असतात. ते माणसाच्या मनात सुप्तावस्थेत असतात. हे सर्व अनुभव, विविध प्रसंग, अनेक दृश्य पुन्हा शब्दांनी चित्रित केले जातात ते केवळ प्रतिभेमुळे. साहित्यातून नव्याने झालेली ही निर्मिती अपूर्व असते.

## ४.१.७ व्युत्पत्ती

साहित्य निर्मितीमागील कारणांचा विचार करताना प्रतिभेनंतर 'व्युत्पत्ती' या काव्यकारणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. उत्कृष्ट काव्यनिर्मितीस कारणीभूत असणाऱ्या तीन कारणांपैकी 'व्युत्पत्ती' हे एक काव्यकारण आहे. व्युत्पत्ती म्हणजे ज्ञान संपादन आणि व्युत्पन्न म्हणजे ज्ञानसंपन्न मनुष्य. कवीला केवळ प्रतिभा असून भागत नाही. ज्ञानसंपन्नही असावे लागते.

दण्डीच्या मते, प्रतिभा जर जन्मताच नसेल तर श्रृत (व्युत्पत्ती) व अभियोग (अभ्यास) यांच्या सहाय्याने ती मिळवता येते. अनुभव संपन्नता ही गोष्टही व्युत्पत्तीत समाविष्ट केली आहे. सत्यसृष्टीचे आणि मानवी जीवनाचे ज्ञान जितके खोल तितके कवीचे काव्य प्रत्ययकारी होण्याची शक्यता अधिक असते. काव्य जरी प्रतिभेने शक्य होत असले तरी काव्याला बळकटी आणि सौंदर्य प्राप्त करून देण्यास कवीची व्युत्पन्नता उपयोगी पडते. म्हणून कवीच्या ठिकाणी बहुश्रृतता असणे आवश्यक असते. दण्डी व्युत्पत्तीला 'व्रत' असेही म्हणतो.

भामहाच्या मते, काव्यरचनेसाठी प्रतिभेबरोबरच आणखी काही गुण आवश्यक असतात. ते गुण म्हणजे शब्द व अर्थ यांचे पक्के ज्ञान, इतर कवींच्या रचनांचे अवलोकन आणि अन्य काही विषयांचे ज्ञान हे होत.

प्रतिभा ही व्युत्पत्ती आणि काव्यरचनेचा अभ्यास यांच्यामुळे प्राप्त होऊ शकते असे जगन्नाथ म्हणतो. तर मम्मटाने व्युत्पत्तीला 'निपुणता' असे म्हटले आहे. त्याने शक्ती, निपुणता व अभ्यास या तीन गोष्टींचा काव्यकारण म्हणून विचार केला आहे.

रुद्रटानेही काव्यनिर्मितीसाठी प्रतिभेबरोबरच व्युत्पत्ती व अभ्यास यांना महत्त्व दिले आहे. तर राजशेखर याने व्युत्पत्ती उचित व अनुचित काय आहे याची जाणीव करून देते असे म्हटले.

काव्यनिर्मितीसाठी व्युत्पत्ती महत्त्वाची असली तरी प्रतिभेच्या मानाने तिचे स्थान गौण आहे. कारण व्युत्पत्ती अभावी काव्यनिर्मिती होऊ शकते मात्र प्रतिभेशिवाय काव्यनिर्मिती शक्य होत नाही.

## ४.१.८ अभ्यास

साहित्यनिर्मिती प्रक्रियेत प्रतिभा महत्त्वाची असली तरी व्युत्पत्ती व अभ्यास तिच्या खालोखाल महत्वाचे आहेत .व्युत्पत्ती व अभ्यास हे प्रयत्न साध्य आहेत.

काव्य उत्तमप्रकारे जाणणाऱ्या प्रतिभावंतांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः काव्य लिहिणे व त्यात शब्दांच्या वेगवेगळ्या अर्थाचा विचार करून, ते समजून घेऊन त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे हे 'अभ्यास' या संकल्पनेत अभिप्रेत आहे. म्हणजेच काव्याचे लेखन करताना प्रतिभावंत माणसांबरोबर पुन्हा पुन्हा चर्चा करून लेखन करणे म्हणजे अभ्यास होय.

अभ्यास म्हणजे एखाद्या गोष्टीचा पुन्हा पुन्हा सराव करणे. यामुळे चर्चा करण्याचे सामर्थ्य आपल्याला प्राप्त होते. अभ्यास आणि सराव यामुळे काव्याची कलात्मक मांडणीरसानुकूल ,

,वृत्तरचना अलंकार, समर्पक शब्द या बाबतीतील कौशल्य प्राप्त होऊ शकते. काव्यात असबध्दता, खडबडीतपणापुनरावृत्ती हे दोष , अभ्यासामुळे टाळता येतात. म्हणजेच काव्यातील सर्व गुण जाणून घेण्यास व त्यातील दोष टाळण्यासाठी अभ्यास उपयुक्त ठरतो. अभ्यासामुळे काव्याचे बाह्यांग आकर्षक होते तसेच ते रेखीव, निर्दोष बनते.

लेखक जेव्हा लिखाण करीत असतो तेव्हा त्याला सर्वप्रथम काय सांगायचे असते, शेवटपर्यंत काय लपवून ठेवायचे; जेणेकरून वाचकांना खिळवून ठेवता येते, शेवट कसा करायचा या गोष्टी लेखकाला आधीपासूनच माहीत असतात असे नाही. त्याला त्या अभ्यासाने मिळवता येतात. म्हणजेच अभ्यासाचे महत्त्व निर्माण होते. अशाप्रकारे साहित्याच्या निर्मितीमध्ये अभ्यास हे कारणही महत्त्वाचे असलेले दिसते.

## ४.१.९ समारोप

अशाप्रकारे साहित्याची निर्मिती व आस्वाद या दोन्ही प्रक्रियांमध्ये प्रतिभाशक्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रतिभेचे स्वरूप नेमके सांगता न आल्यामुळे जवळपास सर्व साहित्यशास्त्रकारांनी प्रतिभेला अद्भुत,अलौकिक , दैवी देणगी असे म्हटले आहे. प्रतिभा ही ईश्वरदत्त शक्ती असली तरी ती आपण अन्य मार्गानेही मिळवू शकतो. हे अन्य मार्ग म्हणजे व्युत्पत्ती व अभ्यास हे होत. थोडक्यात, साहित्य निर्मितीस कारण होणारी लेखकाची प्रतिभा, त्या प्रतिभेला सहाय्य करणारी व्युत्पत्ती आणि अभ्यास ही तीन कारणे प्राचीन साहित्यमीमांसकांनी सांगितली आहेत.

एकंदर या घटकांतर्गत साहित्याच्या निर्मितीमागील कारणांची सविस्तर मांडणी केली. प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास या साहित्य निर्मितीमागील कारणांचा आढावा आपण घेतला. तसेच साहित्यनिर्मितीचे नेमके स्वरूप काय आहे याबद्दल चर्चा केली.

**आपली प्रगती तपासा:**

- साहित्य निर्मितीमागील कारणे.

## ४.१.१० स्वाध्याय

**दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) साहित्य निर्मितीमागील प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास या कारणांचा सविस्तर आढावा घ्या.

२) प्रतिभा" हे साहित्यनिर्मितीमागील प्रमुख कारण आहे" या विधानाचा सोदाहरण परामर्श करा.

**टीपा.**

१) प्रतिभा

२) व्युत्पत्ती

३) अभ्यास

४) प्रतिभेची वैशिष्ट्ये

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कलानिर्मितीसाठी आवश्यक असणारी शक्ती कोणती?

२) उत्कृष्ट काव्यनिर्मितीसाठी कवीच्या ठिकाणी ज्या गुणाची नितांत आवश्यकता असते त्या विशेष गुणाला काय म्हणतात?

३) 'दर्शन' व 'वर्णना' अशा दोन संकल्पना कोणी मांडल्या?

४) "पूर्ववासनागुणानुबन्धि प्रतिभानम|" असे कोणी म्हटले?

५) "शक्ती कवित्वबीजरूप संस्कारविशेष:|" असे कोणी म्हटले?

६) राजशेखरने प्रतिभेचे कोणकोणते भेद सांगितले?

७) प्रभाकर पाध्ये यांनी प्रतिभेचे कोणते प्रकार सांगितले?

८) प्रतिभा ही काव्यास अनुकूल अशा शब्दार्थांची रचना करण्याची शक्ती असते, असे कोणी म्हटले?

९) हेमचंद्राने प्रतिभेचे किती प्रकार सांगितले?

१०) मम्मटाने व्युत्पत्तीला काय म्हटले आहे.?

११) राजशेखराने प्रतिभेची व्याख्या कशी केली?

१२) राजशेखर याने प्रतिभेचे कोणते दोन भेद सांगितले?

१३) अभिनवगुप्ताच्या मते प्रतिभा म्हणजे काय?

१४) व्यंजनेचा वा ध्वन्यार्थाचा प्राणही प्रतिभाच आहे असे कोणी म्हटले आहे?

१५) "नवोन्मेषशालिनी प्रज्ञा प्रतिभा|" असे कोणी म्हटले?

## ४.१.११ संदर्भग्रंथसूची


- देशपांडे ग. त्र्यं.,भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन,(ति. आ) मुंबई, १९८०

- पाटणकर वसंत, साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६.
- गणोरकर प्रभा, डहाके वसंत आबाजी व इतर (संपा), वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, ग. रा. भटकळ फाऊंडेशन, मुंबई, २००१.
- राजाध्यक्ष विजय व इतर (संपा), मराठी वाङ्मय कोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
- पाटणकर रा. भा., सौंदर्यमीमांसा, मौज प्रकाशन, मुंबई, (ति. आ) २००४
- कुलकर्णी वा. ल., साहित्य स्वरूप आणि समस्या, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७५
- कुलकर्णी अ. वा., काव्यशास्त्र प्रदीप, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
- यादव आनंद, साहित्याची निर्मितीप्रक्रिया, मेहता प्रकाशन, पुणे.


*****

# घटक IV

# भारतीय साहित्यशास्त्र : निर्मितीप्रक्रिया व प्रयोजन विचार

**१. साहित्य निर्मितीमागील कारणे : प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास**

**२. साहित्याची प्रयोजने : भरत ते अभिनवगुप्त**

# ४.२

## साहित्याची प्रयोजने : भरतमुनी ते अभिनवगुप्त

**घटक रचना**

४.२.१ उद्दिष्टे

४.२.२ प्रस्तावना

४.२.३ विषय विवेचन

४.२.४ साहित्याची प्रयोजने : भरतमुनी ते अभिनवगुप्त

- भरातमुनी
- भामह
- वामन
- रुद्रट
- मम्मट
- विश्वनाथ
- अभिनवगुप्त

४.२.५ मम्मटाचा प्रयोजन विचार

४.२.६ समारोप

४.२.७ स्वाध्याय

४.२.८ संदर्भग्रंथसूची

## ४.२.१ उद्दिष्टे

१) भारतीय प्रयोजनविचाराचा सविस्तरपणे आढावा घेणे.

२) साहित्याचे प्रयोजन म्हणजे काय ते समजून घेणे.

३) साहित्य कलेच्या प्रयोजनाबाबत असलेल्या भूमिकांचा सविस्तर आढावा घेणे.

४) संस्कृत साहित्यमीमांसकांचा म्हणजेच भरतमुनी ते अभिनवगुप्त यांचा प्रयोजनविचार अभ्यासणे.

५) मम्मटाने मांडलेल्या प्रयोजनविचाराची चिकित्सा करणे.

## ४.२.२ प्रस्तावना

'भारतीय साहित्यशास्त्र : निर्मितीप्रक्रिया व प्रयोजन विचार' या अभ्यासघटकामध्ये आपण 'भारतीय प्रयोजन विचार : भरतमुनी ते अभिनवगुप्त' हा घटक अभ्यासणार आहोत. या घटकांतर्गत भारतीय प्रयोजनविचाराचा सविस्तरपणे आढावा घ्यावयाचा आहे. साहित्याचे प्रयोजन म्हणजे काय ते समजून घेऊन साहित्य कलेच्या प्रयोजनाबाबत असलेल्या भूमिका, संस्कृत साहित्यमीमांसकांचा म्हणजेच भरतमुनी ते अभिनवगुप्त यांचा प्रयोजनविचार या सर्वाचा सर्वांगीण विचार आपण करणार आहोत.

प्रत्येक वस्तूच्या निर्मितीचे काही ना काही कारण असतेच. त्या वस्तूची निर्मिती ज्या कारणासाठी म्हणजेच ज्या हेतूसाठी केली जाते त्याला त्या वस्तूचे प्रयोजन म्हटले जाते. म्हणजेच विशिष्ट अशा हेतूने केलेल्या कार्याला प्रयोजन म्हणता येईल. प्रत्येक वस्तूच्या निर्मितीचा जसा काही ना काही हेतू असतो तसा साहित्य या कलेचाही हेतू असतो. लेखक का लिहितो? त्यामागे त्याचा हेतू काय असतो? वाचक का वाचतो? या सर्व प्रश्नांचा अभ्यास प्रयोजन विचारात केला जातो.

प्रयोजन म्हणजे हेतू वा उद्देश असे सर्वसाधारणपणे मानले जाते. साहित्य निर्मितीच्या वेळी जो हेतू लेखकाने किंवा कवीने मनात धरलेला असतो, त्याला सर्वसाधारणपणे साहित्याचे प्रयोजन असे म्हणतात. ही निर्मिती हेतूनिष्ठ किंवा प्रयोजनमूलक असते. व्यवहारात 'प्रयोजन' या संज्ञेसाठी विविध पर्यायी संज्ञा वापरल्या जातात. त्या संज्ञा म्हणजे हेतू, उद्देश, उद्दिष्ट, साध्य या होत. लेखक, कलावंत एखादी कलाकृती निर्माण करीत असताना त्यामागे त्याचा हेतू काय असतो? हा प्रश्न आपल्याकडे प्राचीन काळापासून चर्चिला गेला आहे. साहित्य या कलेचे वैशिष्ट्यपूर्ण असे स्वरूप पाहता त्याच्या प्रयोजनाबाबत अभ्यासकांमध्ये विविध मतमतांतरे असल्याचे दिसते.

सर्व ललितकलांचे एकमेव प्रयोजन मानले गेले ते म्हणजे रसिकांना सौंदर्यप्रतीतीचा आनंद देणे. मात्र चित्र, शिल्प, संगीत या ललित कलांचा विचार करता त्यांच्या तुलनेत साहित्य ही ललित कला वेगळी आहे. तिचे हे वेगळेपण आशयाच्या आणि जीवनदर्शनाच्या बाबतीत आहे. त्यामुळे केवळ आनंद देणे हे प्रयोजन साहित्याच्या बाबतीत लागू होत नाही, असे अनेक अभ्यासकांचे म्हणणे आहे. साहित्याच्या प्रयोजनाचा विचार करताना साहित्यमीमांसकांनी साहित्याची विविध प्रयोजने सांगितली.

साहित्य कलेच्या प्रयोजनाबाबत दोन व्यापक भूमिका असलेल्या दिसतात. पहिली भूमिका आहे ती जीवनवादी (बोध) आणि दुसरी कलावादी (आनंद) भूमिका. जीवनवादी म्हणजेच बोधवादी अथवा लौकिकतावादी तर कलावादी म्हणजे आनंदवादी अथवा अलौकिकतावादी वा स्वायत्ततावादी. साहित्यातून लेखकाने काहीतरी बोध घडवावा, नीतितत्त्वाचा परिपोष करावा, तसेच साहित्यातून जीवनविषयक तत्त्वज्ञान मांडलेले असावे अशी भूमिका जीवनवादी भूमिका म्हणून ओळखली जाते. तर कलावाद्यांच्या मते, साहित्यकृती ही स्वतंत्र असते. तिचे विश्व हे लौकिक विश्वाहून वेगळे असते. अलौकिक स्वरूपाचा आनंद देण्यासाठी तिची निर्मिती होत असते. यालाच कलावादी भूमिका म्हटले जाते. भारतीय व पाश्चात्य साहित्य प्रयोजन विचारामध्ये या दोन्ही भूमिका महत्त्वाच्या असलेल्या दिसून येतात.

## ४.२.३ विषय विवेचन

कोणतीही गोष्ट निर्माण करताना निर्मात्याचा त्याच्यामागे काही एक विशेष हेतू असतो, हा हेतू किंवा उद्देश म्हणजेच प्रयोजन होयसाहित्याच्या . प्रयोजनांचा विचार करताना साहित्याच्या निर्मितीमागचा हेतू काय? तसेच त्याचा परिणाम काय होतो? त्याचा उपयोग काय? या सर्व बाबींचा समावेश असतो .साहित्य या कलेचा आवाका बघता एकच एक साहित्याचे प्रयोजन सांगता येत नाही.

प्रयोजनाचा विचार दोन अंगाने करावा लागतो. लेखकगत प्रयोजन आणि वाचककगत प्रयोजन अशी ही दोन अंगे आहेत. साहित्यिक साहित्य निर्मिती का करतो? याचा विचार लेखकगत प्रयोजनात केला जातो. तर वाचक किंवा आस्वादक साहित्य का वाचतो? याचा विचार लेखकगत प्रयोजनात केला जातो.

भारतीय व पाश्चात्त्य साहित्यशास्त्रात साहित्याच्या प्रयोजनाचा विचार झालेला आहे. या घटकात आपण भारतीय साहित्यशास्त्रातील प्रयोजनविचार अभ्यासणार आहोत. भारतीय साहित्यशास्त्रातील प्रयोजनविचारात भरतमुनींपासून अभिनवगुप्तापर्यंत सर्वच साहित्यमीमांसकांनी साहित्य प्रयोजनांचा विचार विविध दृष्टिकोणातून केला आहे.

## ४.२.४ साहित्याची प्रयोजने : भरत ते अभिनवगुप्त

साहित्यनिर्मितीचा जो विशिष्ट हेतू असतो त्यातूनच साहित्याची निर्मिती होत असते, यालाच साहित्याचे प्रयोजन असे म्हणतात.

भारतीय साहित्य प्रयोजन विचारामध्ये ‘आनंद’ व ‘बोध’ ही दोन्ही प्रयोजने महत्त्वाची असलेली दिसतात. शिवाय हा प्रयोजन विचार लेखक आणि रसिक वा वाचक या दोन्ही घटकांच्या अंगाने केला गेलेला आहे. भारतीय साहित्यशास्त्रामध्ये भरतमुनी, भामह, वामन, रुद्रट, मम्मट, अभिनवगुप्त, विश्वनाथ यांनी त्यांच्या ग्रंथातून साहित्याची वेगवेगळी प्रयोजने सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

- **भरतमुनी:**

भारतीय परंपरेत साहित्यशास्त्राचा विचार भरतमुनी यांच्यापासून सुरू झाला. भरतमुनी भारतीय साहित्यशास्त्राचे जनक मानले जातात. भारतीय साहित्यशास्त्राचा विचार त्यांच्या ’नाट्यशास्त्र‘ (इ. स. पू. २०० ते इ. स. २००) या ग्रंथापासून सुरू झाला आहे. त्यांच्या 'नाट्यशास्त्र' ग्रंथाला संस्कृत साहित्यविचाराची गंगोत्री मानले गेले. या ग्रंथात भरतमुनींनी नाट्यकाव्याचे प्रयोजन सांगितले. ते पुढीलप्रमाणे -

**“हितोपदेशजननं धृतिक्रीडासुखादीकृत्|**

**दुःखार्तांना श्रमार्तांना शोकार्तांना तपास्विनाम्|**

**विश्रांतीजननं लोके नाट्यमेतन्मयाकृत्|”**

भरतमुनींनी सुखप्राप्ती, मनाला विश्रांती, हितोपदेश ही प्रयोजने सांगितली. भरतमुनींनी या श्लोकात असे म्हटले आहे, दुःखाने व्याकुळ झालेल्यांसाठी, श्रमाने थकलेल्यांसाठी, जे शोकाने ग्रस्त आहेत त्यांच्यासाठी, तसेच तपस्वी लोकांसाठी त्यांच्या विश्रांतीच्या वेळी त्यांना आनंद देण्यासाठी हे नाटक मी लिहिले आहे.

साहित्यापासून नागरिकांना हितकर असा उपदेश मिळतो. जे दुःखाने व्याकुळ झालेले आहेत, श्रमाने थकलेले आहेत, शोकाने पिडलेले आहेत या सर्वांच्या मनाला शांती मिळते; तसेच लोकांचे मनोरंजन होते. म्हणजेच वाचकांना हितकर असा उपदेश देणे, जे दुःख, श्रम, शोक याने पिडलेले आहेत त्यांचे सांत्वन करणे, त्यांच्या मनाला शांती देणे हे साहित्याचे प्रयोजन होय. येथे उपदेश, आनंद या दोन्हींना महत्त्व असलेले दिसते.

- **भामह:**

**“धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्य कलासुच|**

**प्रीति करोति कीर्तिंच साधुकाव्यनिबंधनम|”**

भामह याने आपल्या ‘काव्यालंकार' (इ. स. ६०० – ७००) या ग्रंथात आनंद व कीर्ती अशी काव्यप्रयोजने सांगितली आहेत. कीर्ती म्हणजे यशतर , प्रीती म्हणजे आनंद. साहित्याच्या निर्मितीमुळे लेखकाला यश मिळते, त्याचे नाव होते तर वाचकाला साहित्यवाचनाने आनंदाचा लाभ होतो. भामहाच्या मते, चांगल्या काव्यनिर्मितीने धर्म, अर्थमोक्ष या ,काम , .चतुर्विध पुरुषार्थाचा लाभ होतोतसेच ते प्राविण्य मिळवून देतात .

- **वामन:**

वामनाने काव्याच्या प्रयोजनकार्याचा विचार कवीच्या अंगाने केला. त्याने प्रीती व कीर्ती अशी दोन प्रयोजने सांगितली. ही प्रयोजने त्याने ‘काव्यालंकारसुत्र’ या ग्रंथात सांगितली आहेत. त्याने काव्याचे प्रयोजन सांगताना काव्याचे दृष्ट फल ‘प्रीती’ तर अदृष्ट फल ‘कीर्ती’ असे म्हटले. यातील प्रीती म्हणजेच आनंदाचा लाभ हा कवी आणि वाचक दोघांनाही होतो.

- **रुद्रट:**

रुद्रटाने ‘काव्यालंकार' (इ. स. ८५०) या ग्रंथात प्रयोजने मांडली. त्याने प्रीती, कीर्ती, व्युत्पत्ती, तसेच चतुर्वर्ग प्राप्ती म्हणजेच धर्म, अर्थ, काम, मोक्ष अशी साहित्य प्रयोजने सांगितली. रुद्रटाने चतु:वर्गावर भर दिला आहे. तो म्हणतो, काव्यामुळे चतुर्वर्गाचे ज्ञान अगदी सहजरीत्या आणि हळुवारपणे होते. कीर्ती, अर्थ ही प्रयोजने लेखकसंबद्ध आहे . साहित्य निर्मितीने लेखकाला कीर्ती लाभते म्हणजे त्याचा नावलौकिक होतो. तसेच त्याला अर्थप्राप्तीही होते.

- **मम्मट:**

मम्मटाने 'काव्यप्रकाश' (इ. स. ११००) या ग्रंथात प्रयोजन विचार मांडला आहे. मम्मटाची आपल्या पूर्वसूरींनी सांगितलेल्या साहित्य प्रयोजनांचे संकलन करणारी कारिका प्रसिद्ध

आहे. संस्कृत मीमांसकांनी मांडलेल्या प्रयोजन विचारात मम्मटाने सांगितलेली प्रयोजने प्रमाण मानली जातात.

**“काव्य यशसे अर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये**

**सद्यपरनिवृत्तये कांतासंमित तयोपदेशयुजे:!”**

साहित्य निर्मितीमुळे लेखकाला यश मिळते, त्याला प्रसिद्धी मिळते, त्याचा नावलौकिक होतो, म्हणजेच त्याला कीर्ती लाभते. तसेच त्याच्यावरील अशुभाचे निवारण होते. तर काव्यवाचनाने वाचकाला व्यवहारज्ञान होते, त्याला उच्चकोटीचा आनंद प्राप्त होतो, तसेच त्याला रोचक उपदेश मिळतो. म्हणजेच यश, कीर्ती व अमंगलाचा नाश ही प्रयोजने लेखकसंबध्द. तर व्यवहारज्ञान, उच्चकोटीचा आनंद, कांतासंम्मित ही रसिकसंबध्द प्रयोजने आहेत.

- **विश्वनाथ:**

अभिनवगुप्त व मम्मट यांनी म्हटल्याप्रमाणे विश्वनाथानेही साहित्याने अप्रत्यक्षपणे उपदेश करावा असे म्हटले आहेसाहित्याच्या निर्मितीने लेखकाला आनंदाची प्राप्ती होते ., तर साहित्याच्या आस्वादाने रसिकाला आनंदाची प्राप्ती होते .या आनंदाचे स्वरूप लौकिक आनंदापेक्षा वेगळे व श्रेष्ठ असते. साहित्यनिर्मितीने लेखकाला आणि साहित्य वाचनाने आस्वादकाला मिळणारा आनंद हा अलौकिक असतो असे विश्वनाथ म्हणतो.

- **अभिनवगुप्त:**

अभिनवगुप्ताने प्रीती व व्युत्पत्ती ही साहित्याची प्रयोजने सांगितली आहेत. प्रीती म्हणजेच आनंद व व्युत्पत्ती म्हणजे बोध. व्युत्पत्ती म्हणजे धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांच्या प्राप्तीसाठी आवश्यक उपायांची जाण म्हणजे व्युत्पत्ती असे अभिनवगुप्ताने म्हटले. काव्यापासून लाभणारी प्रीती ही रसास्वादाच्या स्वरूपाची असते. तसेच काव्यापासून व्युत्पत्ती लाभते म्हणजे धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांच्या प्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या उपायांचा बोध होतो. साहित्यापासून होणारा बोध जायास'ंम्मित 'असतो असे त्याने म्हटले. तसेच साहित्याचा प्रधान हेतू आनंद देणे हाच असल्याचे तो स्पष्टपणे म्हणतो.

## ४.२.५ मम्मटाचा प्रयोजन विचार

संस्कृत मीमांसकांनी मांडलेल्या प्रयोजन विचारात मम्मटाने सांगितलेली प्रयोजने प्रमाण मानली जातातमम्मटा .ने 'काव्यप्रकाश' (इ. स. ११००) या ग्रंथात प्रयोजन विचार मांडला आहे. त्याचा 'काव्यप्रकाश' हा ग्रंथ संस्कृत साहित्यशास्त्रातील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात काव्यप्रयोजनांचा विस्तृत विचार केला गेला.

मम्मटाची आपल्या पूर्वसूरींनी सांगितलेल्या साहित्य प्रयोजनांचे संकलन करणारी कारिका प्रसिद्ध आहे.

**“काव्य यशसे अर्थकृते व्यवहारविदे**

**शिवेतरक्षतये सद्यपरनिवृत्तये कांतासंमित तयोपदेशयुजे:!”**

यशप्राप्ती, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, शिवेतरक्षतये, उच्चकोटीचा आनंद, कांतासंम्मित उपदेश ही सहा प्रयोजने मम्मटाने सांगितली. काव्यनिर्मितीमुळे लेखकाला यश मिळते, त्याला प्रसिद्धी मिळते, कीर्ती लाभते. तसेच त्याच्यावरील अशुभाचे निवारण होते. तर काव्यवाचनाने वाचकाला व्यवहारज्ञान होते, त्याला उच्चकोटीचा आनंद प्राप्त होतो, तसेच त्याला रोचक उपदेश मिळतो. म्हणजेच यश, कीर्ती ही लेखकसंबध्द प्रयोजने आहेत. अमंगलाचा नाश, उच्चकोटीचा आनंद ही प्रयोजने लेखकसंबध्द व रसिकसंबध्द आहेत. तर व्यवहारज्ञान, कांतासंम्मित उपदेश ही रसिकसंबध्द प्रयोजने आहेत.

- **मम्मटाने सांगितलेली प्रयोजने:**

१) यशप्राप्ती

२) अर्थप्राप्ती

३) व्यवहारज्ञान

४) अशुभनिवारण (शिवेतरक्षतये)

५) उच्चकोटीचा आनंद

**६)** कांतासंम्मित उपदेश

**१) यशप्राप्ती:**

यशप्राप्ती हे प्रयोजन लेखकसंबद्ध आहे. काव्य निर्मिती करताना लेखकाच्या समोर यशप्राप्ती हा उद्देश असतो असे मम्मट म्हणतो. आपापल्या क्षेत्रात यश मिळावे, नावलौकिक व्हावा अशी सर्वांची इच्छा असते. असे वाटणे स्वाभाविक आहे. आपली कलाकृती सर्वांपर्यंत पोहचावी, त्याचे नाव व्हावे, आपल्या लिखाणाचा उचित असा सन्मान व्हावा असे लेखकाला वाटत असते. ही प्रबळ इच्छा कमी अधिक प्रमाणात सर्वांमध्ये असते. आपल्या कलेची कदर व्हावी असेच लेखकाला वाटत असते. कलेची कदर न झाल्यामुळे दुःखी होऊन आपला ग्रंथ अग्नीला अर्पण केल्याची उदाहरणेही पाहायला मिळतात.

* उदा. कवी गुणाढ्याने अत्यंत मेहनतीने लिहिलेल्या ग्रंथाची कदर राजाने केली नाही, म्हणून गुणाढ्याने आपला ग्रंथ अग्नीला अर्पण केला.

मात्र सगळेच लेखक, कवी या उद्देशाने लिहितात असेही म्हणता येत नाही. उदा. संत ज्ञानेश्वर, तुकाराम यांनी यशप्राप्ती या उद्देशाने अभंगरचना केली असे म्हणणे अयोग्यच आहे. अनेक कवी, लेखकांच्या बाबतीत हे लागू होते. मराठीतील केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, कुसुमाग्रज अशी अजून कितीतरी कवीं आणि लेखकांची नावे उदाहरणादाखल देता येतील. त्यांनी यशप्राप्ती हे प्रयोजन नजरेसमोर ठेवून साहित्यनिर्मिती केलेली दिसत नाही.

थोडक्यात काव्य वा साहित्य निर्मितीमुळे लेखकाला प्रसिद्धी लाभते. लेखकाचे नाव होते, त्याला लोकप्रियता लाभते. आपले लेखन लोकांनी आवडीने वाचावे तसेच आपले नाव व्हावे, आपली कीर्ती व्हावी असे लेखकाला वाटत असतेयशप्राप्तीची इच्छा अधिक . बलवत्तर व उदात्त असतेआपल्या साहित्यकृतीने इतरांना आनंद व्हावा एवढीच अपेक्षा . त्यामागे असते.

### २) अर्थप्राप्ती:

हे प्रयोजनही लेखकसंबद्ध आहेसाहित्य . निर्मितीमुळे लेखकाला जशी प्रसिद्धी मिळते, लोकप्रियता मिळते त्याबरोबरच अनेकदा अर्थप्राप्ती होते असे दिसून येते .अर्थ म्हणजे द्रव्य वा पैसा. आपले जीवन सुखदायक बनवायचे असेल तर माणसाला पैसा लागतो. कष्ट करून, कामे करून माणसे पैसे कमवतात. अगदी प्राचीन काळापासून हे चालत आलेले आपल्याला दिसते. पैशाच्या मोबदल्यात आपले श्रम विकून द्रव्य मिळवले जायचे. पूर्वीच्या काळी राजदरबारात असणारे कवी जी काव्यरचना करीत त्याच्या मोबदल्यात त्यांना राजाकडून धनलाभ होत असे. म्हणजेच राजदरबारातील कवींच्या मुळाशी अर्थप्राप्ती हे प्रयोजन असल्याचे दिसते.

काव्यलेखनामुळे अर्थप्राप्ती झाल्याची काही उदाहरणे मम्मटाने आपल्या ग्रंथात दिली आहेत.

**उदा.:**

- फारसी कवी फिरदौसी याने ‘शहानामाहा ग्रंथ द्रव्यप्राप्तीसाठी लिहिला '.
- श्रीहर्षाने धावक नावाच्या कवीला द्रव्य दिले.
- कालिदास बाण ,यांसारख्या कवींना राजाश्रय मिळाला होता, त्यामुळे त्यांना धनप्राप्ती झाली.

याखेरीज अजून बरीच उदाहरणे आपल्याला पाहता येतील. काही शाहिरांची उदाहरणे देता येतील. आपल्या कलेच्या जीवावर म्हणजेच शाहिरीवर आपली उपजीविका करणारे काही शाहीर कवी होते. तसेच शिवाजी महाराजांच्या वेळी कवी भूषण यास बरीच धनप्राप्ती झाली होती असे म्हटले जाते. असे असले तरी यालाही अपवाद आहे. काव्य रचना करणाऱ्या सर्वच कवींना द्रव्य मिळाले नाही किंवा मिळावे अशी अपेक्षा मनात न बाळगता अनेक जण रचना करतात. भवभूती, माघ, भतुहरी या कवींना राजाश्रय मिळाला नव्हता. अशी कितीतरी नावे घेता येतील. रुक्मिणीस्वयंवर लिहिणारे कवी नरेंद्र याने ग्रंथातील प्रत्येक ओवीसाठी मिळणारा सोनटक्का नाकारून आपला ग्रंथ कृष्णदेवरायाच्या नावावर करण्यास नकार दिला होता. म्हणजे सर्वच लेखक अर्थप्राप्ती हे प्रयोजन मनात ठेवून लिहितात असे म्हणणे अयोग्य आहे.

### ३) व्यवहारज्ञान:

काव्य हे आहे असे मम्मटाने ’व्यवहारविदे‘ म्हटलेत्याला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे . .राजदरबारीचा व्यवहार अतिशय मर्यादित अर्थ येथे घेतलेला आहे. त्याकाळी साहित्य

देवांवर किंवा राज्यघराण्यावर लिहीले जात होतेआज मात्र व्यवहारज्ञान . याचा अर्थ व्यापक पातळीवरून घेतला जातो हे व्यवहारज्ञान लोकव्यवहारावर .आधारलेले आहे .

आज साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस आहे. साहित्याने संपूर्ण मानवी व्यवहाराला व्यापून टाकले आहे. त्यात व्यवहारातील चालीरीती, रूढी- परंपरा या घटकांचा समावेश होतो. विविध स्वभावाच्या, विविध प्रवृत्तीच्या माणसांचे दर्शन साहित्यातून होते, तसेच नीतिमत्ता, तत्त्वज्ञान आणि संघर्षाचे चित्रण साहित्यातून आपल्याला होते. त्याबरोबरच मानवी मनाचे गूढ व्यापार साहित्यातून चित्रित झालेले असतात. मानवी जीवनव्यवहाराचे ज्ञान साहित्यातून होते. मानवाला साहित्यातून वेगवेगळ्या स्वरूपाचे अनुभव, महत्त्वपूर्ण असे ज्ञान प्राप्त होते. हे ज्ञान त्याला जीवन जगताना पोषक ठरणारे असे असते.

**४) अशुभनिवारण (शिवेतरक्षतये):**

हे प्रयोजन लेखकसंबद्ध आहे, तसेच ते रसिकसंबद्धही मानले जाते. काव्याच्या निर्मितीने आणि वाचनाने अशुभाचे निवारण होते. म्हणजेच आपल्यावरील संकटे टळतात अशी प्राचीन काळापासून श्रद्धा व विश्वास आहे. पूर्वीच्या काळी आपल्यावरील अशुभाचे निवारण होण्यासाठी मंत्रोच्चार केला जायचा. वैदिक काळात मंत्रगायनाने यज्ञदेवता व निसर्गशक्तीला आवाहन करून आपली इच्छा पूर्ण करून घेतली जात असे. कवीला ज्ञानी म्हटले जायचे. तसेच मंत्रद्रष्टा असे त्याला म्हणत.

साहित्य निर्मितीमुळे आपल्यावरील संकट टळते असे पूर्वी मानले जायचे. आपल्यावरील संकटाचे, अशुभाचे निवारण व्हावे यासाठी कवी काव्य लिहितो असे मम्मटाने म्हटले आहे . त्यासाठीत्याने काही उदाहरणे दिली आहेत. ती पुढीलप्रमाणे:

- मयूरकवीने .हे काव्य लिहिले आणि त्याचा कुष्ठरोग बरा झाला 'सूर्यशतक'
- कृष्णदयार्णव याने हा ग्रंथ लिहिल्यामुळे त्याचा कुष्ठरोग 'हरिवरदा' बरा झाला.
- जगन्नाथ पंडिताने एका यवनीशी संबंध ठेवला म्हणून समाजाने त्याला बहिष्कृत केले. पण त्याने गंगेच्या घाटावर बसून 'गंगालहरी' नावाचा ग्रंथ लिहिला आणि गंगेला प्रसन्न करून घेतले. गंगेने जगन्नाथाला पवित्र करून घेतले. त्यानंतर समाजाने त्याच्यावरील बहिष्कार थांबविला.
- बिल्हणकवीला त्याच्या शृंगारमूलक अपराधावरून त्याला सुळावर चढविण्याची शिक्षा झाली होती. तेव्हा त्याने शृंगारप्रचूर काव्य लिहून स्वतःची सुटका करून घेतली.

आजच्या काळात मम्मटाचे हे प्रयोजन लागू होत नाही. ते कालबाह्य ठरते किंवा ते आजच्या काळात वेगळ्या पद्धतीने स्वीकारता येऊ शकते. अशुभनिवारण म्हणजे आत्मबल वाढविणे असा अर्थ आजच्या काळात घेता येऊ शकतो.

**५) कांतासंम्मित उपदेश:**

हे प्रयोजन वाचकसंबद्ध आहे. मम्मटाने सांगितलेले साहित्याचे सहावे प्रयोजन 'कांतासम्मित उपदेश' हा आहेउपदेश . म्हणजे बोध. साहित्यातून आपल्या मनावर सदाचाराचे संस्कार होतात. आपल्या मनाला बोध होतो. 'कांतासम्मित उपदेश' या प्रकारामध्ये ललितकला , .कलांचा समावेश होतो .शिल्प इ ,नृत्य ,संगीत या उपदेशात सरळ बोध नसतो किंवा आज्ञाही नसतेतर पत्नी जशी आपल्या पतीला रोचक . शब्दात सल्ला देते तसा उपदेश यामध्ये असतोप्रसंगी अश्रू ,तीविनं ,त्यात आर्जव . अशी भूमिका असते. अशाच प्रकारचा उपदेश हितोपदेश, पंचतंत्र, इसापनीती, जातकतंत्र इ. कथांमधून केलेला आढळतो.

उपदेश हा रुक्ष व बोधवादी नसावा, तसेच तो प्रचारात्मक स्वरूपाचा नसावा असे साहित्यशास्त्रकारांनी सांगितले. मम्मटानेही हा उपदेश बोधवादी व रुक्ष नसावा असे स्पष्ट केले. हे प्रयोजन मम्मटाने अत्यंत रोचकपणे सांगितले असून त्यातून त्याची रसिकवृत्ती दिसून येते.

**६) उच्चकोटीचा आनंद:**

काव्यापासून उत्कट आनंद मिळतो असे मम्मटाने म्हटले. 'सद्यपरनिवृत्तये:' म्हणजे तात्काळ प्राप्त होणारा आनंद .'उच्चकोटीचा आनंद' हे साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन मानले जाते. साहित्य निर्मितीने लेखकाला तर साहित्य वाचनाने वाचकाला या अलौकिक आनंदाची प्राप्ती होत असते. मम्मटाने या प्रयोजनाला 'सकलप्रयोजनमौलिभूत' म्हटले. म्हणजेच त्याने या प्रयोजनाला सर्वश्रेष्ठ प्रयोजन मानले आहे. इतर साहित्यशास्त्रकारांनीही 'उच्चकोटीचा आनंद' याला साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन मानले.

हे प्रयोजन लेखकसंबध्द तसेच वाचकसंबद्ध आहे .साहित्य लिखाणाने लेखकाला व साहित्य वाचनाने वाचकाला असा दोघांनाही आनंद प्राप्त होतो. साहित्य निर्मितीने लेखकाला मिळणारा आनंद हा नवनिर्मितीचा व आत्माविष्काराचा असतो. तसेच तो बुद्धिग्राह्य व अतिंद्रिय स्वरूपाचा असतो. समाधी लागल्याप्रमाणे त्याची अवस्था असते. म्हणूनच या आनंदाला ‘ब्रम्हास्वादसहोदर' म्हटले गेले.

एकंदरीत हा एक प्रकारचा उच्चकोटीचा आनंद असतो. हा आनंद व्यावहारिक सुखापेक्षा वेगळा म्हणजेच व्यावहारिक आनंदापेक्षा वेगळा अलौकिक असा असतो. तो बौद्धिक व मानसिक स्वरूपाचा असतो. म्हणूनच उच्चकोटीचा आनंदाला श्रेष्ठ मानले जाते.

## ४.२.६ समारोप

साहित्यनिर्मितीचा जो विशिष्ट हेतू असतो त्यातूनच साहित्याची निर्मिती होत असते, यालाच साहित्याचे प्रयोजन असे म्हणतात. संस्कृत साहित्यशास्त्रामधील प्रयोजनविचारामध्ये बहुतेक साहित्यमीमांसकानी ‘आनंद' आणि ‘बोध' ही प्रयोजने सांगितलेली दिसतात. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाचा लाभ; तसेच दुःखशोकादिंनी पिडलेल्यांचे सांत्वन, यश, कीर्ती ही प्रयोजने जरी सांगितलेली असली तरी तात्काळ प्राप्त होणाऱ्या उच्चप्रतीच्या आनंदालाच एकमताने मान्यता मिळालेली आहे. साहित्याच्या निर्मितीने लेखकाला तर वाचनाने रसिकाला आनंदाची प्राप्ती होते. हा आनंद अलौकिक असा उच्चानंद असतो. तो

लौकिक आनंदाहून वेगळा, निस्वार्थ आणि श्रेष्ठ असतो. या अलौकिक अशा आनंदाचे वर्णन संस्कृत साहित्यमीमांसकानी ‘ब्रम्हास्वादसहोदर' अशा शब्दात केला आहे.

एकंदरीत 'भारतीय प्रयोजन विचार : भरतमुनी ते अभिनवगुप्त' या अभ्यासघटकामध्ये आपण भारतीय प्रयोजनविचाराचा सविस्तरपणे आढावा घेतला. साहित्याचे प्रयोजन म्हणजे काय ते समजून घेऊन साहित्य कलेच्या प्रयोजनाबाबत असलेल्या भूमिका, संस्कृत साहित्यमीमांसकांचा म्हणजेच भरतमुनी ते अभिनवगुप्त यांचा प्रयोजनविचार या सर्वाचा सर्वांगीण विचार केला.

**आपली प्रगती तपासा:**

१) भारतीय साहित्य प्रयोजने.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## ४.२.७ स्वाध्याय

**दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) प्रयोजन म्हणजे काय ते सांगून भारतीय प्रयोजन विचाराचा सविस्तरपणे आढावा घ्या.

२) प्रयोजन ही संकल्पना स्पष्ट करून भरत ते मम्मटाच्या प्रयोजन विचारांची चर्चा करा.

**टीपा.**

१) प्रयोजन संकल्पना

२) मम्मटाचा प्रयोजनविचार

३) साहित्याची प्रयोजने : भरत ते अभिनवगुप्त

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) साहित्यातून जीवनविषयक तत्त्वज्ञान मांडलेले असावे अशी भूमिका कोणती भूमिका म्हणून ओळखली जाते?

२) सुखप्राप्ती, मनाला विश्रांती, हितोपदेश ही प्रयोजने कोणी सांगितली?

३) साहित्यकृती ही स्वतंत्र असते, तिचे विश्व हे लौकिक विश्वाहून वेगळे असते, अशी भूमिका कोणती भूमिका म्हणून ओळखली जाते?

४) अशुभनिवारण हे प्रयोजन कोणी सांगितले?

५) मम्मटाने साहित्याची एकूण किती प्रयोजने सांगितली?

६) फारसी कवी फिरदौसी याने कोणता ग्रंथ द्रव्यप्राप्तीसाठी लिहिला?

७) अभिनवगुप्ताने कोणती प्रयोजने सांगितली?

८) रुद्रटाने कोणत्या ग्रंथात प्रयोजने मांडली?

९) काव्याचे दृष्ट फल 'प्रीती' तर अदृष्ट फल 'कीर्ती' असे कोणी म्हटले?

१०) मम्मटाने कोणत्या ग्रंथात प्रयोजन विचार मांडला आहे?

११) भारतीय साहित्यशास्त्राचे जनक कोणास मानले जाते?

१२) 'सद्यपरनिवृत्तये:' म्हणजे काय?

१३) भरतमुनींनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव काय आहे?

१४) कृष्णदयार्णव यांनी कोणता ग्रंथ लिहिला?

१५) साहित्यापासून होणारा बोध जायास'ंम्मित 'असतो असे कोणी म्हटले?

## ४.२.८ संदर्भग्रंथसूची


- देशपांडे ग. त्र्यं., भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन,(ति. आ) मुंबई, १९८०
- पाटणकर वसंत, साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६.
- यादव आनंद, साहित्याची निर्मितीप्रक्रिया, मेहता प्रकाशन, पुणे.
- गणोरकर प्रभा, डहाके वसंत आबाजी व इतर (संपा), वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, ग. रा. भटकळ फाऊंडेशन, मुंबई, २००१.
- राजाध्यक्ष विजय व इतर (संपा), मराठी वाङ्मय कोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
- पाटणकर रा. भा., सौंदर्यमीमांसा, मौज प्रकाशन, मुंबई, (ति. आ) २००४
- कुलकर्णी वा. ल., साहित्य स्वरूप आणि समस्या, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७५
- कंगले र. प., प्राचीन काव्यशास्त्र, मौज प्रकाशन, मुंबई, १९७४


*****